# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | ६ - ७ |
| पृष्ठे | : | ६० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४६**


MAHMAR-19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ६-७ / मे-जून २००१



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ६-७ / मे-जून २००१ किंमत रु. २० / -

संपादक
श्री. अचलकुमार टिल्लू
कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक
सहसंपादक
सौ. मंजिरी दांडेकर
सहाय्यक मंडळ
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
कायदेविषयक सल्लागार
ॲड. सलिल बुटाला

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०
मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | उद्याचा विद्यार्थी | प्रा. कीर्ती आगाशे | ४ |
| २) | प्राध्यापक - शिक्षकांची विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी | वंदना मुळे | ८ |
| ३) | एकतर्फी प्रेम (?) | रेणुका कुलकर्णी | १३ |
| ४) | काही क्षण (कविता) | क्षमा वैद्य | १६ |
| ५) | सामाजिक समतेच्या तराळ्यास | सुधीर ह. शेरे | १७ |
| ६) | कालिदासांची विरह वर्णने | सौ. सुनीता खरे | १८ |
| ७) | महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व-पु.ल.देशपांडे | ना.बा. आगाशे | २२ |
| ८) | भाईबंध | सुभाष चितळे | २५ |
| ९) | आगरकर पुण्यतिथी निमित्त | नचिकेत दातार | २७ |
| १०) | चिंतन | श्रीमती अपर्णा काजरेकर | २८ |
| ११) | वेगळ्या दिशेने वळण घेऊन कळत-नकळत बदलणारी, बदलती नाती | विवेक श्री. आठल्ये | २९ |
| १२) | " आधुनिक उत्सव प्रियता" | वेदवती हब्बु | ३० |
| १३) | मराठी माणूस काय करीत असतो (कविता) | संजय रुळे | ३२ |
| | कस्तुरी, नशा, अेकाअेकी (कविता) | प्रा. विनोद कांबळी | ३२ |

शब्दांच्या मान्यापेक्षा प्रत्यक्ष कार्यातच जास्त सामर्थ्य असते.

| | | | |
|---|---|---|---|
| १४) | सुगम संगीतातून व्यक्त होणारे संगीतमय व्यक्तिमत्त्व -श्री. अनिरुद्ध जोशी | प्र. ग. वैद्य | ३३ |
| १५) | उपेक्षित वृक्षांसाठी | प्रा. विद्याधर वालावलकर | ३५ |
| १६) | डाऊश लँड (जर्मनी)- लेखांक २ | अजित पाटील | ३७ |
| १७) | शुभास्ते पन्थानः। | अरविंद ओक | ४१ |
| १८) | ''ममा-डॅडीला निपीचं पत्र'' | प्रिती देशमुख-कारखानीस | ४३ |
| १९) | असा एक 'आरसा' प्रत्येकाकडे हवा | वर्षा गटणे | ४५ |
| २०) | या मुळे शनिदेवाचा कोप होईल का ?.. | के. शशिकांत | ४७ |
| २१) | कबुतरखाना (कविता) | विहंग | ४८ |
| २२) | एकतर्फी प्रेमाची कारणं व उपाय | मोनिका कुवर | ४९ |
| २३) | एक विशेष कार्यक्रम | 'दिशा' प्रतिनिधी | ५४ |
| २४) | दिशा जुलै २००० ते एप्रिल २००१ | संकलन : मोहन पाठक | ५६ |


या पुढील दिशाचा अंक जुलै मध्ये प्रकाशित होईल. अंक न मिळाल्यास तसे कृपया लेखी कळवावे.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही

# उद्याचा विद्यार्थी

*व्ही.पी. एम्. 'दिशा' ने शिक्षक-प्राध्यापकांसाठी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील द्वितीय पारितोषिक विभागून दिले गेले. त्यातील हा पहिला निबंध- संपादक*

शिक्षण म्हणजे एक आमूलाग्र परिवर्तन, एक अद्भूत संस्कार. एखाद्या व्यक्तीवर काही मूल्यांचे, जाणीवांचे संस्कार करुन तिचे परिवर्तन होत असते. ही एक, आयुष्यभर अव्याहत चालणारी प्रक्रिया असते. सर्वांगीण शिक्षण व्यक्तित्व संपन्न करते. ते चतुर्विध असते. इंग्रजीत म्हणतात तसे 'बुद्धीचे, हृदयाचे, हातांचे व आरोग्याचे' हे शिक्षण आपल्या कुवतीनुसार घेत विद्यार्थी तयार होत असतो.

आज आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केलेला आहे. झपाट्याने बदलणारा काळ, आपली कामगिरी वैज्ञानिक औद्योगिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात दाखवतो आहे. त्याने सबंध सामाजिक जीवनच ढवळून निघाले आहे. शेतीनिष्ठ समाज देखील उद्योगनिष्ठ समाज होऊ पाहतो आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे बदलणाऱ्या समाजजीवनाबरोबरच, शिक्षण पद्धतीत देखील अमूलाग्र बदल होणार आहे.

प्रसिद्ध व्यवस्थापन तज्ज्ञ पीटर ड्रकर याने काही वर्षांपूर्वी, एकविसाव्या शतकाबद्दल केलले अंदाज आज खरे ठरत आहेत. त्याच्या मते या शतकातील सर्व उद्योगधंदे व समाजव्यवस्थाच ज्ञानाधिष्ठित होणार आहे. 'ज्ञान' या संसाधनाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. साहजिकच ज्ञानाच्या व्यवस्थापनाला पण अग्रक्रम मिळणार. माहिती तंत्रज्ञानामुळे या व्यवस्थापनाला पण आता वेगळे परिणाम लाभले आहे. या बदलत्या गणितांबरोबर बदलतो आहे आजचा विद्यार्थी, जो उद्याचे भविष्य बनून आपल्यापुढे येणार आहे !

शिक्षणातून जे संस्कार अपेक्षित असतात, त्यांची सुरुवात बालशिक्षणापासून होते. हे पायाभूत शिक्षण आहे. कारण आरोग्य, आहार, भाषाविकास, व्यक्तिमत्त्वविकास आणि योग्य सामजिक जाणीवा या सर्वांची निकोप वाढ बालशिक्षणातून होते. आधुनिक शैक्षणिक धोरण, बदलती समाजव्यवस्था, तसेच ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांसाठी समान अभ्यासक्रम, 'शिक्षण व राष्ट्रीय विकास' या शीर्षकाखाली राबवला जात असल्यामुळे आज, शैक्षणिक दृष्ट्या शहरी व ग्रामीण विद्यार्थी एकच अभ्यासक्रम शिकतो आहे. दूरदर्शन, इंटरनेट या सुविधा आल्या आणि सर्व जगच जवळ आलं. म्हणून, उद्याचा विद्यार्थी म्हणताना, ग्रामीण व शहरी विद्यार्थी यात फारच अंधुक सीमारेषा राहिली आहे. हा विद्यार्थी, सुशिक्षित व आधीच्या पिढीपेक्षा बरेच आर्थिक स्थैर्य लाभलेले पालक, असे दुहेरी भाग्य घेऊन जन्माला आला असे म्हणल्यास वावगे होणार नाही.

'व्यक्तिमत्त्व विकास' या शब्दांनी सुशिक्षित आई-बाबा मुलाच्या जन्माआधीच भारावलेले असतात. त्यात फारतर एखाद भावंड ! त्यामुळे कुटुंबातील सर्व घटकांत, या घटकाची विशेष दखल घेतली जाते. बालवाडीत बाईंनी गोष्ट सांगायला सुरुवात करताच 'माझ्या घरी ही कॅसेट आहेच'! अशी या पिढीची अवस्था आहे. शाळेतल्या अनेक खेळांपैकी निम्मे खेळ हाताळून झालेलेच असतात. त्यामुळे नवीन काही शिकायच्या काळातच 'हे तर मला येतंच!' अशी भावना दृढ होऊ लागते. अशा मुलांना शिक्षणात गोडी निर्माण करणे हे आव्हानच बालवाडी शिक्षिकेला स्वीकारावं लागतं आहे. एखादी गोष्ट पूर्ण

नावे ठेवणे सोपे पण, नाव कमविणे कठीण गोष्ट आहे.

समजण्याआधीच ती समजण्याच्या नवनिर्मितीपासून या विद्यार्थ्याला थोपवते !

पाळणाघर, स्वतंत्र कुटुंबपद्धती, आई-वडिलांच्या सहवासाचे क्वचित मिळणारे क्षण, विविध उपक्रम, छंदवर्ग यांचे जीवघेणे वेळापत्रक यात 'रम्य ते बालपण' हा अनुभव या विद्यार्थ्यांला येणार कसा ! त्यातच भर पडते 'शिक्षण माध्यम' या वादाची ! स्वातंत्र्यानंतरची इंग्रजी भाषेची गुलामगिरी आनंदाने स्वीकारलेल्या पालकांचा ध्यास असतो, 'फाड् फाड्' इंग्रजी बोलणाऱ्या आपल्या पाल्याचा! जणू ही त्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाची व उज्वल भवितव्याची खूण ! परिणामी, इंग्रजांच्या काळात देखील नव्हत्या एवढ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आज निघत आहेत. त्यात होणारी बालकाची कुतरओढ प्रा. राम जोशींनी आपल्या 'शिक्षण-चित्रे' या ग्रंथात अचूक मांडली आहे. दोन-अडीच वर्षांच्या बालकाकडून लोकमान्य टिळकांच्या भाषणाची तयारी हे त्यांनी दिलेले उदाहरण हृद्य आहे. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ एडगर फ्रीडनबर्ग यांचं 'Today's school education punishes creativity & independence' हे वाक्य अस्वस्थ करणारं आहे.

तरीही, झपाट्याने झालेल्या जागतिकीकरणाने हा विद्यार्थी ती कसरत पण शिकू लागतो. टी. व्ही., व्ही.सी. आर., मिक्सर, प्रोग्रॅमेबल वाशिंग मशिन, कॅलक्युलेटर, कॉम्प्युटर, ई-मेल, फॅक्स, इंटरनेट या सर्व गोष्टी तो फार सहजतेने हाताळू शकतो. हवी ती माहिती, हव्या त्या वेळी, जगाच्या कानाकोपऱ्यातून मिळवून देणारे असे माहितीचे मायाजालाच त्याच्यापुढे खुले झाले आहे. त्यामुळे उद्याचा विद्यार्थी सर्वसामान्य शिष्टाचारांची जाणीव असलेला, बुजरेपणा कमी असलेला (पण त्याचबरोबर नकळत आलेला उद्धटपणा), नवीन तंत्रज्ञानाची जाण असलेला, म्हणजे थोडक्यात 'स्मार्ट' विद्यार्थी आहे. लहान वयातच अनेक गोष्टी पाहिल्याने, वापरल्याने, कोणतीही नवीन गोष्ट आत्मसात करण्याचा या विद्यार्थ्यांचा वेग कौतुकास्पद आहे. वयाच्या तुलनेत त्याला बराच आत्मविश्वास आहे. प्रसंगी चुकीची का ठरेनात, पण स्वतःची मते आहेत. कोणत्या गोष्टीपासून किंवा व्यक्तीपासून, आपला फायदा कसा करून घ्यायचा, याचे उपजत व्यवहारज्ञान चातुर्य उद्याच्या विद्यार्थ्यात असणार आहे.

नवीन तंत्रज्ञान, माहिती यांनी अनेकविध विषयांतील दालने या विद्यार्थ्यांपुढे उभी केली आहेत. या दालनांचा अभ्यास या विद्यार्थ्याने करायला हवा आहे. आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेची, सृजनशीलतेची पावती मेडिकल, इंजिनिअरिंग, सी.ए., ॲडव्होकेट यासारख्या ठराविक क्षेत्रात व पदव्यांमधेच होऊ शकते ही संकुचित पारंपरिक शिकवण हा विद्यार्थी झुगारून देऊ शकतो. नव्हे- त्याने ती झुगारायला हवी आहे. आपल्या आवडीच्या विषयात आकाशाला गवसणी घालणारे यश, हा विद्यार्थी, अशा नवीन विचारसरणीने अनुभवू शकेल. दूरदर्शन, रेडिओ, इंटरनेट या नवीन प्रसारमाध्यमातून (Media) काम करून आपले कौशल्य दाखविण्याच्या अनंत संधी या विद्यार्थ्यांपुढे ओहत. ही त्याच्यापुढची अल्लाउद्दीनची गुहा उघडण्याचा मंत्र मात्र त्याला शिकावाच लागणार आहे.

जागतिककरणाच्या या फायद्यांबरोबरच हात धरून येणारे अनेक तोटे या विद्यार्थ्यांच्या लक्षात आलेले नाहीत. आधीच्या सहस्त्रकात अमेरिकेसारखे प्रगतशील देश व भारतासारखे विकसनशील देश यांच्यात तंत्रज्ञान प्रगतीमधे साधारण वीस वर्षांचे अंतर असे. त्यामुळे भारतातील, कोणत्याही वयाच्या, शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांला हा वीस वर्षांचा बराच अवधी प्रगती करण्यासाठी मिळायचा. परंतु जागतिकीकरण झालं, इंटरनेट आलं आणि बघता बघता हे अंतर झटक्यात कमी झालं ! आपल्यापुढे वीस वर्ष चालणाऱ्या युगाशी स्पर्धा करताना, हा विद्यार्थी धापा टाकू लागला आहे. अगदी, जेवायला अर्धा तास लागेल एवढं जेवण पाच मिनिटात संपव, असं सांगितल्यावर जी

अंधारच नसता तर चमकणाऱ्या ताऱ्यांना कधीच किंमत उरली नसती.

वेळ येईल तीच वेळ या विद्यार्थ्यांवर येऊन ठेपली आहे. उद्याच्या विद्यार्थ्यांला या जीवघेण्या स्पर्धेला सामोरं जायचं आहे. संगणकाची एक भाषा किंवा पॅकेज शिकायला लागणारा वेळ आणि पैसा खर्च करेपर्यंतच ती भाषा व्यवहारातून फेकली जाते आणि येतो नवीन पॅकेजचा ज़माना! अशा परिस्थितीशी टक्कर द्यायला त्याला आयुष्यभर विद्यार्थीच रहायला हवं. 'शिकेल तो टिकेल' ही म्हण सर्वार्थाने सार्थ होते आहे. पण ही मनाची तयारी या विद्यार्थ्यांत कुठे आहे ? पाठ्यपुस्तके, क्रमिक पुस्तके, शाळेतला पहिल्या पाचातला नंबर, अपेक्षित प्रश्न, अपेक्षित यशाची खात्री देणारे शिकवणी वर्ग व प्राध्यापक या चक्रातून तो बाहेर पडला पाहिजे ना!

नवीन पिढीच्या शिक्षणाची व्याख्याच आता आमूलाग्र बदलते आहे. या शिकण्यात फक्त तंत्रज्ञानच नाही तर बँकांचे व्यवहार, ग्राहकांचे मानसशास्त्र, बदलत्या परिस्थितिचे सूक्ष्म निरीक्षण व त्यासाठी लागणारी संवेदनक्षमता, नवीन नवीन मार्ग शोधायची व त्यावरुन पुढे जात रहाण्याची ज़िद्द व चिकाटी, फक्त राष्ट्रातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून रहायची धडपड, या गोष्टी उद्याच्या विद्यार्थ्यांला शिकायलाच हव्यात. यासाठी फक्त इतरांबरोबरच स्पर्धा न करता, त्याला स्वतःशीच स्पर्धा करत यशस्वी होण्याची अभिनव दृष्टी देणं आवश्यक आहे. कामातील आनंद शोधायची मानसिकता त्याने अनुभवायला हवी.

मग संबंध येतो तो सृजनशीलता (Creativity) मौलिकता (Originality) व प्रतिभा (Inspiration) यांनी बिलकूल वाव नसलेल्या सद्य शिक्षणाचा. क्रमिक पुस्तके, त्यातले प्रश्न, उत्तरात अपेक्षित आशय पण तोच ! गुणवत्ता म्हणजेच शालान्त परीक्षेतील यश. जे खरं तर मोजमाप असतं स्मरणशक्तीचं ! या चौकटीबाहेरचं जग, व्यवहारज्ञान या विद्यार्थ्यांला शिकवायला हवं आहे. पाठ्यपुस्तकातील गुणवत्ता आणि त्यानुसार बांधलेले ठोकताळे चूक ठरवणारी अनेक उदाहरणे इतिहास आपल्याला देतो. एडिसनच्या शिक्षकांनी 'He is too stupid to learn anything' असं म्हटलं होतं, तर न्यूटन शाळेत अड्ड समजला जायचा. प्रसिद्ध संगीत तज्ज्ञ व संगीतकार बीथोव्हेन बद्दल त्याच्या संगीत शिक्षकांच मत होतं " As a composer he is hopeless !" एवढंच काय, तर रविंद्रनाथ टागोरांची गुणवत्ता तरी त्यांच्या शाळेने कुठे मान्य केली होती ? रामदास स्वामींनी दासबोधात सांगितलेल्या 'पढतमूर्ख लक्षणांसारखे' आजचे विद्यार्थी बनायला नको आहेत.

पूर्वप्राथमिक ते बारावी हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील वसंतकाळ! त्यातला हा बहर बाहेरुन कृत्रिम फुले, पाने चिकटवून आपण निर्माण करायचा, की व्यक्तीच्या अंतरंगातूनच त्याने घेतलेली उसळी फुलू द्यायची! 'The destiny of India is being shaped in her classrooms' असं कोठारी आयोगाच्या अहवालातील पहिलचं वाक्य खूप मोठा आशय देऊन जातं. बंदिस्त शिक्षणाची संकल्पना या विद्यार्थ्यांनी झुगारुन द्यायला हवी. ' Education is essentially a conservative activity concerned with preservation & transmission of culture' असे म्हणून जेम्स कोलमन सांगतात की शिक्षणाकडे जग आता, सर्व प्रकारच्या बदलांची गुरुकिल्ली (Master Key) म्हणून पाहू लागले आहे.

परिक्षांची बदलती स्वरुपं, On-line परीक्षा, इंटरनेट वरुन माहिती पाठवून शिक्षण, नोकरी निवडणे, या सर्व गोष्टी या विद्यार्थ्यांला आता आत्मसात करुन घ्यायला हव्या आहेत. माहितीच्या मायाजालात अभिमन्यूसारखं न गुरफटता, हवं ते आणि हवं तेव्हा मिळवायचं चातुर्य त्याला वापरता यायला हवं आहे. काही परंपरागत अंगळवणी पडलेल्या सवयी म्हणजे, महिन्याच्या शेवटी हातात पगार, बचत करुन निवृत्तीनंतर येणाऱ्या व्याजावर उर्वरित आयुष्य

सुखाने काढणे या सर्व गोष्टींना आता तिलांजली द्यायची वेळ आली आहे. कारण या गोष्टी उद्याच्या विद्यार्थ्यांसाठी फसव्या आहेत. कंत्राटी पद्धती, रोजगार, दिवसाच्याच नव्हे तर तासाच्या बोलीवर आता नोकरी दिली जाते. उद्याची काहीच शाश्वती नसलेलं एक आव्हानात्मक चित्र या विद्यार्थ्यांपुढे उभं आहे. अशा परिस्थितीला लागणारं मानसिक संतुलन त्याला मिळवावं लागणार आहे. पण ते मिळणार कोठून ?

भीती वाटावी अशी सांस्कृतिक घसरण हा विद्यार्थी रोज अनुभवतो आहे. मुलांनी रोज वर्तमान पत्र वाचावं, नवीन गोष्टी कळतात. ज्ञान वाढतं, असं सांगणं पण आजच्या पालकाला अडचणीत टाकणारं आहे. कारण, वर्तमानपत्रात ठळक मथळ्याखाली माहिती असते ती मारामाऱ्या, युद्ध, खून, अफरातफर, दंगे, बलात्कार आणि प्रलोभनात टाकणाऱ्या जाहिरातींची ! या माहितीने हा विद्यार्थी लहान वयातच भांबावलेला असतो. त्यातच 'तिसरा पालक' (Third parent) म्हणवणाऱ्या संगणकाशी याच वयात जवळीक होत असते. मग नको ती माहिती नको त्या वयात मिळतच राहते. खेळ, व्यायाम, चर्चा, एकत्र येणं या गोष्टी निरोगी व निकोप मनासाठी आवश्यक आहेत. परंतु त्याच गोष्टी या वयात टाळल्या जातात. कारणे अनेक असतील; पालकांची अगतिकता, सुरक्षितता, बदलती समाजव्यवस्था, काहीही असतील, पण ती या विद्यार्थ्याला व्यक्तिमत्त्वाची परिपूर्णता बहाल करु शकत नाहीत. यंत्रांचा अतिवापर या विद्यार्थ्याला निष्क्रिय बनवू शकतो. त्याची सर्जनशीलता, संवेदनक्षमता मारुन टाकू शकतो हे भीषण सत्य आहे.

लहान वयातच शाळेत चिडवणाऱ्या आपल्या मित्रांना निर्घृणपणे गोळ्या घालणारा सॅन व्हिएगो येथील संताना हायस्कूलचा, चार्ल्स विल्यम उर्फ अँडी पाहिला की अंगावर शहारा येतो. या गोष्टी परदेशातच होतात या भ्रमात आता राहणे योग्य नाही. कारण सांस्कृतिक केंद्र म्हणवणाऱ्या पुण्यनगरीत देखील आपले 'प्रकरण' कळू नये म्हणून लहान मुलाचा जीव घेणारा उद्याचा विद्यार्थी आज घडतो आहे.

'प्रेम' या शब्दाचा उदात्त अर्थच ज्यांना कोणी समजावून दिला नाही (कारण तो पाठ्यपुस्तकातील व्याख्येत नव्हता). त्या विद्यार्थ्याकडून, 'लग्नाला नाही म्हणलीस, तर ॲसिड फेकीन ! ' ही भाषा ऐकू येणारच !

अशा मनोविकारांनी ग्रस्त असलेली पिढी देखील या विद्यार्थ्यांबरोबरच असणार आहे. नव्हे, तो पण त्यातलाच एक घटक असणार आहे ! गगनाला गवसणी घालणारी वैज्ञानिक प्रगती आणि गर्तेत ढकलणारी मानसिकता याचा समतोल ठेवणे या विद्यार्थ्यांला शिकायला हवे ! ते शिकवायची जबाबदारी आता, या उद्याच्या विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक, प्राध्यापक यांनीच नाही तर सर्व समाजानेच स्वत:हून स्वीकारायला हवी. त्याच्या या उत्तुंग भरारीसाठी त्याचे मनोधैर्याचे पंख मजबूत, ताकदवान करायला हवेत आणि त्याला सांगायला हवं.

'मन शुद्ध तुझं, गोष्ट आहे पृथ्वी मोलाची
तू चाल पुढं, तुला रं गड्या भीती कशाची ?
पर्वा न कुणाची !'

प्रा. सौ. किर्ती सतीश आगाशे
सिनिअर लेक्चरर,
वि.प्र. मंडळ तंत्रनिकेतन
ठाणे.

***

काल हाच आपला सर्वोत्तम मित्र, आणि मित्र आपणाला गप्प बसण्यात काय शहाणपण आहे ते शिकवतो-ए.बी. एलकॉट

# प्राध्यापक -शिक्षकांची विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी

*व्ही.पी. एम्. 'दिशा' ने शिक्षक-प्राध्यापकांसाठी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील द्वितीय पारितोषिक विभागून दिले गेले. त्यातील हा दुसरा निबंध- संपादक*

मणिभवन संस्था, मुंबई यांच्यातर्फे सर्व शिक्षकांसाठी वक्तृत्व स्पर्धेच आयोजन केले होते. 'शिक्षण जीवनाभिमुख असावे' या विषयावर बोलताना मी मूलोद्योगी शिक्षणावर भर दिला होता. प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल बक्षिस वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्याबाबत जेव्हा संस्थेचे पत्र आले, तेव्हाचा आनंद अवर्णनीय होता. शालेय, महाविद्यालयीन जीवनात तशी अनेक बक्षिसे मिळालेली असूनही, आपल्या पेशाशी निगडित विषय निवडीचे आणि म. गांधीजींच्या शिक्षणविषयक धोरणावर विचार व्यक्त करायला मिळाले याचं समाधान अधिक होतं. नकळत मनात विचार आला, कशी काय पोहचले मी इथपर्यंत? कोणी घडविले मला? आई, वडिल, शिक्षक, प्राध्यापक, विद्या प्रसारक मंडळ की आणखीही खूप मंडळी ....?

आजीसारख्याच वाटणाऱ्या, शिक्षण संस्कार करणाऱ्या नऊवारी साडीतील पणशीकर बाई, माझी मुलं-माझा वर्ग असं नेहमी म्हणणाऱ्या शशिकला जोशी बाई, खारला रामकृष्ण मिशनतर्फे आयोजित स्पर्धेसाठी घेऊन जाणाऱ्या मेहेंदळे बाई, पुस्तकातील परिचयाव्यतिरिक्त साहित्यिकांचा अधिक परिचय देणारे मुख्याध्यापक मा. श्री. चिटणीस सर... सर्व जण आठवू लागले. अनेकविध कार्यक्रमांद्वारे प्रगतिपथावर वाटचाल करणाऱ्या मान्यवरांचे अनुभव ऐकण्याची सुसंधी या शिक्षक, मुख्याध्यापकांनी उत्साहाने पार पाडलेल्या जबाबदारीमुळेच आम्हाला लाभली. अशा या बहुश्रुत होण्यापासून, जीवनाच्या अंगणात मूल्यसंस्काररूपी सुगंधाचा सडा शिंपणाऱ्या आदरणीय गुरुजनांपासून आम्ही खूप खूप शिकलो, घडलो आणि आज.... आणि आज विद्या प्रसारक मंडळातर्फे आयोजित स्पर्धेत भाग घेण्या इतपत पात्र ठरलो.

मातृदेवो भव ! पितृ देवो भव ! आचार्य देवो भव ! आपली प्रथम गुरु-शिक्षिका ही आपली जन्मदात्री आई असते. तिचे बोलणे ऐकून छोटे मूल बोलू लागते, तिचा हात धरून चालू लागते. पुढे मिळणारे शाळेतील शिक्षण म्हणजे मनाला वळविणारं, उमलवणारं, विकसित करणारं ठरतं. नंतरची कक्षा विस्तारते आणि महाविद्यालयीन जीवनात प्राध्यापक भावी जीवनातील उत्तम नागरिक घडविण्याची जबाबदारी समर्थपणे पेलतात.

मूर्तीकार उपलब्ध दगडाला छिन्नी मारत, आकार देत त्यातून शिल्प घडवितो, कुंभार मातीच्या गोळ्यातून नक्षीदार भांडे बनवितो त्याप्रमाणे शिक्षक-प्राध्यापक समोरच्या विद्यार्थ्यांची क्षमता, कुवत ओळखून त्याला मार्गदर्शन करतात, त्याच्या जीवनाला घाटदार आकार देत सर्वांगीण विकासाकरिता धडपडतात, आपली निष्ठा, कर्तव्य पणाला लावतात. हिरा हा मूळचा चकाकतोच पण त्याला पैलू पाडल्यास तो अधिकच चमकू लागतो. २१व्या शतकाकडे वाटचाल करतानाही जीवनाला गती देण्याचे चारित्र्यघडणीचे काम विविध उपक्रमांद्वारे दिल्या जाणाऱ्या मूल्याधिष्ठित शिक्षणामुळे शक्य होते. आचार्य म्हणजे आचारवान. स्वत: आदर्श जीवन आचरून इतरांकडून आचरून घेणारा तो आचार्य. विनोबांच्या मतानुसार शिक्षक हा विद्यार्थीपरायण असतो, विद्यार्थी हा शिक्षकपरायण असतो तर शिक्षक व विद्यार्थी हा ज्ञानपरायण असतात.

---

काल हा फॅशनेबल यजमानासारखा आहे; तो निरोप घेणाऱ्या पाहुण्यांशी किंचित हस्तांदोलन करतो आणि हात पसरुन तो नवागताचे हार्दिक स्वागत करतो - शेक्सपिअर

विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी शिक्षकांकडे येण्याची कारणेही तशीच आहेत. एकत्र कुटुंब पद्धतीचा ऱ्हास, प्रतिष्ठेच्या अवास्तव व चुकीच्या कल्पना, जीवघेण्या स्पर्धा, मार्गक्रमणातील अडथळे इत्यादींमुळे मुलांचे मानसिक आधार ढासळत चालले आहेत. छोटी मुले आजी-आजोबांच्या मायेला, प्रेमाला पारखी झाली आहेत. आईबाबा दिवसभर नोकरीनिमित्त बाहेर असतात, आल्यावर थकून जातात. अशा परिस्थितीत या मुलांच्या संस्कारक्षम वयात त्यांच्या मनाला, व्यक्तिमत्त्वाला घडविण्याची जबाबदारी शिक्षक व प्राध्यापक यांच्याकडे येते. केवळ ज्ञान, माहिती देणे या हेतूने जॉन लॉगी बायर्ड या स्कॉटीश शास्त्रज्ञाने दूरदर्शनचा नवा शोध लावला. पण त्यावरील नको ते कार्यक्रम बघितल्याने मूल्यहीनतेचा रोग विकत घेतला की काय असे वाटते. दूरदर्शन संचाचे बटण (कळ) आपल्या हातात असते हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांस सांगितले तर लवकर पटते. शिक्षक-प्राध्यापक हे विद्यार्थ्यांचे आदर्श असतात. हे आदर्शत्व खरंच आपणात आहे का याचे आत्मपरीक्षण शिक्षकाने करणे जरुरीचे आहे. पोषाखापासून ते न्यायबुद्धीने वागण्यापर्यंत सर्वच बाबी काळजीपूर्वक तपासण्याचे महत्त्वाचे काम केले पाहिजे. गुरुकुल पद्धतीपासून तेथील धार्मिक आणि व्यावसायिक शिक्षणातून शरीर, मन आणि आत्मा यांनी संपन्न होणाऱ्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास साधण्याची जबाबदारी शिक्षकाकडे आहे. भारताची उज्ज्वल आणि दैदिप्यमान संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करण्याचे महान कार्य गुरु-शिष्य या नात्यामुळे होत आहे. भारतात अनेक बाबतीत वैविध्य असूनही संस्कृतीत जी एकता जाणवते तिचं सारं श्रेय शिक्षणपद्धतीस, अखंड कार्यरत राहून विद्यार्थ्यांत ती भावना जागृत करणाऱ्या शिक्षक-प्राध्यापकास आहे.

जिज्ञासेची होई पूर्ती, कर्तव्याची जाण चित्ती ।
स्मृती या छात्रा देती स्फूर्ती, चैतन्याची मिळते शक्ती ॥

स्वान्तसुखाय आणि बहुजनहिताय करायला शिक्षकाने स्वयंप्रेरणेने तयार व्हायला हव. स्वयंविकास साधता साधता आपल्या वर्तनाच्या प्रभावाने विद्यार्थ्यांत विविध उपक्रमांद्वारे विविध मूल्ये रुजविली पाहिजेत. जर शिक्षक नियमितपणे वागणारा, विज्ञाननिष्ठा बाळगणारा, विशालदृष्टी असणारा, निसर्गावर-देशावर प्रेम करणारा, लोकशाहीच्या तत्त्वांनी वागणारा, शांतवृत्ती बाळगणारा, निर्भयी, श्रमनिष्ठा अंगीकारणारा, स्वच्छतेचा भोक्ता असेल तर तो विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी अतिशय उत्कृष्टपणे बजावू शकतो.

'आधी केले आणि मग सांगितले' - असे एक वचन आहे. त्याप्रमाणे शिक्षकाच्या उक्तीत आणि कृतीत एकरूपता असेल तर विद्यार्थी घडतो. शिक्षक वर्गात वेळेवर हजर असतील तर विद्यार्थी उशीरा आल्यास त्यांना ओरडण्याचा अधिकार त्यांना असेल, अन्यथा नाही. शिक्षकच जर अंधश्रद्ध असेल, देवदेवतांना बळी देण्यावर किंवा पूर्वापार चालत आलेल्या अर्थशून्य रुढी व परंपरांवरच त्याचा विश्वास असेल तर तो अंधश्रद्धेचे निर्मूलन कसे करणार? अधिकारी वर्गाची भाटगिरी करुन कसेतरी जीवन जगणारा शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंतःकरणात स्वाभिमानाचा झरा कसा निर्माण करणार? वर्गात मुलामुलींना वागणूक देताना भेद करीत असेल तर कोठून स्त्री पुरुष समानता हे मूल्य शिक्षक रुजवणार ? स्वच्छतेचा धडा एकदा कोठेतरी प्राथमिक शाळेत दिला की झाले, ते मूल्य रुजले असे होत नाही. स्वच्छतेचा संबंध जेथे जेथे येईल, तेथे तेथे संबंधित शिक्षकाने संस्कारांचा आघात केला पाहिजे. संत गाडगेबाबांनी सातत्याने आपल्या हातातील झाडूने झाडत असतांनाच कीर्तनाद्वारे स्वच्छतेचा महामंत्र कृतीतून प्रत्यक्षपणे दिला. एखाद्या मूल्यावर एखाद्या वेळी बोलून किंवा त्याचा वर्तनाद्वारे अनुभव देऊन भागणार नाही; तर त्यात सातत्य आणि नियमितपणा पाहिजे. पाठ्यपुस्तकात, विविध विषयात, प्रसंगात, अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात ते

मूल्य जेथे जेथे येईल तेथे तेथे त्याचा पाठपुरावा करावयास हवा.

संस्कार कोणताही असो तो मनाच्या गाभाऱ्यात पोहचला की कृतीतून पाझरतो, मानवाच्या वर्तनाशी एकरुप होऊन त्याची साथ करीत राहतो. जसा जलाशय पाण्याशिवाय नाही तसे शिक्षण मूल्यांशिवाय नाही. शौर्य, पराक्रमाचे वर्णन आवेशपूर्ण झालेच पाहिजे.

आचारविषयक नियमांचे पालन करुन वागले म्हणजेच नीतींचा सदाचार ! मूल्य होय. लॅटिन भाषेतील Morus या शब्दावरून Morality हा शब्द आला. स्वत्व अस्मिता यांची जागृती करुन त्यातून आत्मविश्वास साधणे, कार्यप्रवणता वाढविणे हे मूल्यशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. म्हणूनच विद्यालयात, महाविद्यालयात शिक्षक-विद्यार्थी ही आंतरक्रिया फार महत्वाची ठरते. ज्ञान व विज्ञानाच्या पंखांच्या आधारे विद्यार्थी जेव्हा जीवनाच्या आकाशात उंच भरारी मारेल तेव्हा शिक्षकांनी दिलेल्या विवेकामुळे तो योग्य दिशेने प्रवास करेल.

मनु आणि महापूर या पौराणिक कथेतील मासा मनुला भेटतो तेव्हा सांगतो की मला प्रथम ओंजळीत ठेव, त्यात मावेनासा झालो की छोट्या जलाशयात नेऊन सोड, मग नदीत आणि नदीतही मावेनासा झालोकी मला समुद्रात नेऊन सोड. विद्यार्थ्यांच्या जीवनाची वाटचाल सुद्धा शिक्षकाने मर्यादिततेकडून व्यापकतेकडे नेली पाहिजे. विद्यार्थ्यांस सद्सद्विवेकबुद्धीला स्मरुन आपले वर्तन नियंत्रित करण्याची सवय शिक्षकाने लावली पाहिजे. मनाच्या अंतर्गत शुद्धतेचे महत्त्व मोलाचे आहे. यामुळेच विद्यार्थी ध्येयवादी भावी नागरिक बनतात. हे घडण्यासाठी छोट्या छोट्या प्रसंगातून त्यांच्यावर सुसंस्कार होणे अगत्याचे आहे. बालवयात विद्यार्थ्यांच्या मनावर शिक्षकांच्या विचारांचा आणि वर्तनाचा जबरदस्त पगडा बसत असतो हे ध्यानात घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे. अचूक आणि वेळेवर केलेल्या मार्गदर्शनामुळे, विद्यार्थी एक चांगली व्यक्ती म्हणून निरोगी आणि निरामय स्वरूपाचे अंतर्बाह्य जीवन जगतील. यासाठी शिक्षक करीत असलेले काही उपक्रम उल्लेखनीय ठरतात.

पर्यावरण हा विषय हाताळताना प्लॅस्टीक पिशव्यांचा भस्मासूर जाळून टाकणे, दुकानदार, ग्राहक यांना त्यापासून होणारे दुष्परिणाम पटवून देण्यासाठी जनजागरण दिंडी आयोजित करणे, बायोगॅस प्रकल्पास भेट देण्याकरिता खास शिबीर आयोजिणे, निसर्गरम्य वातावरणात सहल नेऊन निरीक्षण, आत्मचिंतन करण्याची सवय विद्यार्थ्यांना लावणे हे शिक्षकांचे काम आहे. महालक्ष्मी येथील विज्ञान केंद्रात स्वत: प्रयोग करुन, विद्यार्थी प्रयोग करताना योग्य सूचना देणे हे शिक्षकास करणे आवश्यक असते. परिसर अभ्यासातून, शाळेभोवती बाग तयार करायला लावून सुंदर निर्मितीच्या आनंदाचा आस्वाद विद्यार्थ्यांना घेण्याची सवय/गोडी लावणे आवशक्य आहे. डॉ. जगदीशचंद्र बोस यांनी प्रयोगांनी वनस्पतींना भावना आहेत हे सिद्ध केले. आपल्या विद्यार्थ्यांमध्येही ती संवेदना क्षमता लावलेल्या रोपांना रोज पाणी घालून, रोपाच्या वाढीचे प्रेमाने निरीक्षण करुन त्यांच्याशी हितगुज करुन वनस्पतींचे जाणलेले महत्त्व वृक्षघोषणांसह वृक्षदिंडी काढून शिक्षकाने निर्माण केली पाहिजे.

मित्र-मैत्रिणीने डबा न आणल्यास त्यांना आपल्या डब्यातील भाजी-पोळी आठवणीने देणे, शाळेत वाढदिवसाला मिळालेले चॉकलेट घरी छोट्या भावंडासाठी नेणे या गोष्टी सुरुवातीस लहानपणी शिक्षकांना सांगितल्यानुसार जरी केल्या असतील, तरी त्यामुळेच विद्यार्थी मोठेपणी आपल्या उत्पन्नातील काही भाग स्वेच्छेने विविध समाजोपयोगी संस्थांना देतील. शिक्षकांनी पेरलेल्या संस्काररुपी बीजाचे सामाजिक बांधिलकी जोपासणे या कर्तव्यात रूपांतर होईल. भूकंप, पूर यासारख्या नैसर्गिक

ज्याने वेळ वाया घालविला त्याच्याजवळ गमवायला काहीच शिल्लक उरत नाही. -थॉमस फूलर

आपत्ती नंतर वर्तमानपत्रात वाचलेल्या बातम्यांवर चर्चा करून, ती चर्चा घडवून आणून विशेष भर देऊन विद्यार्थ्यांपुढे मांडली पाहिजे. रस्ते, पूल, बोगदे, धरणे इ. बांधून मानवाने निसर्गावर विजय मिळविला आहेच; पण निसर्गाने रौद्र रूप धारण केल्यावर क्षणार्धात मानवी जीवन उध्वस्त होऊ शकते. अशा दोन्ही बाजू स्पष्ट करून सांगितल्या पाहिजे.

कार्यानुभवाचा राखी उपक्रम राबवित असतांना शाळेतील शिक्षकांच्या कल्पक आणि आखीव मार्गदर्शनातून विद्यार्थी राख्या बनवायला शिकतात. व्यवसायभिमुखता असणारा हा उपक्रम शाळेस आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याची भांडी (पिंप, कळशी, तांब्या, भांडी), टेपरेकॉर्डर घेण्याइतपत फायदेशीरही ठरतो. 'जय जवान जय किसान' ही पुस्तकातील कविता आवडलेली असते. सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकबांधवांना तयार झालेल्या राख्या कलात्मकतेने तिरंगी झेंड्याच्या प्रतिकृतीत तेच रंग राख्यांसाठी वापरून जेव्हा पाठविल्या जातात तेव्हा शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, श्रमनिष्ठा, कार्यकुशलता, सर्जनशीलता राष्ट्रभक्ती ही मूल्ये रुजविल्याने मानसिक समाधान मिळते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार आनंददायी पद्धतीने असेच अनेक उपक्रम राबविल्याने विद्यार्थी गटागटाने, प्रकल्प पद्धतीने अनेक गोष्टी शिकतो. पालकांना मदतीसाठी आवाहन करण्याकरिता स्वत: 'उठा नागरिक हो, सजग व्हा उठा चला' असे गीत शिक्षक रचतात व ते पालक सभेत सादर करतात. शिक्षकांच्या सुप्त गुणांनाही विद्यार्थ्यांसमवेत वाव मिळत राहतो.

शिक्षक व्यवसायाशी/पेशाशी निगडित जी प्रशिक्षणे घेतो त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना करुन देणे अत्यावश्यक आहे. शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी तर्फे आयोजित पाठलेखनाचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर शिक्षकाने अध्यापनाच्या पाठाचे संवादात्मक लेखन करुन, कॅसेट बनवून विद्यार्थ्यांना ऐकविली पाहिजे. शिष्यवृत्तीच्या प्रशिक्षण वर्गास जाऊन आल्यावर विद्यार्थ्यांकडून ते विषय तयार करुन घेण्याची जबाबदारी संबंधित शिक्षक घेत असतो. 'शर्थीने खिंड लढविली' हे नाट्य विद्यार्थ्यांकडून करुन घ्यावे लागते. गुरुपौर्णिमा दिनी ती ध्वनिफित, राष्ट्रीय सणांच्या वेळी देशभक्तीपर गीते ऐकवून विद्यार्थ्यांत भावनांचे रोपण करीत असतो, कारण

Values can't be taught but they can be caught.

गुणांचे वर्धापन आणि दोषांचे निर्मूलन करणे हे सूत्र शिक्षक काटेकोरपणे पाळतो. मनाचा अढळ निश्चय व सर्वश्रेष्ठ नियंत्रण यांचे महत्व शिक्षक जाणतो. शरीर नुसते बलदंड असून चालणार नाही तर त्यात वेग, लवचिकता, दम या गोष्टीही हव्यात. श्री समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक शिकवितांना सूर्यनमस्कार करुन घेण्याची, मानवी मनोरे बसवून घेण्याची, विद्यार्थ्यांना शरीराचा व मनाचा तोल सांभाळण्याचा सराव देण्याची जबाबदारी शिक्षकांची ठरते.

राष्ट्रगीत सुरु झाल्यावर, कितीही महत्वाचे काम पुढ्यात असले तरी ते बाजूला ठेऊन शिक्षक उभे राहतात हे जेव्हा विद्यार्थी स्वत: पाहतो तेव्हा तो तेच वर्तन करतो. त्याला उभे रहा म्हणून वेगळे सांगण्याची जरुरी नसते. राष्ट्रपुरुष, देशभक्त, क्रांतिकारक यांच्या जयंती, पुण्यतिथी निमित्त उतारे पाठांतर, साभिनय पोवाडागीते घेऊनही विद्यार्थ्यांत राष्ट्र प्रेम जागृत करता येते. स्वातंत्र्यवीर सावरकरांची त्रिखंडात गाजलेली बोटीतून मारलेली उडी-या प्रसंगाचे आवेशापूर्ण कथाकथन विद्यार्थ्यांच्या मनात साहसी गुण, देशाभिमान जागृत करते.

आधुनिक पाठ्यपुस्तके ही केवळ ज्ञानाची महाद्वारेच नाहीत तर संस्कार आणि मुल्यांची ती कोठारे आहेत. ती मूल्ये नेमकी हेरून, उपक्रमांत रंजकता आणून विद्यार्थ्यांवर बिंबवण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे. अभ्यासक्रम

---

सोन्याचा प्रत्येक धागा जसा किमती व मौल्यवान असतो,
त्याप्रमाणे समयाचा प्रत्येक क्षण किमती व मौल्यवान असतो. - जे. मॅसन

आणि शैक्षणिक प्रक्रिया सांस्कृतिक आशयाने गुंफण्याकरिता शिक्षकाचे भाषेवरील प्रभुत्व फार महत्त्वाची कामगिरी बजावते. मातृभाषा ही तर विचारांची वाहिनी आणि संस्कारांची जननी आहे. सौंदर्याभिरुची, कलात्मकता शिक्षकाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात चोखाळली तर विद्यार्थ्यांचा त्यावर प्रभाव पडतो.

शिक्षकास ही जबाबदारी मनाप्रमाणे पार पाडण्यात अनेक अडचणी येतात. अध्यापना व्यतिरिक्त अनेक अशैक्षणिक कामे शिक्षकांना 'राष्ट्रीय कर्तव्य' म्हणून करावी लागतात. निवडणूक, जनगणना एवढेच नाही तर उंदराची बिळं शोधणे, केबलधारकांची मोजणी करणं इ. अशा वेळी शिक्षकांचीच कामासाठी आठवण येते. सर्व आटोपून शाळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सज्ज झाले की वार्षिक तपासणी सुरु होते. शिक्षणाचा दर्जा खालावतोय हे ऐकायला मिळते. कित्येक कारकूनी कामे, बाहेरची कामे शिक्षकांना दिल्याने त्यांचे कर्तव्य पार पाडण्यासाठी त्यांना फार कमी वेळ मिळतो. शिक्षकांचे वेतन देताना पिळवणूक करणे, नोकरी मिळण्यासाठी लाच द्यावी लागणे, नोकरीची शाश्वती नसणे, राजकारण इत्यादी गोष्टींमुळे सर्वच शिक्षक मनोमन विद्यार्थ्यांना घडविण्याची जबाबदारी स्वीकारतात असे खात्रीने सांगणे कठीण होते. अमुक एका शिक्षकाचा तास जर चुकला तर आपले खूप नुकसान होईल असं विद्यार्थ्यांस वाटणे म्हणजेच आपली जबाबदारी यथोचित पार पाडत आहोत याची शिक्षकाला पोचपावती मिळणे होय.

विद्यार्थ्यांत चांगली मूल्ये रुजवून, संस्कार करुन खऱ्या अर्थाने सुजाण, नागरिक घडविण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. समाजातील अनेक घटकांचे सहकार्य घेऊन हा मूल्यशिक्षणाचा गोवर्धन शिक्षकास उचलावयाचा आहे. यासाठी जी विचारपूर्वक जुळवणी करावयाची तर, त्यात शिक्षकांचा-प्राध्यापकांचा वाटा मात्र मोठा असणार ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. आपल्या व्यवसायाचे पथ्य म्हणून स्वतःचे वर्तन नियंत्रित, आदर्श, अनुकरणीय ठेवण्याचे बंधन शिक्षकांना पाळावे लागते. शिक्षक-प्राध्यापकांचा प्रज्ञास्पर्श लाभलेलं शालेय, महाविद्यालयीन वातावरण हे नवसहस्त्रकाकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांतून नक्कीच सामर्थ्यवान आणि प्रगतीशील समाज निर्माण करेल यात शंका नाही.

**सौ. वंदना संजीव मुळे**
६-बालाजी अपार्टमेंट,
प्लॉट नं. ३६४, कानसई विभाग,
डॉ. लापसिया हॉस्पिटल समोर,
अंबरनाथ (पूर्व), जि. ठाणे - ४२१ ५०१.

ooo

**भांडणाचे कारण ....**

रेल्वेच्या डब्यात दोन गृहस्थ लगबगीने शिरले व बाकावर समोरासमोर बसले. एकाने खिडकी उघडली व म्हणाला, 'काय उकडत आहे नाही?'

तेवढ्यात दुसऱ्याने ती खिडकी फट्‌ करीत बंद केली व म्हणाला, 'काय गार वारा लागतोय?'

पुन्हा पहिल्याने खिडकी उघडली व दुसऱ्याने बंद केली. असे बराच वेळ घडले, तेव्हा पलीकडचा माणूस हसू लागला. या दोघांनी रागाने त्याला कारण विचारले तेव्हा तो म्हणाला, "तुम्ही जी खिडकी उघडता-बंद करता आहात त्याला काच नाहीये !"

माणसे काळाला मारायचा विचार करतात, परंतु काळच त्यांना शांतपणे मारत असतो. - डॉयन बाऊसिकॉल्ट

# एकतर्फी प्रेम (?)

*ठाण्यातील समर्थ सेवक मंडळाच्या गतवर्षीच्या कै. नी. गो. पंडितराव वर्क्तृत्व स्पर्धेतील उल्लेखनीय भाषणे आम्ही दिशाच्या वाचकांसाठी देत आहोत. आजचे तरुण काय वाचतात, कसा विचार करतात याचा अंदाज या भाषणातून येतो. - संपादक*

या विषयापेक्षा या कंसातील प्रश्नचिन्हाला जास्त महत्व आहे. कारण या प्रश्नचिन्हामुळे या विषयाला एक वेगळाच अर्थ प्राप्त झाला आहे. तस बघितल तर प्रेमाच्या आर्दश संकल्पनेनुसार किंवा मूलतत्त्वानुसार प्रेम हे एकतर्फीच असावं. निरपेक्ष भावनेने कुठलीही अपेक्षा न करता दुसऱ्याला देत जाणे म्हणजे प्रेम. जे एकतर्फीच असते. पण एकतर्फी प्रेम या शब्दासमोर असणाऱ्या प्रश्नचिन्हाने दर्शविले आहे की यातील प्रेम हे प्रेम नसून आकर्षण आहे. विकृती आणि हिंसा निर्माण करणारे आणि हे आकर्षण एकतर्फी प्रेमाला समस्या बनवतं.

पण ही समस्या कोणासाठी ? तर ह्या समस्येचे बळी पडले आहेत, जे या विकृतीमुळे मारले गेले आहे, त्यांच्याशी निगडित असणाऱ्या व्यक्तिंसाठी. जोपर्यंत नीता हेंद्रे, रिंकू पाटील, अमृता देशपांडे यांच्या यादीत रेणुका कुलकर्णी हे नाव येत नाही तोपर्यंत तुमच्या मुलीचं, बहिणीचं नांव येत नाही तोपर्यंत, ती आपल्यासाठीही समस्या नाही. तर एक चर्वितचर्वणाचा विषय आहे. आणि ही चर्चा देखील एकतर्फी, सदोष आणि पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून केलेली.

एका मुलाने हत्या केली, तो हिंसक बनला आणि त्यामुळे समाजाचे वातावरण गढूळ बनले असे म्हणणे म्हणजे वरकरणी या समस्येची कारणे बघण्यासारखे आहे. कारण एक समस्या निर्माण झाली आहे म्हणजे त्यात चूक एकाची कधीच नसणार. त्यामुळे मारणाऱ्या मुलाबरोबरच मरणारी मुलगीही कारणीभूत आहे ? थोडंस आपल्या स्त्रीच्या पूर्वापार चालत आलेल्या संकल्पनांना इथं धक्का पोहचत आहे. हो, पण इथं मुलीचाही दोष असतो. हा दोष कदाचित् कायद्याच्या चौकटीत अडकणारा नसेल किंवा इतका सूक्ष्म असेल की आपल्याही नजरेतून तो सुटला असेल. पण दोष असतो. उलट हिंसेचे प्रकार म्हणजे एकतर्फी प्रेमातून मुलीकडून मुलाची हत्या असे प्रकार दिसत नाहीत म्हणून मुलीला दोषी न मानण्याचे काहीच कारण नाही. आणि फक्त मुलगा अथवा मुलगी याला कारणीभूत नसतात. तर त्यांचे आई-वडील, आजूबाजूची परिस्थिती, समाज म्हणजे तुम्ही-आम्ही आपण सगळे कारणीभूत आहोत. त्यामुळे याची कारण ही पूर्वग्रहदूषित दृष्टिकोणातून वरवर न बघता सखोल अभ्यास करुन शोधून काढली पाहिजेत.

याचं पहिलं कारण म्हणजे आमच्या आजच्या पिढीचे एखाद्या व्यक्तीपेक्षा 'प्रेमात पडणे' या संकल्पनेवर जास्त प्रेम आहे. त्यामुळे ज्याला आपण आपल्या नाजूक भावना देत आहोत त्याचे विचार, संस्कृती, सभ्यता, स्वभाव आपल्याशी मिळते-जुळते आहेत किंवा नाहीत असा सारासार विचार होत नाही. या भावनांच्या ओघात, प्रेमाच्या आकर्षणात सद्सद् विवेकबुद्धीला धरून असणारा विचार वाहून जातो. आणि अशा समस्या उद्भवतात.

पण आजच्या पिढीत प्रेमाबद्दल एवढे आकर्षण का निर्माण झाले ? एक कारण म्हणजे 'प्रसारमाध्यमे'. त्यांनी आज प्रेमाचा बाजार मांडला आहे. स्वप्नरंजन करायला लावून आजच्या युवापिढीला वास्तवापासून दूर नेण्याचे काम या प्रसार माध्यमांनी केल आहे. प्रेमाचे अतिरंजित चित्रीकरण करून, त्याचे स्तोम माजवून त्याला प्रतिष्ठेचा

एक मुद्दा बनवले आहे.

पण फक्त प्रसारमाध्यमे युवापिढीत प्रेमाबद्दल आकर्षण निर्माण करत नाहीत. कुठल्याही गोष्टीच आकर्षण तेंव्हाच निर्माण होत ज्यावेळेस त्या गोष्टीची आपल्याकडे कमतरता असते, ज्यावेळेस ती गोष्ट आपल्याकडे नसते. काहीसं आज प्रेमाचंही असच झाल आहे. आणि याला कारण आहे आजची कुटुंबव्यवस्था. आज पैश्याच्यामागे धावणाऱ्या आईवडिलांच्या भावनांच्या व्याख्या बदलल्या आहेत. भरपूर वस्तू आणून देणे, खर्च करायला प्रचंड पैसा देणे म्हणजे प्रेम आणि अत्यंत कडक शिस्तीत वाढवणे म्हणजे संस्कार अशा दोन परस्पर विरोधी भूमिकांमध्ये ते पाल्याला, मुलाला वाढवत आहेत. त्यांच्या दृष्टीने त्याचा मानसिक विकास, व्यक्तिमत्व विकास याला काहीही महत्त्व नाही आहे. या कोरड्या पैश्याने या समाजातल्या सगळ्या आईवडीलांच्या मनातला ओलावा शोषून घेतला आहे की ज्यामुळे मुल बाहेर कुठेतरी प्रेम शोधायचा प्रयत्न करतात. आणि समस्या उभ्या राहतात.

त्याचप्रमाणे शिक्षणसंस्था ! या घरानंतर संस्कार करणाऱ्या संस्था आहेत, त्यादेखील त्यांच्या पदरी निराशाच देत आहेच. या वस्तुनिष्ठ संस्कृतीला त्या पूरक ठरत आहेत. मुलांना मूलभूत तत्वांचे, विचारांचे संस्कार त्या देत नाहीत. या संस्था फक्त पैसे मिळवण्याची यंत्रे बनविण्याचा कारखाना होत आहेत.

पण या सगळ्यांचा त्या तरुणपिढीच्या मानसिकतेवर काय परिणाम होतो ? आजच्या यांत्रिक युगामुळे, वस्तुनिष्ठ संस्कृतीमुळे समोरच्या व्यक्तीला वस्तु, यंत्र मानतात. आपण अस वागल्यावर समोरची व्यक्ती अशीच वागणार असं गृहीत धरुन ही पिढी वागते की ज्यामुळे समोरच्या व्यक्तींचे स्वतंत्र व्यक्तिमत्व जणू ते अमान्य करतात. त्याचप्रमाणे एखादी गोष्ट आपली नाही हे जर वास्तव असेल तर त्याला सामोरे जाण्याचे सामर्थ्य या पिढीत नाही. त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमे काहीही प्रसार करीत असली तरी त्यातील खरे / खोटे बाजूला काढण्याची क्षमता यांच्यात नाही. आयुष्यात काही काळात भावनेपेक्षा कर्तव्ये महत्वाची असतात हे आचरणात नाही आणू शकत. त्यामुळे या आमच्या पिढीकडे फक्त एकलकोंडे पणा आहे, रितेपण एक असुरक्षिततेची भावना आहे, पण खरं प्रेम नाही. कारण खरंच प्रेम म्हणजे काय हे त्यांना समजले नाही.

यांच्याकडून अपेक्षा पण करण्यात अर्थ नाही. कारण त्यांना ते कधी अनुभवायला मिळालचं नाही. प्रेम म्हणजे निःशब्द भावना आहे, जी शब्दात नाही मांडता येत. आजच हे सर्वात दुर्दैव आहे की ती शब्दातून समजावून द्यावी लागते आहे, अनुभवायला नाहीच मिळत. कितीही मोठा असला तरी सर्वसामान्यांच्या प्रेमाला परिघ असतो. परिघ म्हणजे केंद्रबिंदू आलाच. तो केंद्रबिंदू असतो स्वतः प्रेम करणारा माणूस- ज्याचे प्रेम माझी नाती, माझी माणस, माझ्या वस्तू यामध्ये फिरत असते. त्याचे प्रेम या व्यक्ती, नाती, वस्तूंवर प्रेम नसते तर ते 'माझ्या' या शब्दावर असते. म्हणजे तो एक प्रकारे स्वतःच स्वतःवर प्रेम करत असतो. पण अशा प्रेमाने प्रेम वाढत नाही तर, अहंकार वाढतो, आत्मकेंद्रित माणूस निर्माण होतो.

असा हा अहंकार माणसाला खऱ्या निरपेक्ष प्रेमाकडून सदोष अशा अपेक्षापूर्ण प्रेमाकडे नेतो. मी इतक प्रेम केल तर त्यापेक्षा जास्त मला परत मिळावं तरच माझा फायदा झाला. अशा एका व्यावसायिक, व्यवहारिक, सौद्याच्या पातळीवर नेऊन ठेवतो.

आपल्या वस्तु तर सोडाच, पण चार प्रेमाचे शब्द द्यायला देखील आपण मागेपुढे पाहतो. कारण या वस्तूबरोबर आपला मोह जडलेला असतो. आपली आसक्ती असते. आपल्या मान-अपमानाच्या संकल्पना असतात. याच दोन माणसांमध्ये भिंती, अंतर निर्माण करतात. या सगळ्या संकल्पना, आसक्त्या, मोह यांच्या

---

आयुष्य हा एक बाजार आहे त्यात देवाण-घेवाण करावी लागते.

त्यागात प्रेम आहे. अहंकाराच्या समर्पणात प्रेम आहे. म्हणून प्रेम हे समर्पणात, त्यागात आहे भोगात नाही.

एखाद्या व्यक्तीचे आपल्यावर प्रेम असल्यावर त्याच्यावर प्रेम करणे म्हणजे प्रेम नाही. ज्या व्यक्तीचे तुमच्यावर प्रेम नाही तरी देखील त्याच्यावर प्रेम करणे यात तुमच्या प्रेमाचे खरे सत्त्व आहे. तरी देखील त्याच्या मांगल्याची प्रार्थना करणे हे प्रेम आहे.

आणि असे प्रेम कधीच दुःखाला कारणीभूत होत नाही. प्रेम म्हणजे फक्त आनंद, चिरकाल टिकणारा, आजूबाजूच्या व्यक्ती आणि परिस्थितीवर अवलंबून नसणारा आत्मानंद.

या समस्येतील आरोपींना अस प्रेम समजावून द्या. त्यांना कडक शासन देऊन हिंसेने हिंसा वाढवू नका, तर प्रेमाने ती कमी करा. त्यांना मृत्यूकडे न नेता मोक्षाकडे न्या. त्यांना प्रेम करणारी मीरा समजावून द्या. मीरा, जी तिच्या काळात एकतर्फी प्रेमात वेडी म्हणून प्रसिद्ध होती. पण नंतर तीच प्रेमाचा आदर्श ठरली. जेव्हा त्यांना अशी स्थल, काल, वय यांच्या पलीकडे प्रेम करणारी मीरा समजेल तेव्हा एकतर्फी प्रेम ही त्यांच्यासाठी समस्या उरणार नाही, तर ती एक महान साधना होईल, समाधी होईल.

**रेणुका सतीश कुलकर्णी**
सी-७, श्रीराम पार्क, नाईक पुलाजवळ,
कोथरुड, पुणे - ४११०२९.
दूरध्वनी : ९५२०-५४६ ०६६५

*सदर भाषण समर्थ सेवक मंडळाने नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धा समितीच्या सहकार्याने प्रकाशित केले आहे. - संपादक*

०००

## सौ. सरोजिनी टिल्लू यांचे देहावसन



*'दिशा' चे संपादक व विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या शैक्षणिक संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. अचलकुमार धों. टिल्लू यांच्या सुविद्य पत्नी सौ. सरोजिनी टिल्लू यांचे शनिवार दिनांक २८ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. तुर्भेच्या भाभा अणूशक्ती केंद्रात F.R.D. विभागात ३४-३५ वर्षे काम करुन निवृत्त झालेल्या सौ. सरोजिनी या ६३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक विवाहित कन्या, जावई व नात असा परिवार आहे.*

*त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वराजवळ प्रार्थना !*

*- कार्यकारी संपादक*

# काही क्षण

काही क्षण,
एकट्यानेच अनुभवायचे असतात
तहानलेल्या चातकासारखे
पावसाची वाट पहात.
एकट्यानेच प्राशन करायचे असतात
काही क्षण....

काही क्षण,
तप्त रणरणत्या वाळवंटातील
मृगजळासारखे
नजरेशी लपंडाव खेळणारे
क्षणिक का होईना
पांथस्थाला सुख देणारे
काही क्षण,
स्वतःच अनुभवायचे असतात
काही क्षण ....

काही क्षण,
वादळापूर्वीच्या शांतते सारखे,
धीर गंभीर
एकट्यानेच,
चाहूल घेत अनुभवायचे असतात
काही क्षण ....

काही क्षण,
विरघळणाऱ्या उसासेसारखे
वाहणाऱ्या अश्रुंसारखे
मनात सलणाऱ्या दुःखा सारखे
काही क्षण ....

काही क्षण,
फुटणाऱ्या पालवीसारखे
वाहणाऱ्या झऱ्यासारखे
गाणाऱ्या कोकिळे सारखे
सुखाचे,
काही क्षण ....

काही क्षण,
पानावरच्या दवबिंदुसारखे
पावसाच्या सरी सारखे
इंद्रधनुष्या रंगासारखे
स्वतःच रेखाटायचे असतात,
काही क्षण ....

काही क्षण,
मोड मोडीच्या कळी सारखे
फुलण्यासाठी आसुसलेले

काही क्षण,
हे सर्वांसाठी
तर काही, आपल्यासाठी
स्वतःच फुलवायचे असतात
म्हणून काही क्षण
हे स्वतःच फुलवायचे असतात.

क्षमा वैद्य
तृतीय वर्ष विज्ञान
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे.

❊❊❊

# सामाजिक समतेच्या तराळ्यास

*मराठीतील नामवंत ग्रामीण साहित्यकार शंकरराव खरात यांचे ९ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या एका वाचकाने त्यांना केलेले हे अभिवादन प्रतिनिधिक म्हणून प्रकाशित करीत आहोत. - संपादक*



शंकरराव खरात

रामा खराताच्या घरात शंकर जन्मा आल्याची 'दौंडी' पिटली. 'हातभट्टी' जवळ करुन आनंद व्यक्त झाला. आनंद 'वस्ती', 'पारधवस्ती' दीनदुबळ्यांशी वाटला. बारावलुतेदारीत जन्म घेतला पण कर्माला ते मान्य नव्हते.

हालाखींचं जिणं जगताना शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव झाली. शिक्षणासाठी गावातून 'तडीपार' होऊन बी.ए. एल.एल. बी. झाले.

शहरात गावपण विसरता आलं नाही. 'गावशीव', 'आडगावचंपाणी', ह्या 'गावाकडच्या गोष्टी' आठवतच सतत रहायचं.

तथाकथित उच्चभ्रूंशी उठ-बस असूनही मन 'झोपडपट्टी', 'फुटपाथ नं१', अस्पृश्य, भटक्या विमुक्त जमाती, गुन्हेगार जमात, मागासवर्गीय, भूमीहीन, शेतकरी, शेतमजूर, नवबौद्ध ह्या हीनदीनांतच रमलं.

शासनान 'दलित मित्र' म्हटलं, 'डी.लिट' पुणे विद्यापीठान !

'अंतरातला तराळ' नष्ट करण्यासाठी आयुष्य वेचलं. साहित्यिक, नेता अशा भूमिका रंगवताना 'मसालेदार गेस्ट हाऊस' चा मोह कधी सुटला नाही. 'दलित' म्हणून जन्माला आलो यात 'माझा काय दोष?' म्हणुन कुलगुरुपद असो वा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष पद 'लायक ' म्हणूनच स्वीकारलं, दलित म्हणून नव्हे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सहवासात राहून त्यांच्या स्वप्नातला 'प्रबुद्ध भारत' निर्मिण्यासाठी आयुष्य वेचलं.

साहित्यिक होऊन 'मुलाखत' घेतली. पण स्वाभिमानाचा 'लिलाव' कधी केला नाही. सन्मान, मोठेपण मिळाले, '' आज इथे तर उद्या तिथे'' आयुष्यभर साधेपणात राहिले. 'टिनोपाल गुरुजी' 'बन्याची दिंडी', 'टाऊट' ह्या कादंबऱ्या लिहल्या तरी 'मी माझ्या गावाच्या शोधात' असेच ते म्हणत.

स्वातंत्र्य मिळूनही सामान्य माणसाचा जीवनदर उंचावला नाही. त्यामुळे 'स्वातंत्र्य कुणाच्या दारी?' हा प्रश्न त्यांना सतत पडे. 'टिटवीचा फेरा', 'सांगावा' घेऊन आला. 'मी मुक्त मी मुक्त' म्हणत त्यांनी -भ्रष्टाचारी दुनियेतून स्वतःची 'सुटका' करुन घेतली. सामाजिक समतेचा ध्यास घेऊन 'अंतराळातून तराळकी' करणाऱ्या 'तराळाला' अभिवादन !

**सुधीर ह. शेरे**
शिक्षक, सरस्वती सेंकडरी स्कूल (मराठी), म.गांधी पथ, नौपाडा, ठाणे

***

# कालिदासांची विरहवर्णनें

*दि. २२ जून रोजी महाकवी कालिदास दिन येत आहे, त्यानिमित्त संस्कृत साहित्याचा अभ्यास असणाऱ्या सुनीता खरे यांचा हा लेख देत आहेत. - संपादक*

कालिदासांचे वाङ्मय वाचले की शृंगार आणि करुण या रसांचा परिपोष करण्यांतील त्याचे नैपुण्य आपणास अतिशय लोभावून सोडते. संभोग आणि विप्रलंभ हे शृंगाराचे दोन्ही प्रकार तो तितक्याच प्रभावीपणे वर्णन करतो. त्याची लेखणी कुशल चित्रकाराच्या कुंचल्यासारखे काम करुन वर्ण्य विषयांची यथातथा चित्रेच आपल्यासमोर सादर करतो. त्याच्या विरहवर्णनांचा विचार करायचा तर विक्रमोर्वशीयम् नाटकात उर्वशीचें लतेमध्यें रुपांतर झाल्यावर राजा पुरुरवा तिचा शोध घेतो तो भाग, कुमारसंभवांतील रतीविलाप, रघुवंशांतील अजविलाप आणि संपूर्ण मेघदूत यांचा विचार करावा लागेल.

विक्रमोर्वशीयम्मध्ये राज्यकारभार आपल्या मंत्र्यावर सोंपवून राजा पुरुरवा विलासासाठीं उर्वशीबरोबर गंधमादन पर्वतावर जातो. तेथें उदयवती नांवाच्या एका विद्याधरकन्येवर चंचल पुरुरव्याची साभिलाष नजर जाते. त्यामुळें उर्वशी रागावते व पुरुरव्याच्या क्षमायाचनाकडे दुर्लक्ष करुन रागारागाने निघून जाते. रागाच्या भरात अनवधानानें ती कुमारवनांत शिरते. कोणीही स्त्रीने या वनामध्यें प्रवेश केला तर तिचें वेलीमध्ये रुपांतर होईल असा तेथे निवास करणाऱ्या कुमार कार्तिकेयाचा नियम असतो. त्यानुसार उर्वशीनें तेथें प्रवेश करताच तिचें एका लतेमध्ये रुपांतर होते.

इकडे उर्वशी दिसेनाशी झाल्याने पुरुरवा तिच्या विरहाने वेडापिसा होतो. तिचा शोध घेत तो कुमारवनांत फिरु लागतो. वाटेतील पशु पक्षी यांनाही तो उर्वशीचा ठावठिकाणा विचारतो. हा त्याचा उर्वशीशोध कालिदासाने अत्यंत काव्यमय, रमणीय अशा रीतीने चितारला आहे. एका जांभळाच्या झाडावर बसून जांभळें खात असलेल्या कोकिळेला तो म्हणतो '' तू कामी लोकांची मदनदूती आहेस. रुष्ट प्रिया आणि तिचा प्रियकर यांचा समागम तू घडवून आणतेस. म्हणून माझी तुला अशी प्रार्थना आहे की तू माझी व माझ्या प्रियेची गाठ घालून दे.'' ती त्याच्याकडे दुर्लक्ष करीत आहे असे वाटून तो म्हणतो, '' बघा, परदुःख शीतल असते ते असे. असो. दुसऱ्याच्या दुःखांत सुख मानणाऱ्या या कोकिळेशी मी बोलत नाही. मी पुढे जातो '' असे म्हणून तो पुढे सरकतो. तो कोकिळेला शिक्षा करीत नाही कारण तिने जरी त्याच्याबद्दल सहानुभूति दर्शविली नसली तरी तिचा स्वर उर्वशीच्या स्वरासारखा मंजुळ असतो. नंतर त्याला दक्षिणेकडून पैंजणांचा आवाज ऐकू येतो. उर्वशी त्या बाजूस आहे असे त्याला वाटते न वाटते, तोच मानस सरोवराकडे जाणारे हंस त्याला दिसतात. त्यांचे कूजित पायांतील पैंजणांसारखे होते. पुरुरवा एका हंसाकडे जातो. येथील संभाषणही अत्यंत मनोरम आहे. तो हंसाला म्हणतो, ' हे पक्षिराजा, मानस सरोवराला नंतर जा. आधी माझे काम कर. तुझ्यासारख्या सज्जनांना स्वार्थापेक्षा परार्थ श्रेष्ठ वाटतो. तेव्हा माझी प्रिया तुला कोठे दिसली होती का हे प्रथम सांग. काय म्हणतोस, ' मी माझ्या जाण्याच्या गडबडीत असल्यामुळे तुझी प्रिया पाहिली नाही' पण हे तुझे बोलणे मुळीच योग्य नाही कारण जर उर्वशीला तू पाहिलेंच नसशील तर तिची डौलदार चाल तू कशी आत्मसात केलीस ? तू तिची चाल चोरली आहेस तेव्हा माझी प्रिया मला परत दे. चोरीला गेलेल्या मालापैकी एक वस्तू जरी चोराजवळ सापडली तरी तो सर्व माल त्यांने चोरला आहे असं समजावे लागते व त्याची भरपाई द्यावी

लागते. '' आता हंस उडून जाऊ लागला तेव्हा राजा उद्गारतो 'बरोबर आहे. हा चोरांना शिक्षा करणारा राजा आहे तेव्हा आपण येथून जाणे योग्य होय असे याला वाटले असावे.

ह्या सर्व वर्णनामध्ये कवीने पक्षी पशु इत्यादिकांवर मानवी गुणांचे आरोपण अतिशय काव्यात्मकतेने केले आहे. एकाच घटनेकडे वेगवेगळ्या दृष्टीकोनातून पाहून त्याच्या दोन्ही बाजूंचे वर्णन करण्याचा कालिदासाचा गुण वाखाणणी करण्या जोगा आहे. राजा स्वतःच्या दुःखामुळे मानव आणि अमानव यांच्यात भेद करु न शकल्यामुळे हे गुणारोपण स्वाभाविक वाटते. रामायणातही रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर राम शोक करतो असा प्रसंग आहे. त्यात तो वृक्षवेलींशी अशा प्रकारे बोलतो असे चित्रण आहे. कदाचित उपरोक्त वर्णन हे रामायणातील वर्णनावरच बेतलेले असणे शक्य आहे. मेघदूतातील यक्षसुद्धा मेघाला सजीव कल्पूनच त्याचेजवळ आपल्या प्रियेकरिता निरोप देतो.

कुमारसम्भवमध्ये प्रजापतीला स्वतःच्या मुलीबद्दल लालसा मदनामुळे निर्माण होते त्यामुळे प्रजापती मदनाला शाप देतो. त्यानुसार तो शिवाच्या क्रोधाला बळी पडतो. शिव आपला तिसरा नेत्र उघडून मदनाचे दहन करतो. ह्या मदनदहनामुळे मदन पत्नी रती दुःखी होऊन विलाप करते. रतीविलापाचे हे श्लोक अत्यंत रसाळ असून प्रसाद ह्या काव्यगुणाचे हे उत्तम उदाहरण आहे. रतीविलाप वाचून त्याच्या डोळ्यात अश्रू उभे रहात नाहीत असा सहृदय वाचक विरळा असे महामहोपाध्याय वा.वि. मिराशी यांनी लिहून ठेवले आहे. प्रथम तर ती बेशुद्धच झाली. शुद्धीवर आल्यानंतर ती मदनाचे वेगवेगळे गुण आणि विलास आठवून शोक करु लागली. ती म्हणते ' तूं माझ्या हृदयात वसत आहेस असे तू मला खरे वाटण्यासाठी म्हणत होतास पण ते खोटे होते हे माझ्या आता लक्षात येत आहे. तसे नसते तर तू देहरहित झाल्यावरही रतीचा देह शिल्लक कसा राहिला असता ? क्षणमात्र का होईना रती मदनाशिवाय जिवंत होती असे लोक म्हणतील. तिला ते असह्य होईल म्हणून ती पतीमागोमागच स्वर्गात जाऊ इच्छिते. कौमुदी नाही का चंद्राबरोबर असते ? वीज मेघाबरोबर असते ? स्त्रीसुलभ मत्सरामुळे तिच्या मनांत विचार येतो की स्वर्गातील अप्सरांनी मदनाला मोहविण्यापूर्वीच तिने पतंगरूपानें मदनाच्या अंकावर असावयास हवें.

रतीला अशी शोक निमग्न पाहून वसंतऋतु मदनाचा सखा तिचें सांत्वन करण्यासाठी पुढें सरसावतो पण त्याला पाहून अधिकच दुःखविह्वल होते. सहाजिकच नाही का ? जवळच्या माणसाजवळ दुःख वेगानें मोकळे होते. ( स्वजनस्यहि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते ) ती वसंताला सांगते की '' तूं पूर्वी वारंवार आमच्या शय्येवर फुलांच्या रचना करण्यास मदत केली आहेस. आत त्वरित माझ्यासाठी चिता तयार कर. ती पटकन जळावी म्हणून मलयवाऱ्याची मदत घे. तुला माहीतच आहे की मदन माझ्याशिवाय एक क्षणभरही राहू शकत नाही. नंतर तू आम्हाला दोघांना मिळून एकच पुष्पांजली तर्पण कर.

रसाविष्कार आणि रम्यपणा तसेंच प्रासादिक रचना ह्या बाबतीत रतीविलापाची अजविलापाशं तुलना करणे उचित ठरेल. रघुवंशातील राजा अज आपली पत्नी इंदुमती हिचेसह उपवनात विहार करीत असतांना त्यावेळी आकाशमार्गाने श्री शंकरांच्या दर्शनासाठी जात असलेल्या नारदमुनींच्या वीणेवरील दिव्य पुष्पांची माला वाऱ्याच्या झोतामुळे निसटते व इंदुमतीच्या वक्षःस्थलावर पडून इंदुमतीचे प्राण हरण करते. अज अत्यंत दुःखी होऊन विलाप करु लागतो.

'' माला जर जीवनहरण करणारी असेल तर मी स्वतःही माझ्या हृदयावर ठेवली असता मला का मारीत नाही ? अथवा ईश्वरेच्छेने विषाचे अमृत वा अमृताचे विष होते हेच खरे किंवा ही माला ब्रह्मदेवाने विद्युत् म्हणून कल्पिली असावी की जिने वृक्ष पाडण्याऐवजी त्या वृक्षाचा

आधार घेतलेली वेल उखडून टाकली."

" अथवा मम भाग्यविप्लवादशनिःकल्पित एष वेधसा ।
यदनेन तरुर्न पातितः क्षपिता तद्विटपाश्रिता लता ॥"

दिवसभराच्या विरहानंतर रजनी पुन्हां चंद्राकडे येते, तसेच वेलीचे पानमध्ये आल्यामुळे विरहावस्था भोगणाऱ्या चक्रवाकाकडे त्याची प्रिया काहीकाळाने परत येते त्यामुळे ते दोघे विरह सहन करु शकतात. तू मला कायमची सोडून गेली आहेस, तेव्हा हे दुःख मी कसे सहन करु ? तू माझी गृहिणी, मंत्री, एकांतांतील सखी व माझी प्रियशिष्या होतीस. निर्दय मृत्यूने तुझे हरण करुन माझे सर्वस्वच नेले आहे.

रघुवंश हे अत्यंत प्रासादिक काव्य असल्याने तसेच त्यात विविध रसांचे पोषण केलेले असल्यामुळे ते सर्व संस्कृतज्ञांना प्रिय झाले आहे. त्यावर तेहतीस टीका लिहिल्या गेल्या आहेत तसेच कालिदासाने इतर उत्कृष्ट काव्ये व नाटके लिहिली असली तरी संस्कृत सुभाषितकार व ग्रंथकार त्याचा 'रघुकार' असा उल्लेख करतात ह्या दोन गोष्टींनीच रघुवंशाची लोकप्रियता स्पष्ट होते. सोड्ढल कवीने आपल्या 'उदय सुंदरीकथा' ह्या चम्पूग्रंथात निरनिराळ्या कवींचे विशेष सांगितले आहेत. त्यात त्याने कालिदासाला रसेश्वर असे म्हटले आहे. रघुवंशात प्रायः सर्वच रसांचा परिपोष केलेला आढळतो. कालिदासाची भाषा प्रसादगुणयुक्त आहे असा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. कालिदास जागोजागीं उपमा, उत्प्रेक्षा, अर्थान्तरन्यास इ. अलंकारांची पखरणही करतो. वृत्तांचा यथोचित वापर हे ही एक कालिदासीय वैशिष्ट्य मानता येईल. अजविलाप व रतीविलाप ह्या दोन्हींसाठी त्याने वैतालिय हे वृत्त वापरले आहे जे शोकाविष्कारासाठी अत्यंत प्रभावी आहे. मेघदूतात त्याने वर्षाऋतु, प्रवास व शापोध्दव विरहाचे वर्णन केल्यामुळे त्या साठी प्रभावी असलेले मन्दाक्रान्ता हे वृत्त योजिले आहे. (प्रावृद, प्रवास, व्यसने मन्दाक्रान्ता विराजते।)

कालिदासाच्या मेघदूतामुळे संस्कृतात एक नवा काव्यसंप्रदायाच सुरु झाला. वायुदूत, भ्रमरदूत, चक्रवाकदूत इ. अनेक दूतकाव्ये उदयास आली. या काव्यांमध्ये मनुष्य, शुक, कोकिळ यासारखे पक्षी, चंद्र, वायु वगैरे अचेतन पदार्थ तसेच मन, भक्ती इ. अमूर्तांनाही दूत कल्पिले आहे व त्यासाठी मन्द्राक्रान्ता वृत्ताचाच वापर केला आहे. मेघदूताला पूरक अशीही दोन काव्ये निर्माण झाल्याचे उल्लेख आढळतात. 'मेघप्रतिसंदेश' यामध्ये यक्षपत्नीने मेघामार्फत प्रियकराला उलट संदेश पाठविला आहे तर ' मेघदौत्य' मध्ये यक्षपत्नीने मेघामार्फत कुबेराला विनंती करुन पतीची सुटका केल्याचा कथाभाग आहे. ८व्या शतकातील जैन कवी जिनसेन याने आपल्या 'पार्श्वाभ्युदय' नावाच्या काव्यात मेघदूतातील प्रत्येक ओळ समस्यापूर्तीप्रमाणे घेतली आहे. मेघाला मार्ग सांगतेवेळीं अनेक देश, नगरे, पर्वत, नद्या इ. चे रम्य वर्णन येते. हे सर्व वर्णन भौगोलिक दृष्ट्या अचूक असल्यामुळे ह्या काव्याला ऐतिहासिक दृष्ट्याही महत्त्व प्राप्त झाले आहे.

कालिदासाचे ग्रंथ भाषांतररुपाने युरोपात गेल्यावर कांही युरोपीय लेखकांनाही त्यांनी प्रभावित केल्याचे जाणवते. शाकुंतलाचे भाषांतर वाचल्यावर प्रसिद्ध जर्मन कवि गटे याला आपल्या 'फाउस्ट' या जगप्रसिद्ध नाटकाच्या आरंभीं संस्कृत नाटकाप्रमाणे प्रस्तवना घालावीशी वाटली. दुसरा जर्मन कवी शिलर याने मेघदूत वाचल्यावर रचलेल्या आपल्या 'मारिआ स्टुअर्ट' या काव्यात कैदेत असललेल्या स्कॉटलंडच्या राणीने आपल्या कारागृहांतून एका मेघाला स्वदेशी संदेश देऊन पाठविले असे संविधानक घातले आहे.

सूचकता हा कालिदासाच्या वाङमयाचा प्राण आहे असे म्हणता येईल. मदन दहनानंतर वसंतागमन झाल्यावर रति अधिकच शोक करु लागली ही उत्प्रेक्षा वापरली आहे. या एवढ्याशा शब्दांतून 'बांध काढून घेतल्यामुळें धो धो

वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे दुःखाचा अनावर झालेला ओघ' कालिदासाने सुचविला आहे. मेघदूतातही त्यानें यक्षपत्नीला पडद्याआडच ठेवली आहे असे दिसते. कालिदासाने योजिलेले प्रत्येक पद नितांत रमणीय आणि बहुअर्थवाहक असते हे आनंदवर्धन आणि मम्मट यांनी अनेक उदाहरणे देऊन दाखवून दिले आहे. बरेच संस्कृतज्ञही या मताशी सहमत आहेत. कित्येकांचे तर असे मत आहे की कालिदासाने लिहिलेले मेघदूत सुंदर आहे पण त्याने न लिहिलेले (नुसतेच सुचविलेले) मेघदूत त्याहूनही सरस आहे.'

संभोग आणि विप्रलंभ शृंगार व करुण रस यांचा उत्तम परिपोष कालिदासाच्या विरहवर्णनांमध्ये पहावयास मिळतो. शृंगाररसाच्या परिपोषातील त्याची निपुणता पाहूनच त्याला जयदेवाने 'कविता कामिनीचा विलास' म्हटले आहे. 'कारुण्यम् भवभूतिरेव तनुते ' असें म्हणतात परंतु रतीविलाप किंवा अजविलाप वाचून प्रत्येकाचेच हृदय हेलावून जाते. त्याउलट भवभूतीच्या ज्या नाटकामुळे त्याचे वर उल्लेखिल्याप्रमाणें वर्णन केले जाते तें उत्तमरामचरित वाचतांना करुण रसाचा असा उत्कट अनुभव येत नाही. किंबहुना नायक रामाच्या बेशुद्ध होण्याने नायकाच्या धीरगंभीर व्यक्तिरेखेस बाधा पोहोचते. नाटक पाहून श्रोते शोकविव्हल होत असल्यास ते अभिनेत्याचे ही यश होय असे वाटते. कारण नाटक वाचल्याने हा परिणाम दिसत नाही. म्हणून उत्तमरामचरितामार्फत होणाऱ्या करुणरस परिपोषांचे श्रेय एकट्या लेखकाला देता येत नाही. कालिदास मात्र याबाबतीत संपूर्ण यशाचा मानकरी ठरतो. यक्षाने केलेले विरहिनी पत्नीचे, उज्जयिनी नगरीचे, अलकेपर्यंतच्या प्रवासात मेघाला जी ठिकाणे दिसणार आहेत त्या सर्वांचे वर्णन मूळातूनच वाचण्याजोगे आहे.

विन्ध्यपर्वताच्या पायथ्याच्या खडकाळ प्रदेशातून वाहणाऱ्या नर्मदा नदीच्या प्रवाहाला कालिदासाने तीच्या अंगावर काढलेल्या चित्रविचित्र रंगाच्या वेलबुट्टीची उपमा दिली आहे. चर्मण्वती नदी व तिचे पाणी पिण्यासाठी वाकलेला नीलमेघ याचे, त्याने इन्द्रनील मणि घातलेला पृथ्वीचा मोत्यांचा हार असे वर्णन केले आहे. कालिदासाच्या नायिका कलानिपुण आहेत. यक्षपत्नी तर विरहदुःख हलके करण्याकरितां पतीचे नाव गोवलेली गाणी रचते व ती वीणेवर वाजवते, विरहाने कृश झालेल्या पतीच चित्र काढते, सायंकाळी अंगणातल्या रत्नखचित सुवर्णयष्टीवर बसलेल्या मोराला मधुर तालस्वराने नाचविते.

उपरोक्त सर्व कालिदासीय गुणविशेष पहाता असे वाटते की इंग्रजी वाङमयात जे स्थान शेक्सपिअरचे, जर्मन साहित्यात जे स्थान गटेचे, इटालियन वाङ्मयांत जे स्थान डांटेचे तेच स्थान भारतीय वाङ्मयांत कालिदासाने भूषविले आहे. त्याला कविकुलाचा गुरु म्हणून संबोधिले जाते. उत्तम नाटककार व सर्वश्रेष्ठ कवी म्हणून त्याची कीर्तिपताका जगभरात फडकत असते. 'उपमा कालिदासस्य' हे सर्व भारतीय मान्य करतात. त्याने केलेली उपरोक्त विरहवर्णने वाचली की त्याच्या श्रेष्ठत्वाबाबत शंकाच उरत नाही. अनामिका सार्थवतीच आहे हे मनापासून पटते.

**सौ. सुनीता खरे**
सहाय्यक ग्रंथपाल, मुंबई विद्यापीठ,
कालिना, सांताक्रुझ, मुंबई

●●●

---

'मिराशी, वा. वि. : 'कालिदास' ३ री आ. मुंबई. महाराष्ट्र राज्य सहित्य संस्कृति मंडळ, १९७५ पृ. २१६

---

जे गैरहजर असतात ते नेहमी चुकत असतात.

# महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व-पु.ल. देशपांडे

*पु.ल. च्या कर्तृत्वाचा ठाव घेण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यांचे असंख्य चाहते आहेत. असंख्यांना त्यांच्याबद्दल बोलावे, लिहावेसे वाटते. त्यातील काही प्रतिनिधिक भावना. - संपादक*

'' झाले बहु, होतील बहु, परंतु या सम हा '' हे वर्णन कविवर्य मोरोपंतांनी माननीय पु.ल. देशपांड्यांसाठी जणू काही दोनशे वर्षांपूर्वीच लिहून ठेवले आहे असे वाटावे इतके ते त्यांना चपखल बसते. उत्कृष्ट विनोदी लेखक आणि साहित्याच्या अनेक दालनात स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटविणारे साहित्यिक, चांगले वक्ते, अभिनय संपन्न नाट्य आणि चित्रपट अभिनेते, चांगले दिग्दर्शक, गान रसिकांना लुब्ध करील असे चांगले अभिजात रागदारी व सुगम संगीत देणारे संगीत दिग्दर्शक, प्रतिभा संपन्न कवी, कथाकार आणि संवाद लेखक, उत्कृष्ट हार्मोनियम पटु, रागदारी संगीताबरोबर नाट्यसंगीतही स्वतः गाऊ शकणारे व्यासंगी गवयी असे अनेक पैलू असलेला हा हिरा निःसंशय अद्वितीयच म्हणावा लागेल.

असे अनेक पैलू असले तरी त्यांना 'महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व' म्हणवून घेण्याचा सन्मान लाभला तो त्यांच्या विनोदी लिखाणामुळे आणि त्यांच्या अत्युत्कृष्ट सादरीकरणामुळेच होय ! विनोदी लेखन आणि त्याचे सादरीकरण याबाबत ते सुरुवातीच्या काळात आचार्य अत्रे यांना गुरु मानीत असत. परंतु आचार्य अत्र्यांनी आपल्या लिखाणाने अनेकांची मने दुखावली व परिणामी त्यांना स.प. महाविद्यालयात ''स्वातंत्र्यवीर की स्वातंत्र्यवैरी'' या लेखाबद्दल मार खावा लागला. भाईसाहेबांवर (पु.लं. ना बरेच लोक याच नावाने ओळखीत असत.) अशी वेळ कधीच आली नाही.

तस त्यांनाही पहिल्या काही काळात लोकांच्या प्रक्षोभाला पळी पडावे लागले- नाही, असे नाही '' तुज आहे तुज पाशी'' या त्यांच्या तथाकथित आचार्यांचे पितळ उघडे करून दाखविणाऱ्या नाटकात, गीतेतील 'स्थितप्रज्ञ' या निरतिशय उदात्त कल्पनेची हेटाळणी केल्यामुळे आणि अचलकरंजी येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून 'ब्युटिफुल संस्कृत' म्हणून संस्कृत भाषेची टिंगल करून '' रेल्वे सिग्नल' याला अग्निरथ गमनागमन सूचक ताम्र पट्टिका असा पर्यायी संस्कृत शब्द असल्याचे सांगून मराठी भाषा शुद्धी करणाच्या कल्पनेची टवाळकी केल्यामुळे त्यांना लोकक्षोभाला बळी पडावे लागले होते. या भाषणात त्यांनी प्रा. रघुवीर यांच्या शब्दकोशात रेल्वे सिग्नल या इंग्रजी शब्दाला ''अग्निरथ गमनागमनसूचक ताम्रपट्टिका'' असा प्रतिशब्द सुचविला आहे असे सांगितले व हा प्रतिशब्द उच्चारीपर्यंत आगगाडी निघूनही जाईल अशी टवाळी केले. परंतु प्रा. रघुवीर यांच्या शब्दकोशात अशा प्रकारचा प्रतिशब्द सुचविलेला नाही - तर 'संकेत' किंवा 'संज्ञप्ति' असे सुटसुटीत शब्द सुचविले आहेत. हे आता उघड झाले आहे. (संदर्भ -ऑगस्ट २००० च्या 'धर्मभास्कर मासिकाच्या अंकातील लेख' ) परंतु टवाळकी व विनोद यांची जवळिक समर्थ रामदासांच्या काळापासूनची आहे. आणि त्यातून हिंदूंचे धर्मग्रंथ त्यांच्या देवदेवता, संस्कृत भाषा आणि भाषाशुद्धीसारख्या कल्पना यांची टवाळकी करण्याने बहुजनसमाज सुखावतो असे वाटण्याचे दिवस, त्यामुळे भाईसाहेबांना पहिल्या काही काळात असा मोह झाला असल्यास नवल नाही. परंतु महत्त्वाची गोष्ट ही की नंतरच्या काळातील त्यांच्या हरितात्या, अंतू रविवारची कहाणी, या सारख्या लिखाणात संस्कृतांतील अवतरणे आलेली आहेत.

या नंतरच्या काळात भाईसाहेबांनी व्यक्तीचे आणि समाजाचे दोष मार्मिकपणे दाखवितांना जे सहृदय लिखाण-विनोदी बाज असूनही-केले त्याला मराठी सारस्वतात तोड नाही. त्यांचा 'अंतू बरवा' वाचतांना किंवा अैकताना रत्नागिरीच्या त्या मधल्या आळींतील चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणांना देखील गुदगुल्या झाल्याशिवाय राहिल्या नसतील. अी गोष्ट 'अंतू बरवा' चीं तीच त्याच्या इतर शब्दरूप व्यक्ती आणि वल्लींची. या बाबत एक अुदाहरण मुद्दाम सांगण्यासारखे आहे. '' आंतरजातीय विवाहात, सी.के.पी. जातीकडे नेहमी वधूपक्षच असतो '' असे 'यांही' (असामी असामी) म्हणजेच भाई साहेबांनी म्हटले तरी सी.के.पी लोकांना राग आला नाही. पण 'सी.के.पी. मुलांपेक्षा सी.के.पी. मुलीच अधिक स्मार्ट असतात' असे शिरीष कणेकरांनी म्हटल्याबरोबर, त्यांना 'अहो, मी पण सी.के.पी. मुलगाच आहे' असा खुलासा करून सी.के.पी तरुणांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या. भाअीसाहेबांच्या 'विशाल महिला मंडळाच्या कल्पनेचा किंवा डोक्यावर दासबोधसारख्या जाडजूड ग्रंथाचे ओझे ठेवून आपली चाल रुबाबदार करण्याचा विवाहित महिलेच्या कल्पनेचा महिलांना कधी राग आला नाही. कुठे समारंभाला जाअून आल्यावर 'कुठ्ठे मेल जाण नको नि येण नको' असं अैकल्याबरोबर सोडून ठेवलेल्या कोऱ्या पातळाची घडी न सांगता आणि न कुरकुरता करू लागेल तोच खरा आदर्श नवरा !! (पुन्हा असा मी असा मी) असे भाअीसाहेबांनी लिहिले तरी छोट्या आणि मोठ्या सर्वच महिलानी त्याबद्दल त्यांना जाब विचारला नाही. दुसऱ्या कोणी पुरुषी अहंकारी अिसमाने असे लिखाण केले असते तर जागोजागच्या महिला मंडळांनी त्याच्या निषेधाचे ठराव पास केले असते. परंतु भाअीसाहेबांच्या बाबतीत असे काही झाले नाही. कारण विनोदाच्या अवगुंठनांतील ही प्रच्छन्न टीका सहृदयतेने केलेली होती. दोष नाहीसे व्हावेत परंतु व्यक्ती किंवा समाज नाहीसे होअू नयेत हा त्या मागे हेतू होता.

त्यांच्या विनोदी लेखनाचे आणखी अेक वैशिष्ट्य-जे त्यांच्या गुरुंना बहुतांश वेळा पाळता आले नाही-ते म्हणजे, त्यांच्या लिखाणात अश्लीलता किंवा बीभत्सपणा कधीही डोकावला नाही. वेळगावच्या रावसाहेबांसारख्या शिवराळ माणसाच्या तोंडातल्या शिव्यासुद्धा त्यांनी अशा पद्धतीने घातल्या की रावसाहेबांना काय बोलायचे होते ते तर पूर्ण पणे कळावे पण सदभिरुचीला बाध येअू नये.

भाईसाहेब 'कोट्याधीश' नव्हते, पण 'कोट्याधीश' होते. स्वतःच्या शारीरिक दुःखातही त्यांना विनोद सुचला. त्यांचा पाय कसल्याशा दुखण्याने अतिशय सुजला होता. त्या सुजून फुगलेल्या पायाकडे बघून ते म्हणाले,' हिंदीमध्ये पायाला पाव का म्हणतात हे मला आत्ता कळाले.'

विनोद नसेल तेव्हाही त्यांचे लिखाण व बोलणे रोचक होते. त्यांनी लिहिलेली 'अपूर्वाई' 'पूर्वरंग' वगैरे प्रवासवर्णने विनोदी व रोचक अशा लिखाणाची अुत्तम अुदाहरणे आहेत. त्यांच्या रोचक बोलण्याचा अेक किस्सा सांगण्यासारखा आहे. डोंबिवली येथील कार्यक्रमात सुप्रसिद्ध व्हायोलीन वादक श्री. प्रभाकर जोग यांनी 'पराधीन आहे जगती ' हे गीतरामायणातील गीत व्हायोलिनवर अुत्तम रित्या सादर केले. त्यानंतर त्याच कार्यक्रमांत या सादरीकरणाचे कौतुक करतांना पु.ल. म्हणाले, 'मनुष्य पराधीन आहे हे माहीत होते पण तो इतका स्वराधीनही असतो हे माहीत नव्हते.' श्रोत्यांना प्रभाकर जोगांनी सादर केलेल्या गीताइतकेच हे त्याचे कौतुक आवडले हे सांगणे नकोच.

अेका सत्कार समारंभाचे वेळी जयंत नारळीकरानी भाषणाची सुरवात करताना असे म्हटले की मी बंधूभगिनींनो असे म्हणत नाही कारण श्रोत्यांमध्ये माझी पत्नीही आहे. त्यानंतर बोलतांना पु.ल. नी सांगितले की मी बोलताना कोणत्याही सभेत बंधूभगिनींनो अशी सुरुवात करू शकतो

कारण माझी पत्नीच मला 'भाईसाहेब' म्हणते !

बाबासाहेब पुरंदऱ्यांचा परिचय लेख लिहिताना त्यांनी लिहिले 'बलवंत मोरेश्वर पुरंदरे' हे नाव धारण करणारा इतिहास संशोधक भव्य मिशा आणि तीन बोटी गंध लावलेला भव्य पुरुष असेल या कल्पनेत असताना लेंगा आणि सदरा घातलेला सायकलवरून आलेला पोरसवदा तरुण मीच ब.मो. पुरंदरे असे सांगू लागला तेव्हा मला वाटले खरे बलवंत मोरेश्वर पुरंदरे मागेच कुठेतरी असून काही दगाफटका तर नाहीना हे पहाण्यासाठी त्यांनीच या पोरसवदा तरुणाला पुढे पाठविले नाहीना ?

अशी किती उदाहरणे सांगावीत? जीवनातल्या प्रत्येक अंगाकडे रसिकतेने पाहून त्याचा मनसोक्त आस्वाद घेणे हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यामुळे ते निष्कपट आणि आनंदी होते आणि त्यांनी जीवनाचा संपूर्ण अुपभोग घेतला. त्यांच्या अेकसष्टी समारंभाचे वेळी बऱ्याच वक्त्यांनी त्यांच्या बालपणातील सामान्य आर्थिक परिस्थितीचा अुल्लेख केला. सत्काराला अुत्तर देताना भाईसाहेब म्हणाले, 'मी माझ्या बालपणी बालगंधर्वांचे संगीत अैकले आहे, महात्मा गांधींचे नेतृत्व पाहिले आहे आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वक्तृत्व अैकले आहे. मग मी सामान्य परिस्थितीत वाढलो असे कसे म्हणता येअील?' काळजाला हात घालणारे असे प्रसंगोचित भाषण करावे पु.ल. नीच !

विनोदी साहित्याव्यतिरिक्त भाईसाहेबांनी 'तुझे आहे तुज पाशी' 'अंमलदार' 'तीन पैशाचा तमाशा' 'ती फुलराणी' अशा प्रकारची बरीच नाटके लिहिली. या आणि अशा त्यांच्या नाटकांना रसिकांनी भरभरून दाद दिली. अलीकडेच अपघातात निधन पावलेली 'ती फुलराणी' ची नायिका भक्ती बर्वे ही तर 'मी फुलराणी आणि पु.लं.' असा अेक पात्री अभिनय कार्यक्रमच सादर करीत असे.

याशिवाय पु.ल.नी कादंबऱ्या, लघुकथा वगैरे लिखाणही केले. मात्र त्यांच्या विनोदी लेखनाइतके आणि नाटके व प्रवासवर्णने त्याच्या इतके ते लोकप्रिय झाले नाही.

स्वतः लिहिलेल्या अंमलदार नाटकातील भूमिका गाजली. चित्रपटसृष्टीत तर त्यांनी 'गुळाचा गणपती' हा 'सब कुछ पु.ल.' असा यथार्थपणे गौरविला गेलेला चित्रपट काढून स्वतःचे अगदी वेगळे स्थान निर्माण केले.

पु.ल. इतर सर्व बाबतीत जे आहेत तसे झाले नसते तर ते अुत्तम गवयी झाले असते हा अभिप्राय ख्यातनाम संगीत दिग्दर्शक सुधीर फडके यांनी अेका कार्यक्रमात व्यक्तविला होता असे ही सांगितले जाते.

असे हे भाईसाहेब तथा पु.ल. देशपांडे ! महाराष्ट्रात आणि विशेषतः बहुजनसमजात अतिशय लोकप्रिय असलेले. अजातशत्रू सर्वमान्य लोकप्रिय पु.ल. देशपांडे त्यांचे निधन झाले, पण त्यांना विसरणे महाराष्ट्राला शक्य नाही. महाराष्ट्राच्या या मातीने अनेक नररत्नांना, साहित्यिकांना, नाटककारांना, अभिनयसम्राटांना जन्म दिला पण ' असा पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे पुन्हा होणे नाही.' त्यांना त्रिवार प्रणाम !!

ना. वा. आगाशे
१/२०, कल्पना सहनिवास,
घंटाळी, ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनी : ५३३ ७६११

***

*दिशा अंकासाठी*
*दूरध्वनी संपर्क :*
**६४२ ६२ ७०**
**६३३ ७६ ७२**

# भाईबंध

*पु.ल. गेले त्याला जूनमध्ये वर्ष होत आहे. त्यानिमित्ताने पु.ल. ची आठवण ताजी करणारे हे पत्र. - संपादक*

प्रिय भाईस,

तुमची ट्रान्सफर होत असल्याची कुणकुण काही दिवसांपूर्वीच लागली होती. तुमच्या उड्डाणाची जय्यत तयारी होऊन यानाचा काऊंटडाऊन सुरू झाला तेव्हा मात्र खूप अस्वस्थ वाटायला लागले. बघता बघता तुम्ही आम्हा सर्वांना सोडून हजारो योजने दूर निघून गेलात.

तिकडे स्वर्गलोकी मात्र तुमच्या आगमनाची सुवार्ता वाऱ्यासारखी पसरली असेल. अरे! आपला भाई वर येतोय असे सगळीकडे हिंडून सांगता सांगता नारदांची दमछाक झाली असेल. तुम्ही विनोदाला दिलेले नवीन परिमाण बघून 'टवाळा आवडे विनोद' असे म्हणणारे समर्थही तुमच्या भेटीस उत्सुक झाले असतील. तडाखेबाज फलंदाजी करून सचिन जेव्हा तंबूत परततो तेव्हा त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी सुनील आणि कपिल जसे पुढे सरसावतात तसे आचार्य अत्रे, चि. वि. जोशी, कोल्हटकर वगैरे मंडळी पुढे सरसावली असतील. आपल्याला सकस विनोदाची मेजवानी मिळणार या कल्पनेने इंद्राच्या दरबारातील मंडळीही सुखावली असतील. मला तर ह्या मंडळींची कीव येते. वर्षानुवर्षे केवळ उर्वशी आणि अप्सरांचे नाच बघून करमणूक करून घ्यायची म्हणजे कठीण आहे. त्यांना मोनोटोनस की काय म्हणतात ते कसे नाही वाटत? तुमच्या काकाजींच्या शब्दात सांगायचे म्हणजे 'आपली तर भैय्या पाच मिनिटातच जान निकलून गेली असती.' (इथे पाच मिनिटांचा कालावधी हा ब्रह्मदेवाच्या पंचांगाप्रमाणे आहे याची जाणकारांनी नोंद घ्यावी).

इथली मंडळी सराईतपणे शोकसभा वगैरे घेतील. एखादा राजकीय नेता निश्चितच न भरून निघणाऱ्या पोकळीत शिरेल. पण भाई, तुम्हाला खाजगीत म्हणून सांगतो, तुम्ही आमच्या आयुष्यातल्या पोकळ्या भरण्याचं काम इतकं बेमालूमपणे केलयं की आम्हालाही त्याचा पत्ता लागला नाही.

आज फ्लॅट संस्कृतीत वाढलेल्या आमच्या मुलांना आमचं बालपण चाळीत गेल्याबद्दल आमची कीव न वाटता हेवा वाटतो याचे श्रेय तुमच्या 'बटाट्याच्या चाळीला' आहे. तुमच्या प्रतिभेच्या परीसस्पर्शाने शॉ साहेबांच्या पिग्मॅलियनचे तुम्ही 'फुलराणी' च्या रुपात अक्षरशः सोने केलेत व आमच्या सारख्या मोरुंना ते मनसोक्त लुटण्याची सुवर्णसंधी दिलीत याबद्दल आमची पिढी तुमचे ऋण कधीच विसरणार नाही. 'तुझे आहे तुजपाशी' च्या रुपाने तुम्ही आमच्या चाकरमान्यांच्या आयुष्यात 'बडा मजा' आणलात. तुझे आहे तुजपाशी एकदा बघितले की अख्खी ब्लॅक लेबल पोटात रिचवल्याच पुण्य लागतं. तुमच्या नारायणाला जसं लग्न चढतं तशी आम्हाला तुमची नाटकं चढतात.

अतिशय सूक्ष्म स्तरावरील माणसाच्या मनोव्यापारांची विनोदाच्या माध्यमातून ज्या खुबीने आणि कौशल्याने तुम्ही हाताळणी करता, त्याची तुलना अतिशय गुंतागुंतीची शस्त्रक्रिया विनासायास करणाऱ्या निष्णात शल्यविशारदाशीच (सर्जन) करावी लागेल. म्हणूनच मराठीत तुमच्यासारख्या प्रतिभावान मंडळींना 'सर्जनशील' म्हणत असावेत. तुमच्या व्यक्तिरेखांवरील विनोदाची झूल बाजूला सारली की आतमधील खळखळणाऱ्या जीवनाच्या झऱ्याचं दर्शन वाचकांना अंतर्मुख करून टाकतं.

---

सबब ही स्वतः लंगडी असूनही या जगात तीच सर्वात अधिक चालते.

कधी कधी तुम्हाला विनोदी लेखक म्हणणे हाच एक विनोद वाटतो. कुठल्याही मध्यमवर्गीय मराठी कुटुंबाचे मानसिक आरोग्य ठणठणीत राखायचे असेल तर, आपल्याला ज्यातले एक अक्षरही कळत नाही अशी स्तोत्रे वाचण्यापेक्षा नियमितपणे 'बटाट्याची चाळ' व 'असा मी असा मी' चे वाचन करावे असे माझे ठाम मत आहे. मामला जर फारच गंभीर असेल तर 'तुझे आहे तुझ पाशी' चे एक आठवडाभर पारायण करून बघावे. मागे एकदा आपल्या गटण्यांच्या सख्याने तुम्हाला वटवृक्षाची उपमा दिली होती तेव्हा आम्ही हसलो होतो, पण ती किती समर्पक आहे त्याची आज प्रकर्षाने जाणीव होतेय.

गेली चार पाच दशके चाललेली तुमची मराठी कला प्रांतांतील 'भाईगिरी' आम्ही प्रचंड एन्जॉय केली. भाई हो तो ऐसा!' भाईचारा ठेवावा असे भाई हल्लीच्या काळात विरळच. तिकडे साता समुद्रापलिकडे P.G. Wodehouse नामक तुमच्याच घराणातल्या एका बुजुर्गाने साठ ते सत्तर वर्षे इंग्रजी साहित्यात असाच धुमाकूळ घातला होता. त्याच्याबद्दल एका इंग्रजी दैनिकाने व्यक्त केलेले खालील मत तुमच्या बाबतीत तंतोतंत लागू पडते.

P.G. Wodehouse will continue to release the future generations from the captivity which will be more irksome than our own.

स्वातंत्र्यपूर्व काळातील मध्यमवर्गीय मराठी माणसाची त्याच्या कॅप्टीव्हिटीयांमधून ( हे शिंच नक्की काय असतं ?) मुक्तता करण्याचं काम तुम्ही इतक्या समर्थपणे केलंय की खरं तर तुमची तुलना हर्क्युलिसशीच करावी लागेल. भाई, तुमची आणि वुड हाऊसची तुलना होऊच शकत नाही. हे म्हणजे टी.बी आणि न्युमोनियाच्या रोग्यांसाठी हॉस्पिटल चालवणाऱ्या डॉक्टरांशी एक दोन दिवसात, आपोआप बऱ्या होणाऱ्या सर्दी खोकल्यावर, औषध म्हणून बाटलीत लाल रंगाचे पाणी भरून देणाऱ्या डॉक्टरशी तुलना करण्यासारखे आहे.

रोजच्या प्रापंचिक समस्यांना तोंड देता देता जीव मेटाकुटीला आलेल्या आम्हा मध्यमवर्गीयांच्या आयुष्यात हास्याची कारंजी फुलवण्यासाठी तुम्हाला मधून मधून भूलोकावर डेप्युटेशनवर पाठवावे अशी त्या भगवंताकडे प्रार्थना करून अतिशय जड अंतःकरणाने तुम्हाला अलविदा म्हणतो.

**सुभाष चितळे**
४०४, राधेःश्याम को. ऑ. हौ. सो., विष्णूनगर, नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

***

॥ सूर्य ॥

सूर्य आला सूर्य गेला
इकडून आला, तिकडून गेला
पंख नाही, पाय नाही
तरी कसा आला गेला.

॥ शूऽऽ बोलायचं नाही. ॥

दवाखान्यात डॉक्टर म्हणतात
शूऽऽ बोलायचं नाही
शाळेमधे टिचर म्हणतात
शूऽऽ बोलायचं नाही
अभ्यास करताना ताई म्हणते
शूऽऽ बोलायचं नाही
बातम्या पहाताना बाबा म्हणतात
शूऽऽ बोलायचं नाही
पूजा करताना आजी म्हणते
शूऽऽ बोलायचं नाही
दुकानात गेल्यावर आई म्हणते
शूऽऽ बोलायचं नाही
मी इतकी मोठी झाले
तरी सगळे म्हणतात बोलायचं नाही.

**कु. प्रज्ञा प्रसादे**
सी. ए.के. जोशी स्कूल.

लेखक हे जनतेच्या आत्म्याचे इंजिनिअर आहेत.

# आगरकर पुण्यतिथी निमित्ताने

*जूनमध्ये आगरकरांची पुण्यतिथी आहे. जंयत्या, पुण्यतिथ्या या दिवसांचे एक वेगळे महत्व असते. फक्त पुतळ्यांना हार घातला म्हणजे सर्व काही होते असे नाही. या दृष्टीने एक वेगळा विचार मांडणारा लेख. - संपादक*

१७ जून १८९५ रोजी महाराष्ट्रातील थोर विचारवंत, नेतृत्वाच्या तेजाने तळपणारे गोपाळ गणेश आगरकर गेले. आगरकर युगाचा अस्त झाला. त्यानंतरच्या शतकात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले. गेल्या शंभर वर्षांच्या पार्श्वभूमीवर टिळक, आगरकर यांच्या कालखंडाचा विचार करता असे दिसते की मराठी माणूस हा इतिहास विसरला. त्यांच्या खांद्यावर उभे राहून आपण भविष्याच्या वाटा शोधत आहोत त्या थोर हिमालयासमान व्यक्तिमत्त्वांचा विसर पडणे हा केवळ कृतघ्नपणा आहे.

या १७ जूनच्या निमित्ताने मी पुन्हा आगरकरांच्या चरित्रावर लेख लिहिणार नाही. आगरकरांच्या कर्तृत्वाची माहिती देणारी अनेक लहान मोठी चरित्रे आहेत. संदर्भ ग्रंथात त्यांच्या जीवनप्रवाहातील टप्प्यांची तपशील वार नोंद आहे. सर्वसामान्य माणसे संथ, चाकोरीबद्ध जीवन जगत असतात. ही चाकोरी ओलांडून जावी असे त्यांच्या मनात असते, परंतु तितके धैर्य त्यांच्या अंगी नसते. या उलट टिळक आगरकरांसारखे महान नेते हे धैर्य करतात. त्याबद्दल त्यांना जबर किंमतही भरावी लागते. त्यामुळेच त्यांना समृद्ध असे चारित्र्य प्राप्त होते व म्हणूनच त्यांचे चरित्र वाचनीय, वंदनीय, अनुकरणीय ठरते. त्यामुळे आगरकरांसारख्या महान नेत्याचे चरित्र पुन्हा पुन्हा लिहिण्याचा मोह होतो.

परंतु त्याहीपेक्षा मला महत्त्वाचे वाटते ते हे की अशा व्यक्ती या लौकिकार्थाने व्यक्ती म्हणून उरतच नाहीत. त्यांना व्यक्तिमत्त्व असते, जीवनाचे भोगही असतात, पण या सर्वांवर मात करीत अशा व्यक्ती विचारांतून जिवंत रहातात. 'मरावे परी किर्ती रुपे उरावे' ही ओळ अशांसाठी असते.

पण गेल्या शंभर वर्षात आपण आपला मराठीपणाचा, सर्वांचा बारीक अभ्यास केला तर असे लक्षात येते की अशा व्यक्तींचे आम्ही पुतळे केले, दगड बनवले व त्यांच्या पुण्यतिथ्या जयंत्यांचे निमित्त साधून मिरवायचे साजरे करायचे विषय बनवले. यापेक्षा आपण जास्त काही करीत नाही. या निमित्ताने भाषण ठोकायला येणारा मंत्र्यासदृश असणारा पाहुणा 'हे' अमूक तमूक (ज्यांची जयंती पुण्यतिथी आहे तो ....) कोण होते' असे विचारतो किंवा चुकीचे संदर्भ देत भाषण ठोकतो त्या वेळेला आपल्या संस्कृती ची काळजी वाटते.

गोपाळ गणेश आगरकरांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने 'केसरी' 'सुधारक कर्ते' आगरकर, 'प्राचार्य' आगरकर यांच्या जीवनातील विविध प्रसंगांबरोबर मला जाणवले ते त्यांचे विचार, 'मवाळ पक्ष' व 'जहाल पक्षा'चा त्यावेळचा काळ आणि जीवश्चकंठश्च मित्रपर्वाला मिळालेले वळण, डोंगरीच्या तुरुंगात १०१ दिवस टिळक आगरकरांचा सहवास आणि आगरकर गेले त्यावेळेस टिळकांनी लिहिलेला अग्रलेख.

टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांची युती व नंतर दोघांमध्ये झालेला बेबनाव यावर विविध दृष्टींनी अनेकांनी अनेक प्रकारचे लेखन गेल्या शतकात केले. तरीही हा संशोधनाचा विषय आहे. दोघेही प्रगाढ व्यासंगी, पांडित्याने परिपूर्ण. दोघेही सामाजिक चिंतन करणारे, पण नियती काहीतरी वेगळे घडवीत असते. ही मैत्री टिकायची नाही, आगरकर अकाली निघून जाणे हे सर्व नियतीच्या मनात होते. या दोघांच्या कार्याला अधिक वर्षे व दोघांच्या सान्निध्याला अधिक काळ मिळाला असता तर .....?

इतिहासाचे वळण खूप बदलेले असते. पण हे होणे नव्हते. आज कृतज्ञता म्हणून आपण या महापुरुषांचे विचार अमलात आणणे, निदान त्यांना न विसरणे किंवा त्यांचे पुतळे न करणे इतके तरी करू शकतो !

**नचिकेत दातार**
पारसिक नगर, खारीगाव, ठाणे - ४०० ६०५.

***

# चिंतन

''सुखाला सोबत लागते, पण
दुःखाला एकटेपणानेच जगावे लागते''

- डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन

या एकटेपणातूनच कधी कधी खूप काही चांगल्या गोष्टींची निर्मितीही होऊ शकते. कोणीतरी म्हटले आहे, दान हे दुसऱ्यांचं दुःख नाहीसं करण्यासाठीच करायचं असतं. असे जर केले तर आपल्या मनाला समाधान मिळते. म्हणजेच ''साम्राज्यापेक्षाही समाधानाची किंमत जास्त आहे.'' हे बोधवचन किती सयुक्तिक आहे ते आपल्याला जाणवेल.


''दुःख आणि दारिद्र्य यासारखे दुसरे चांगले शिक्षण नाही'' या स्वामी विवेकानंद यांच्या म्हणण्यात तथ्य आहे. या दोन्हीचे चटके बसले की, माणूस ईश्वर चिंतनाकडे वळतो. असे केल्याने ईश्वरी कृपा होऊन अशा व्यक्तीला ईश्वरी संरक्षण प्राप्त होते आणि दैवीशक्ती प्रत्येक ठिकाणी आपल्याला मदत करीत आहे असा अनुभव येतो. ''संकटाला धैर्याने सामोरे गेलात तर ते संकटच उरणार नाही'' या कार्लाईल यांच्या विचारांची प्रचिती आल्याशिवाय रहात नाही.

एडवर्ड एव्हरेस्ट या लेखकाचे सुवचन असे की, ''परमेश्वराने प्रत्येक माणसाच्या हातात, त्याला कीर्तीमान आणि सुखी होण्याची साधने सुपूर्द केली आहेत.'' असे व्हावेसे वाटत असेल तर प्रत्येकाने प्रथम 'समय हीच संपत्ती आहे हे वचन अंगी बाणले पाहिजे.याचे उत्तम उदाहरण म्हणजे '' घालविलेले द्रव्य काटकसरीने आणि परिश्रमाने पुन्हा मिळेल, विसरलेले ज्ञान पुन्हा शिकता येईल, नष्ट झालेले आरोग्य औषध आणि संयम यांच्या मदतीने पुन्हा परत मिळेल, परंतु गमावलेला वेळ काही केले तरी परत येत नाही.'' यामुळे ''सचोटीचा मनुष्य निर्माण करणे हीच परमेश्वराची उदात्त कलाकृती आहे.'' असे म्हणावे लागेल.

'' जीवन म्हणजे आश्चर्याची मालिकाच । उद्याचा रागरंग आज कधीच समजत नसतो.''

**श्रीमती अपर्णा काजरेकर**
ठाणे.

***



'शेवटी तुम्ही तुमची कविता छापून आणलीत तर !....'

'हो... ' कवी म्हणाला.

'कशी?'

' मी वर्तमानपत्राच्या संपादकाला पत्र पाठवून विचारले या कवितेच्या दोन ओळी मला आठवताहेत. संपूर्ण कविता कुणाला माहीत असेल तर त्याने तसे कळवावे. संपादकाने माझे दुसऱ्या नावावर लिहिलेले पत्र छापले. नंतर मीच माझ्या नावावर संपूर्ण कविता पाठून दिली'.

# वेगळ्या दिशेने वळण घेऊन कळत-नकळत बदलणारी, बदलती नाती

*नव्या काळाबरोबर नातीही बदलत आहेत. नात्यांचे अर्थ, संदर्भ बदलत आहेत. त्याबद्दल थोडंस - संपादक*

आजच्या युगात समाजामध्ये कळत-नकळत त्यामागे कोणतेही कारण असो वा नसो, समाजातील नाती-गोती मग ती रक्ताची असोत वा नसोत, फार मोठ्या प्रमाणावर वळण घेऊन वेगवेगळ्या दिशेने, वाटेने बदलत चालल्याचे दृश्य सर्वत्र दिसून येत आहे. ही वस्तुस्थिती आहे. अशा वस्तुस्थितीवर आधारित दोन घटनात्मक उदाहरण याप्रमाणे आहेत की कशा तऱ्हेने नाते कलाटणी घेऊ शकते.

नकळत बदलणारी नाती या विश्वातील समाजामध्ये अनादी काळापासून बदलत्या कालप्रवाहानुसार पिढ्यान पिढ्यांमधील, आचार-विचारातील, पेहराव, रुची व दाम यामधील निर्माण होणारी खोल दरी या महत्त्वाच्या बाबींमधील तफावत, अंतर याचे प्रमाण झपाट्याने वृद्धिंगत होत आहे. अर्थातच कळत-नकळत असे घडणे स्वाभाविकच आहे.

समाजातील ही नाती-गोती, त्यांचे मूल्यमापन, प्रतिष्ठा या पैशाच्या तराजूत तोलल्या जातात. पैसा अडका असेल त्याच प्रमाणात ही नाती ठरविली जातात.

सर्वात महत्त्वाची खंत म्हणजे दिवसेंदिवस पिढ्यान पिढ्यांमधील कोणीही केवळ आपल्या प्रतिष्ठेसाठी एकमेकांत संवादाच्या माध्यमातून तडजोड करण्यास तयार नाहीत. एकमेकांना समजावून घेण्याची तयारी दर्शवीत नाहीत आणि हीच बाब आक्राळ-विक्राळ रुप धारण करीत आहे.

पैशाच्या या मोहजालामुळे व एकमेकांना समजून न घेण्याच्या प्रवृत्तींमुळे, बदलत्या काळानुसार कळत-नकळत बदलणारी ही नाती-गोती यावर वेळीच तोडगा न निघाल्यास समाजात फार मोठी वाळवी लागणार आहे.

रक्ताचे नाते एक टाकाऊ वस्तू.

समाजातील आजच्या युवा पिढीच्या मनाच्या गाभाऱ्यात स्वातंत्र्याचे चित्रण प्रतिबिंबीत, परावर्तित, केंद्रित झाल्यामुळे साहाजिकच त्यांना आपले वैवाहिक जीवन पूर्ण स्वातंत्र्याने जगण्याची मनीषा असते.

त्यामुळे केवळ याच कारणातून ज्या वडिलधारी मंडळींनी आयुष्यभर खस्ता खाऊन, पायातील वहाणा झिजवून काबाडकष्ट करुन आपणास वाढविले, लहानाचे मोठे केले ही गोष्ट ते पूर्णत: विसरून जाऊन त्यांची जराही जाणीव व कदर न करता केवळ आपल्या हितासाठी हे रक्ताचे नाते बाजूला ठेवून या वडिलधारी मंडळींची रवानगी वृध्दाश्रमात करतात. ते देखील बेफिकीरपणे. अशा वेळी त्यांना रक्ताच्या या नात्याची बिलकुल जाण नसते. ही वडिलधारी मंडळी त्यांना घरातील अडगळ वाटू लागते. केवळ स्वहितासाठी, स्वार्थापोटी त्यांना हे रक्ताचे नाते टाकाऊ वस्तू भासू लागते.

केवळ रक्ताचे हे नाते खाईत लोटण्याच्या प्रवृत्तीमुळेच, घटनेमुळेच वृध्दाश्रमाची निर्मिती झाली असे म्हटल्यास ते वावगे ठरु नये. मान्य आहे की, या दोन रक्तातील नात्यांच्या आचार-विचार यामध्ये फरक असणे स्वाभाविकच आहे. याचा अर्थ असा नव्हे की हेतुपुरस्पर, जाणूनबुजून रक्ताचे हे लालवर्णित नाते लालभडक ठरावे? का म्हणून वडिलधारी मंडळींनी कारण नसताना अशा तऱ्हेने वृध्दाश्रमाचा कारावास भोगावा ?

खरंच या रक्तवर्णित नात्याने वृध्दाश्रमापर्यंत आक्राळ-विक्राळ रुप धारण करण्यापर्यंत बदलावे ? का कलाटणी घ्यावी ?

**विवेक श्री. आठल्ये, ठाणे.**

***

---

लोकमत हे नित्य अस्थिर व दोलायमान असते.

# " आधुनिक उत्सव प्रियता "

*मे महिन्यात आपल्याकडे लग्नमुंजींचा व सत्यनारायणाचा मोसम असतो. त्या उत्सवातील ओसंडून वाहणारी उत्सवप्रियता कित्येकदा चुकीच्या दिशेने वाहते... त्या साठीच हे अंतर्मुख करणारे विचार मंथन- संपादक*

ढम्ऽऽढम्ऽऽफट्ऽऽफट्ऽऽ कानठळ्या बसवणाऱ्या अँटमबॉम्ब आणि जोरजोरात वाजणाऱ्या बँडच्या आवाजाने खोकून खोकून नुकताच डोळा लागलेली मी दचकून जागी झाले आणि कसला हा गोंगाट हे बघण्यासाठी धरफडत बाल्कनीत आले. घड्याळ्यात रात्रीचे १२ वाजत आले होते. कोणाच्या तरी लग्नाची वरात चालली होती.फटाक्यांच्या माळा आणि बँडच्या कर्कश गाण्यांच्या धुनीवर तरुण मुलामुलींबरोबर वयस्कही विचित्र अंगविक्षेप करत नाचत होते. दुसऱ्यांना त्रास देऊन त्यांचे शिव्याशाप घेऊन, सामाजिक व नैतिक नियम मोडून अमाप पैसा उधळून पुढे खरेच ह्यांचे आयुष्य सुखी-समाधानी होत असेल काय ? असा विचार करत मी आत आले.

भारत मुळात उत्सवप्रिय देश आहे. अनेक जाती धर्मांचे लोक आपापले उत्सव अगदी प्राचीन काळापासून अतिशय उत्साहाने साजरे करत असतात. अगदी श्रीकृष्णाच्या रासलीला, रंगपंचमी इ. पासून ते आजच्या काळात व्हॅलेंटाईन डे, मदर्स डे पर्यंत उत्सवात भरच पडत चाललेली दिसते. पूर्वी त्या त्या प्रांतात तेथील रीती रिवाजाप्रमाणे असतील तेवढेच उत्सव होत असत. उदा. गुजरात, राजस्थान या भागात गरबा, दांडिया तसेच केरळात अय्यपाचा उत्सव इ. शिवाय ठराविक उत्सवच धामधुमीत व्हायचे. बाकी सगळे घरातल्या घरात, नातेवाईकात, मित्रमैत्रिणींना निमंत्रित करून साजरे व्हायचे. जसे महाराष्ट्रात होणारा नवरात्र उत्सव, सत्यनारायणाची पूजा, गणेशोत्सव, वाढदिवस इ. वेगवेगळ्या धर्मांचे उत्सव त्यांच्या त्यांच्या मर्यादित प्रमाणात होत.

जसजसे दळणवळण वाढले, तंत्रज्ञान, आधुनिक उपकरणांचे शोध लागले, प्रवासाच्या सोयी व साधने वाढली तसतसे व्यापार, उद्योगधंदे वाढले. नवनवीन बाजारपेठा वाढल्या. शहरात रोजगारी व कामधंद्याचे प्रमाण वाढले. शहरात, प्रांतांप्रांतांतून खेड्यापाड्यातून स्थलांतराचे व अनेक जाती धर्मांचे लोंढे येण्याचे प्रमाण वाढले. आधुनिक सुशिक्षित वर्ग, व्यापारी वर्ग हा परदेशात स्थायिक होण्यासाठी धडपडू लागला. संगणक, विमानांच्या सोयींमुळे परदेशातील येणे-जाणे तेथील संस्कृती व उत्सव यांचीही देवाण-घेवाण वाढली.

आज मुंबई शहरापुरते म्हणायचे झाले तरी दिवाळी, दसरा, नवरात्र, गरबा-दांडिया, गणेशोत्सव, ख्रिसमस, अय्यपाचे उत्सव, दहीहंडी, होळी, रंगपंचमी, सत्यनारायणाची पूजा, वाढदिवस,लग्न, मुंजी ह्या बरोबरच १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, जयंती, पुण्यतिथी ह्या राष्ट्रीय सणांबरोबरच परदेशातील व्हॅलेंटाईन डे, रोझ डे, मदर्स डे हे ही सण अगदी धामधुमीत होताना दिसतात.

सत्यनारायणाची पूजा घ्या किंवा साधा वाढदिवस घ्या, मोठमोठ्याने वाजणारे संगीत ध्वनिक्षेपकावरून कानठळ्या बसवणाऱ्या आवाजातील गाणी, फटाके, बँड ह्यांची अगदी रेलचेल असते. स्वतःच्या खिशाला परवडो अगर न परवडो, पण नाच-गाणी, फटाके, बँड असलाच पाहिजे. मग त्यासाठी वर्गण्या गोळा करणे आले. अशा प्रकारे वर्गण्या गोळा करताना कित्येकदा जबरदस्ती, धाक, धपटशा, गुंडगिरी असेही प्रकार होताना दिसतात तर सर्वात वाईट म्हणजे कोणतेही सण, उत्सव साजरे करताना दारु पिऊन बीभत्सपणे नाचणे होय. उत्सवांचा मूळ उद्देश तर

यामुळे बाजूलाच रहातो आणि समाजात या रुपाने विकृतीच पसरत जाते. सणांना धार्मिक अधिष्ठान असते आणि त्यांचे सार्वजनिक उत्सवात रुपांतर होते. उदा. गणेशोत्सव. तर उत्सव हे वैयक्तिक, संस्थेचे कार्यांचे ही होतात. त्यांना धार्मिक अधिष्ठान असेलच असे नाही. हीरकमहोत्सव किंवा एखाद्या चित्रपटाचा सुवर्ण महोत्सव इ. ''सण-उत्सव म्हणजे मांगल्य, आनंद!'' झाले गेले विसरुन परत आनंदाने एकोप्याने, मित्रत्वाने रहाण्यासाठी आखून दिलेला राजमार्ग! एकमेकांना अतूट प्रेमबंधात बांधून, अहंकार, जातिभेद, धर्मभेद विसरुन शरीराची मनाची व समाजाची सदृढ व निकोप वाढ होण्याची एक किल्लीच! लोकमान्य टिळकांनी सुद्धा सार्वजनिक गणेशोत्सव हा अशीच आदर्श उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी चालू केला. एकमेकांच्या कलांचा, ज्ञानाचा, विचारांचा आविष्कार समाजापुढे प्रकट होऊन समाजाची नितिमत्ता वाढावी, एकमेकांना कठिण प्रसंगी मदत करुन बंधुभाव वाढावा हेच कारण प्रमुख होते. यामुळे इतरही चांगल्या गोष्टी आपोआपच वाढत जातात.

ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम, फुगे मारणे, कमी दर्जाचे रंग रंगपंचमीच्या दिवशी लावणे, यामुळे घातपाताचे प्रकार वाढतात. कोणी आजारी असतो, तर कोणी थकून भागून आपला शीण घालवत असतो, तर कोणी आपला अभ्यास करुन आपले करिअर बनविण्यासाठी धडपडत असतो. याचा विचार वाढत्या उत्सवप्रियतेबरोबर लक्षात घेतला गेला तर खूपच चांगले होईल.

अर्थातच, प्रत्येक नाण्याच्या दोन बाजू असतातच! चांगल्या गोष्टी याही आपले अस्तित्व दाखवतातच! एकेमकांच्या सणात सहभागी झाल्यामुळे जातीयवाद, निधर्मीपणा, बंधुभाव आपोआपच वाढतो. समाजातील संकुचित वृत्ती जाऊन उदारमतवादीपणा वाढतो. तसेच वेगवेगळे आचार विचार, पद्धती, कला, पाककृतींचीही आपोआपच देवाण-घेवाण होऊन समृद्धीचे वातावरण तयार होते. रोटी-बेटीचे व्यवहार सहजपणे समाजात मान्य होऊ लागले. अनेक सामाजिक संस्था, कार्यकर्ते देखील आपली परंपरा व वैशिष्ट्ये व उत्सवांची उद्दिष्टे जपतानाही दिसतात. उदा. होळीच्या दिवशी लाकडे न जाळता, वृक्ष न तोडता, वाईट गोष्टींसाठी प्रतिकात्मक दहन, वृक्ष लावणे, वाढदिवसांच्या दिवशी अनाथ आश्रमातून खाऊ, पुस्तके वाटणे इ. सार्वजनिक ठिकाणी होणारे उत्सव कलाकारांना चांगले दिवस दाखवतात. तर कलाप्रेमींची कलेची भूक भागवतात. लहान मुलांना व्यासपीठावर येण्याची संधी मिळून ती लहानपणापासूनच धीट बनतात.

'ऋण काढून सण करु नका' हा आदर्श पाळून समाजात ध्वनिप्रदूषण, समाजाची शांती रात्री ११ नंतर ध्वनिक्षेपक व आवाज न करणे हा कायदा पाळून, समाजाच्या उन्नतीसाठी सण व उत्सव साजरे केले तर रौप्यमहोत्सव, हीरकमहोत्सव, गणेशोत्सव, नवरात्री, सत्यनारायण इ. सण व उत्सव आंतरराष्ट्रीय उत्सवांबरोबरच समाजाची प्रगती करण्यास हातभार लावतील. आणि समाजाची निकोप सांस्कृतिक वाढ आशीर्वादाने होईल, या कडे लक्ष दिले पाहिजे. नाहीतर एकीकडे व्हॅलेंटाईन डे साजरे करायचे आणि लगेच तुम्हाला तुमच्या प्रेमाला नकार दिला की अॅसिड फेकायचे, जाळायचे, खून करायचे हे प्रकार चालूच राहतील. प्रेमाची ताकद सहनशीलतेत आहे, प्रेमाची महती त्यागात आहे हे जरी आधुनिक उत्सवप्रिय तरुण पिढीला कळले तरी ह्या नवीन उत्सवांवर होणाऱ्या खर्चाचे सार्थक झाले असे म्हणता येईल! नुसत्याच जोरजोराने कानठळ्या बसवणाऱ्या वेडच्या तालावर भर रस्त्यावर नाचल्याने समाजाचे नुकसानच होणार आहे. आणि त्यातून दिसणारी उत्सवप्रियता ही दांभिकताच ठरणार आहे.

**वेदवती हब्बु**
'शैलजा' बिल्डींग, तळ मजला, शिवाजी पार्क रोड नं. ४
दादर, मुंबई-४०० ०२८ फोन : ४४५६८८२

***

## ॥ मराठी माणूस काय करीत असतो ॥

मराठी माणूस काय करीत असतो ॥धृ॥
आठ तासाच्या नोकरीत
सुख विकत घेत असतो
नोकरीवर जाताना येताना
रेल्वेत व्यायामयोग करत असतो
मराठी माणूस काय करीत असतो ॥ १ ॥
सर्कशीतल्या कसरती प्रत्यक्षात अचुकपणे
दररोज न चुकता दोनदा करीत असतो
मुंबईचा पास रविवारी ही वसूल व्हावा
म्हणून रेल्वेने प्रवास करीत असतो
मराठी माणूस काय करीत असतो ॥२॥
गाडीत पोट दाबलं जाईल म्हणून
न जेवताच प्रवास करीत असतो
कधीतरी मनात आलं तर
सुखावण्याच्या प्रयत्नात
दोन दिवस गावाला जात असतो
मराठी माणूस काय करीत असतो ॥३॥
नेहमीच्या चाकरीत
मन मारून काम करीत असतो
कामाच्या गर्दीत स्वतःला
हरवून जात असतो
मराठी माणूस काय करीत असतो ॥४॥
गाडीच्या गर्दीत घाम पुसायला
हात वर येत नाही म्हणून
दुसऱ्याच्या खांद्यावर कपाळ ठेवीत असतो
मराठी माणूस काय करीत असतो ॥५॥
दररोजच्या बातम्या गाडीच्या प्रवासात
सर्वांकडून डोकाऊन वाचत असतो
दादरची भाजी-ताजी म्हणून
दररोज तीच खात असतो
मराठी माणूस काय करीत असतो ॥६॥
कोकणात सुधारणा व्हावी म्हणून
कोकणातल्या गणपतीला न जाता
मुंबईत मतदान करीत असतो

संजय रुळे, कुर्ला मुंबई.

## तीन कविता

### ॥ कस्तुरी ॥

कस्तुरीमृगाला ती गवसली नाही
म्हणून तो सैरावैरा धावत होता;
मानवाला ती गवसली तरी
तरी तो सैरावैरा धावत आहे !

---

### ॥ नशा ॥

ती औट घटकेची असनी तरलता...
ज्यावेळी शब्दांना अर्थ नसतो....
ज्यावेळी शब्दांशिवाय अर्थ चढतो....
ज्यावेळी कल्पना जाळं विणते
आणि स्वतःच त्या मध्ये गुरफटून बसते !

---

### ॥ अेकाअेकी ॥

सातसाठ चिमुकल्या मुलामुलींचा घोळका
आमच्यावर तुटून पडतो -
देवाला वहायची फुलं विकण्यासाठी;.....
मी पहात राहतो-
त्या मोहक फुलांकडे,
फुलांपेक्षाही मोहक अशा त्या
चिमुकल्या मुलामुलींकडे;
गाभाऱ्याबाहेरच देव भेटतो-
दगडापेक्षा कोमल,
फुलांपेक्षा मोहक,
देवाहूनही अधिक माणुसकीचा !

**- प्रा. विनोद कांबळी**
वि.प्र. मंडळाची व्यवस्थापन संस्था, ठाणे
***

---

जेथे सर्वांना खात्रीने 'भूत' भेटते अशी एक जागा आहे , आणि ती म्हणजे 'व्याकरण'.

# सुगम संगीतातून व्यक्त होणारे संगीतमय व्यक्तिमत्त्व-
# श्री. अनिरुद्ध जोशी

*श्री. अनिरुद्ध जोशी आमच्या संस्थेच्या महाविद्यालयाचे, शाळेचे माजी विद्यार्थी. १० मार्च रोजी त्यांचा ५००वा कार्यक्रम झाला. त्यानिमित्ताने सदर लेख. - संपादक*



**श्री. अनिरुद्ध जोशी**

प्रसिद्ध गायक श्री. अनिरुद्ध जोशी यांच्या गाण्यांचा ५०० वा कार्यक्रम अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत गडकरी रंगायतन मध्ये झाला. ५०० व्या कार्यक्रमाच्या निमित्ताने मागे वळून पाहवं, या ठाण्याचे जीवन अभिरुचिसंपन्न बनविणाऱ्याना कलावंताची संगीत क्षेत्रातील वाटचाल रसिकांपर्यंत पोहचवावी या उद्देशाने अनिरुद्ध जोशींना भेटलो.

खरे तर त्यांचे वडील चि. शं. जोशी हयात असताना, म्हणजे त्यांच्या बेडेकर शाळेतील दिवसांपासून मी त्यांना पहात आलोय ! म.सा.प. च्या सुरुवातीच्या दिवसात (कै.) चि. शं. जोशी यांच्या घरी नेहमी जाणं येणं होतं. शालेय शिक्षण संपल्यावर बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातूनच अनिरुद्ध न बारावी (विज्ञान) पूर्ण केलं व नंतर व्ही.जे.टी.आय. मधून बी.ई.(सीव्हिल) पूर्ण केलं. आज वडिलांचा जुना व्यवसाय जरी ते संभाळत असले तरी त्यांचा खरा व्यवसाय गायन हाच झालेला आहे, कारण गाण्याच्या वातावरणातच ते वाढले, घडले.

त्या दिवसात कधीतरी वडिलांनी मेहंदी हसनच्या गझलांच्या कॅसेट्स आणल्या आणि अनिरुद्धच्या शालेय वयातच त्याला उर्दू गझलांनी झपाटलं. ती प्रेरणा होती. खरे तर त्या गझलांमध्ये उर्दू फारसे कळत नसे... पण गझल गायला सुरुवात झाली. पुढे व्ही.जे.टी.आय. मध्ये एका स्पर्धेत भाग घेतला, त्यावेळी परीक्षक म्हणून पं. श्रीकांत ठाकरे होते. त्यांच्या हस्ते पहिलं बक्षिस तर मिळालेच पण त्यांनी आवर्जून भेटायला बोलावलं. रोज घरी पेटीवर चालणारा रियाझ कामी आला. श्रीकांतजींकडे सुगम संगीताचे शिक्षणच घ्यायला सुरुवात केली. विनायकबुवा काळे यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे धडे गिरवायला सुरुवात झालेली होतीच. श्रीकांतजींनी उर्दू शब्दोच्चार व अर्थ सांगून नीट करून घेतले, उर्दू वर जोर दिला.

१३ ऑगस्ट १९८६ ला, वयाच्या चोविसाव्या वर्षी पहिला जाहीर कार्यक्रम झाला आणि श्री. अनिरुद्ध जोशी यांच्या सुगम व गीत गायनाच्या कार्यक्रमांचा सिलसिला सुरु झाला. स्वाभाविकच माझा प्रश्न होता, 'या ५०० कार्यक्रमांतील सर्वात लक्षात राहिलेला वेगळा कार्यक्रम कोणता ?' १९९५ साली अनिरुद्ध जोशींना 'प्रियदर्शिनी' पुरस्कार जाहीर झाला. त्यावेळचे माहिती व नभोवाणी खात्याचे केंद्रीय मंत्री वसंतराव साठे यांच्या हस्ते दिल्लीला समारंभपूर्वक हा पुरस्कार दिला गेला. त्या निमित्ताने महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयाने राज्यपालांच्या

निवास स्थानी त्यांचा गायनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. हे ऐकताना 'आमच्या' ठाण्यातील 'आमचा अनिरुद्ध....' हे मनात येऊन त्या कार्यक्रमाचे चित्र कल्पनेने डोळ्यासमोर येत होते. राज्यपाल भवनातील दरबार हॉल मध्ये स्वतः राज्यपाल माननीय पी.सी. अलेक्झांडर व माननीय अक्कमा अलेक्झांडर यांच्यासह निवडक निमंत्रितांसाठी सादर झालेला तो कार्यक्रम होता... स्वाभाविकच अविस्मरणीय क्षण असणार !

राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर एका ठाणेकराचा एकाच वेळी झालेला हा सन्मान होता. याच बरोबर ऑक्टोबर ९९ मध्ये श्री. अनिरुद्ध जोशी यांना गझल गायक म्हणून 'मिलेनियम अॅवॉर्ड' मिळाले. तो ही एक महत्त्वाचा टप्पा होता. 'ऑल इंडिया अॅचिव्हर्स कॉनफरन्स' तर्फे हा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला होता आणि त्याच प्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेवरील उर्दू, मराठी गीतांमध्ये त्यांचा सहभाग असणारी कॅसेट तत्कालीन पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या हस्ते प्रकाशित झाली होती. हे दोन प्रसंग मला फार महत्त्वाचे वाटले. ८८-८९ मध्ये त्यांना भारत सरकारतर्फे राष्ट्रीय एकात्मतेवरील गीतांच्या सादरीकरणासाठी विशेष अर्थ साहाय्य दिले होते.

'' या शिवाय या ५०० कार्यक्रमांच्या कितीतरी लहान मोठ्या आठवणींनी मी समृद्ध झालोय, रसिकांनी मला भरभरून दिलं, समृद्ध केलं..... '' अशी भावना अनिरुद्ध जोशींनी व्यक्त केली. त्यांच्या मते ''विशेषीकरणाच्या आजच्या काळात विविध स्पर्धा वाढल्या. फक्त अभंग गायन, फक्त गझल गायन, फक्त भावगीत गायन अशा कितीतरी दिशांनी विशेषीकरण वाढले. या सुगम संगीत गायन क्षेत्राने मला जो आनंद दिला, माझा जो फायदा झाला तो शेअर करावा, द्विगुणीत करावा असा माझा प्रयत्न आहे...'' म्हणूनच आज एकीकडे गाणे शिकत असतानाच गाण्याचे शास्त्रोक्त शिक्षणही ते देतात ४५ विद्यार्थी आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकत आहेत.

५०० वा कार्यक्रम हा आनंदाचा क्षण हे एक निमित्त आहे. या निमित्ताने जेव्हा अनिरुद्ध जोशी यांनी त्यांचा 'बायोडेटा' दिला तेव्हा आजपर्यंतच्या वाटचालीतील एक गायक म्हणून त्यांच्या जमेस असणाऱ्या अनेक बाबी लक्षात आल्या. आकाशवाणीचे मराठी सुगम संगीत, हिंदी गीते व भजने, उर्दू गझल याचे ते मानांकित कलाकार आहेत. आकाशवाणीवर आज त्यांची २०५ गीते रेकॉर्ड झालेली आहेत. दूरदर्शनवर ७२ थेट प्रक्षेपणांचे कार्यक्रम झालेत तर पार्श्वगायक म्हणून ६ मराठी चित्रपटांना (अंगार, आंबेडकर, निष्पाप, सडे फटिंग, शेजारी शेजारी, नास्तिक) त्यांचा आवाज आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या संगीत नाटकासही त्यांनी आवाज दिला आहे. त्यांच्या ३३ ऑडिओ कॅसेटस् बाजारात उपलब्ध आहेत,पैकी काही महत्त्वाच्या म्हणजे, 'दिलो जान से' (उर्दू गझल), प्रभु मोरे (हिंदी भजन), गाऊ विठोबाचे नाम (मराठी भक्ती संगीत) इ.

वडिलांचा ऑर्नेट केमिकलस्चा व्यवसाय ते सांभाळतात. या व्यवसायाचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. तर ठाणे भारत सहकारी बँकेच्या संचालक मंडळावरीही आहेत. ठाण्याचे जीवन समृद्ध करणारे हे ठाण्याचे खरे वैभव आहे. अनिरुद्ध जोशी हे असेच 'कलावंत ठाणेकर !' या गायकाचे ५०० कार्यक्रम झाले, नजिकच्या भविष्यात हजार कार्यक्रमही व्हावेत ही शुभेच्छा!

**प्र. ग. वैद्य**
लक्ष्मी निवास, घंटाळी मंदिरासमोर,
ठाणे ४०० ६०२.
दूरध्वनीः ५४३ २०७२

•••


# उपेक्षित वृक्षांसाठी ....

*उपेक्षित झाडांची उपेक्षा थांबवून त्यांच्या अस्तित्वात अर्थ निर्माण झाला तर....... या विचाराची अंमलबजावणी करण्याचा एक प्रयत्न व त्याचा परिचय - संपादक*

ठाण्याच्या पूर्व दिशेला अगदी 'बहुचर्चित' कचरा प्रक्रिया केंद्राच्याही पलीकडे ठाण्यातील 'सिवेज वॉटर ट्रीटमेंट प्लेंट' जवळ....... निसर्गप्रेमींसाठी बर्डस् वॉचिंग पाइंट जवळच्या मोकळ्या जागेत.... खाडीमधील खारफुटीच्या जंगलात अजूनही 'मुंगुस' आहेत. साप आहेत. हे अेका निसर्गप्रेमी युवकाने पाहिले व त्या उघड्या-कचऱ्याच्या 'डंपिंग' मधून तयार झालेल्या प्लॅस्टीक मिश्रित जमिनीवर झाडे लावून हरित आच्छादन करण्याचा संकल्प घेतला.

जागेची मालकी महानगरपालिकेची - अधिकाऱ्यांनीही उत्तम प्रतिसाद दिला. महानगरपालिकेने जवळच स्वतःची अेक नर्सरी बनविली. उघड्या बोडक्या माळावर हळूहळू हिरवाई दिसू लागली. उगाचच 'भरभरून वाढणारे' पण आपल्याला निरुपयोगी वनस्पती नकोत, तर उपयोगी वड, पिंपळ, फलोत्पादक आंबा, पेरू, औषधी बेहडा, आवळा...... प्रत्येक भारतीय वनस्पतीची, उपयोगी वनस्पतींची लागवड व संवर्धन असा संकल्प झाला.

अेक-दोन, पाच-दहा, पन्नास-शंभर नव्हे तर तब्बल ५०० वृक्ष आज बाल्यावस्थेत येथे उभे आहेत. येणाऱ्या पावसाची वाट पहात आहेत... तिथपर्यंत हे सर्व बालवृक्ष जिवंत ठेवण्याची धडपड चालू आहे. या सर्व झाडांना दूरवरून आणून पाणी घालण्यासाठी एक माणूस नेमला आहे. जवळच्या नळावरून, डबक्यातून पाणी घेऊन तो सर्वत्र घालत असतो. अगदी अेकदा पाणी घालायच्या झारीमध्येही साप आढळला होता तरीही हे व्रत निष्ठेने करतो आहे.



येथे फिरणारी डुकरे, त्यांना पकडण्यासाठी होणारे सामुदायिक पळापळीचे कार्यक्रम, होळी वा तत्सम सणांना तेथे येऊन होणारी वृक्षतोड, इतस्ततः फिरणाऱ्यांच्या पायाखाली तुडवले जाणे..... या सर्वांना तोंड देऊन आज ही ५०० झाडे येथे जगत आहेत.

झाडे जशी नर्सरीमधून आली तशीच वड पिंपळ तर गावातील ठिकठिकाणी उगवलेल्या झाडाचे संकलन आहे. जर तुम्हाला ठाण्यातील रस्त्यांवर M-80 वरून झाडांची फांदी वा फांद्या अडकवून जाणारी व्यक्ती भेटली तर बेधडक तो हाच युवक आहे असे समजा. ठिकठिकाणच्या झाडांच्या तोडलेल्या फांद्या आणून त्या रोवून त्यापासून झाडे बनविणे, वेगवेगळ्या झाडांच्या बिया रुजवून त्यापासून छोटी झाडे उत्पन्न करणे, रस्त्यावर गटारात इमारतीवर चुकीने उगवलेल्या झाडांना हळुवारपणे उतरवून पुन्हा जमिनीवर लावणे..... या माध्यमातून स्वतःत वेळ व शक्ती खर्च करून.... प्रसंगी काही झाडांसाठी खिशातले धन खर्च

करून ही झाडे गोळा झाली आहेत. पाणी घालणाऱ्या माणसाचा पगारही खिशातून खर्च होतोय.... दूरवर बिया किंवा फांद्या मिळवण्यासाठी होणार प्रवासही खिशातूनच.

'आयुष्यात घडणारे जन्ममृत्यू-अविस्मरणीय घटना चिरंतन ठेवायच्या असतील तर त्या निमित्ताने अेखादे झाड लावावे' हा विषय नुसता सांगून नाही तर प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न तो करत आहे. ठाण्यातील शिक्षणक्षेत्रातील मान्यवर व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांकडून शाळेमध्ये लावलेले नागचाफ्याचे झाड. मोठी तीर्थयात्रा पायी करून आल्याच्या प्रित्यर्थ ठाण्याच्या मासुंदा तलावावर लावलेले सुगंधी फुलांचे झाड..... हे सर्व प्रसंगी स्वत:च्या प्रयत्नातून स्वत:च्या खिशातून .... समाजाला सवय लावण्यासाठी केलेला प्रयत्न.

आजच्या प्रयत्नवादाच्या जमान्यामध्ये नास्तिकतेकडे ओढल्या जाणाऱ्या आजच्या नवसमाजामध्ये हा 'युवक' प्रत्येक झाडामध्ये देवाचे रुप पहातो आहे. प्रत्येक देवाने, झाडाने आपल्याला दिलेला आशीर्वाद सांगतोय. म्हणूनच वनस्पतींचे संवर्धन हा त्याचा जीवनाचा उद्देश बनला आहे.

'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे गेली ८-१० वर्षे अतिशय शांतपणे हे कार्य करणाऱ्या या युवकाने या झाडांना आपल्या अपत्याप्रमाणे वाढविले आहे. ठाण्याच्या मासुंदा तलावाच्या सभोवताल लावलेली अनेक झाडे आज दिमाखात उभी आहेत तर अनेक झाडांची रस्तारुंदीकरणात हत्या झाली आहे.

ठाण्यातील 'निसर्गप्रेमी' नागरिकांनीही अनेक ठिकाणी ह्या झाडांच्या हत्येमध्ये वध्याची भूमिका घेतली.... याबद्दल अस्वस्थता आहे म्हणूनच कोणतीही संस्था ... संघटना नाही तर केवळ अेकट्याची संघटना... अेकच व्रत.

वटपौर्णिमेला पूजा केल्या जाणाऱ्या हजारो वडाच्या फांद्या दुसऱ्या दिवशी कचऱ्यात जातात. या फांद्या गोळा करून त्या जमिनित लावल्या त्यातून आता झाड... वृक्ष निर्माण होतील.... भरपूर बिया हव्या आहेत. नष्टप्राय होणारी झाडे हवी आहेत. अगदी लहान असताना झाडांची घरामध्ये थोडी काळजी घेणारी घरे हवी आहेत.

ह्या युवकाचे नाव आहे विजय पावगी. भारत बिजलीमध्ये काम करणाऱ्या या युवकाने झपाटल्याप्रमाणे हे सर्व केले आहे. प्रत्यक्ष केले आहे. घरातल्या कचऱ्यावर प्रयोग केला आहे. गांडूळ घरात, बादलीमध्ये पाळले आहेत. फिश टँक मध्ये छोटे छोटे मासे विकत आणून पाळले आहेत. मोठे झाल्यावर तलावात सोडले आहेत. क्रॉफर्ड मार्केटमधून शेकडो मासे विकत आणून ठाण्याच्या मासुंदातलावात सोडले आहेत... आजही रस्त्यावरून जाताना सहजपणे अेखाद्या वृक्षाकडे बोट दाखवून तो म्हणतो की या झाडांच्या बिया अेक दिवस मी खाली उभा असताना टपटप अंगावर पडल्या.... या झाडावर वटवाघळे येतात... झाडांचा व पक्षांचा फार जवळचा संबंध आहे. झपाटल्याप्रमाणे तो खाडीजवळची तुटलेली पाणवनस्पती दाखवतो. नौपाड्यामध्ये बिल्डिंगच्या समोर उगाचच तुटणाऱ्या झाडाजवळ उभा राहून 'सशक्त' बिल्डरच्या तोडणाऱ्या माणसांना आवाहन करतो.... अैकल नाही तर आव्हान देतो.

या झपाटलेल्या व्यक्तिमत्त्वाच्या ओळखीचे प्रयोजन म्हणजे हा आमच्या बॅचमधला बांदोडकर कॉलेजचा माजी विद्यार्थी... कधीतरी आपल्याला ठाण्यात अेखाद्या वृक्षाजवळ भेटेलच... अशीच माणस इतिहास घडवतात आणि मग इतिहासात त्यांच्या निमित्ताने आपल्या महाविद्यालयाचीही विशेष नोंद होत असते.

**प्रा. विद्याधर बालावलकर.**
रविउदय सोसायटी, चेंदणी, ठाणे ४०० ६०१.
दूरध्वनी : ५६३ ९५४७.

***

# डाऊश लँड - (जर्मनी)
## लेखांक २

*जर्मनीच्या प्रवासवर्णनाची लेखमाला सध्या दिशातून देत आहोत त्यातील हा दुसरा लेख - संपादक*

अल्फ्रेडचे आणि माझे सूर पहिल्याच भेटीत चांगलेच जुळले. तो रहातो त्या दक्षिण जर्मनीच्या भागाला बेव्हेरिया म्हणतात. यात म्युनिक, न्यूरेनबर्ग, ऑसबर्ग, विचन्सबर्ग आदी भाग येतो. या भागाच्या दक्षिणेला आल्पस् पर्वत, ऑस्ट्रिया वगैरे. डोंगर, झाडी, शेती आणि सुंदर तळी यांनी नटलेला हा समृद्ध भाग. कारखानदारी आणि व्यापारही चांगल्या प्रमाणात. लुडविक हा बेव्हेरियाचा राजा होता. त्याला राजवाडे (कॅसल) बांधण्याची आवड होती. त्यानं काही सुंदर कॅसल तिथं बांधलेत. 'वाईझेन' ही या भागातली प्रसिद्ध बीअर. हॉफिन, माल्ट, मका आणि गहू यापासून ती बनवतात. त्यात फक्त ६ टक्केच अल्कोहोल असतो. या भागातल्या प्रत्येक गावात त्यांची स्पेशल 'वाईझेन' बनत असते. अल्फ्रेडला भेटायला गेलो तेव्हा ३ डिसेंबर, माझा वाढदिवस होता. चौतीस पूर्ण झाली. आरतीनं फोनवर सांगितलं की सुप्रियानं हट्ट करुन केक आणायला लावला आणि स्वतः कापला. पप्पा जरी जर्मनीत फिरतोय तरी लेक भारतात त्यांचा वाढदिवस आठवणीने करतेय, हे लेकीचं प्रेम अल्फ्रेडला कधी कळणार ? कसं मिळणार ? मी थोडासा अस्वस्थ होतो ते अल्फ्रेडनं बरोबर ताडलं. माझा वाढदिवस आहे हे कळल्यावर त्याने धमालच केली. त्याच्या एस् क्लास मर्सिडीज कुपे मधून मला ड्राईव्हवर घेऊन गेला. गाडी किती छान पळते, तिचा पिकअप किती चांगला आहे हे दाखवलं. त्याच्या गाडीत मला ड्रायव्हर सीटवर बसवून फोटो काढला. दुपारचे अडीच-तीन वाजले असले तरी फोन करुन एका चांगल्या जर्मन रेस्टॉरंटमधे जेवणाची व्यवस्था केली. खास बिव्हेरियाचा गोड्या पाण्यातला मासा, भात असं जेवण खाऊ घातलं. आठवण म्हणून एक शेविंग मशीन, फ्रँकने वाइनची बाटली दिली. त्यानं ती बाटली इतक्या प्रेमानं दिली की मी वाइन, बीयर अथवा कुठल्याही प्रकारची दारु पीत नाही हे सांगायचं माझं धाडसच झालं नाही. भारतात कोणातरी शौकिन मित्राला देऊ असा मी विचार केला.



अल्फ्रेड संगीताचा वेडा. स्वतः उत्तम गिटार वाजवतो. पैसे कमवण्याच्या नादात जर्मनीत लोक आयुष्याचे रंगच हरवून बसले आहेत ही त्याची खंत. तानिया ही त्याची सेक्रेटरी. त्याच्यासारखीच अगदी चांगली. तिच्याबरोबरही मी फोटो काढला. तिला बरं वाटलं. अल्फ्रेडबरोबर इतर गप्पा चार तास, तर बिझनेस विषयी शेवटी अर्धा पाऊण तास बोलणं झालं. उत्तम इंग्रजी असलेले जर्मन आधीच थोडे. त्यातही जर्मनीतल्या छोट्या गावात राहून इंग्रजीवर प्रभुत्व असलेले क्वचितच. अल्फ्रेड

त्यातलाच एक. शिवाय गप्पिष्ठ. त्यामुळं सूर लवकर जुळले. त्याच्याकडे कॅल्क्युलेटर सारखं दिसणारं एक छोटसं ऑर्गनाईझर होतं. त्यात इंग्लिश -जर्मन डिक्शनरी होती. काही ठराविक जर्मन शब्दांसाठी कोणते इंग्रजी शब्द आहेत ते त्यात लगेच बघता येत असे. छोटा कॉम्प्युटरच जणू. त्याच्या वडिलांनी दुसऱ्या महायुद्धात, फ्रेंचाविरूद्धच्या लढाईत भाग घेतला होता ते अजूनही हयात आहेत. ऐंशीच्या घरात असले तरीही स्वतःचा स्वतंत्र व्यवसाय करतात. त्यांच्या मते युद्ध जिंकलेल्यांनी जो इतिहास लिहिला तो चुकीचा आहे. जर्मनीनं साम्राज्य पसरवण्यासाठी नसून स्वतःच्या अस्मिते साठी लढा दिला. ब्रिटीश, फ्रेंचांनी जर्मनीला कायम सावत्र भावासारखी वागणूक दिली. त्यांच्या दादागिरीला वैतागलेल्या जर्मन जनतेला हिटलरच्या रुपानं नेतृत्व लाभलं. महायुद्ध संपून आता पंच्चावन्न वर्ष झाली असली तरी जर्मनी नुकसान भरपाई पोटी लक्षावधी डॉलर ज्यूंना देत आहे. याची सल जर्मन मनात आहे. आता हे कुठंतरी थांबलं पाहिजे असं त्यांना वाटतं.

जर्मनीची तुलना महाराष्ट्राशी करता येईल. त्यांची लोकसंख्या युरोपात सर्वाधिक असली तरी आपल्या महाराष्ट्राच्या लोकसंख्ये इतकीच म्हणजे सात कोटी नव्वद लाख च्या घरात. महाराष्ट्र तीन लाख सात हजार चौरस किलोमीटर तर जर्मनी तीन लाख पन्नास हजार चौरस किलोमीटर. म्हणजे क्षेत्रफळ आपल्या पेक्षा दहा बारा टक्क्यानेच जास्त. पण साक्षरता नव्याण्णव टक्के, तर दरडोई उत्पन्न आपल्या पेक्षा शंभर पटीहून जास्त. त्यांचीही प्रगती गेल्या पन्नास पंच्चावन्न वर्षातलीच. दोन महायुद्धांत दोस्त राष्ट्रांकडून सडकून मार खाल्ल्यावर व्यक्तिमत्त्वच बदलून टाकलेला हा देश. समजून घ्यायला कदाचित जगात सगळ्यात अवघड समाज. त्यामुळचं त्यांच्या विषयी गैरसमज अधिक रूढ. महाराष्ट्रीयन लोकांप्रमाणेच आपला जर्मन बाणा जपणारे, मातृभाषेविषयी कडवे प्रेम, तर इंग्रजीचा तिरस्कार! सायबर जगात जर निभाव लागायचा असेल तर इंग्रजीला पर्याय नाही ही वस्तुस्थिती न पचणारी.

महायुद्धानंतर आपल्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी जर्मनीनं अमेरिकेला देऊन टाकली. शीतयुद्धाच्या काळात अमेरिकने अत्याधुनिक अण्वस्त्रे जर्मनीतच बनवली. तिसरं महायुद्ध पेटलं तर ते जर्मनीतचं. कारण अमेरिका रशियापासून शेकडो मैल लांब तर ब्रिटन आणि फ्रान्स जर्मनीच्या पदरामागे दडलेले अशी भौगोलिक परिस्थिती. पश्चिम जर्मनीत अमेरिकेची तर पूर्व जर्मनीत रशियाची क्षेपणास्त्रे. एकंदरीतच रणकंदन माजलं असतं तर ते जर्मनीतच आणि बेचिराख झाला असता तर जर्मनीच. दुसऱ्याच्या खांद्यावर बंदुक ठेऊन गोळी मारण्याचं हे राजकारण बर्लिन भिंतीच्या दोन्ही बाजूला असलेल्या जर्मनांनी ताडलं होतं. त्यामुळेच ती अभेद्य भिंत कोसळू शकली. महायुद्धानंतर सतत चाळीस वर्षे आण्विक युद्धाच्या दबावाखाली रहावं लागलं. दारात टपून बसलेले कम्युनिस्ट तर घरात बॉडीगार्डच्या रुपाने शिरलेला दांडोबा अमेरिका. पिढ्यान्‌पिढ्याच वैर धगधगत ठेवणारे ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या सारखे धूर्त शेजारी. महायुद्धात बेचिराख झालेली घरं आणि उध्वस्त झालेली मनं, शिवाय निर्वाणाची लढाई हरलेली मनस्थिती. या सर्व परिस्थितीत एक समर्थ देश उभा करुन आर्थिक सुबत्ता आणणं खूप कठीण होतं. पण कुणाचीही सहानभूती न घेता स्वबळावर हे हिंमतवालं राष्ट्र उभं राहिलं. शिवरायांच्या नेतृत्वाखाली मुघल साम्राज्याविरुद्ध उभ्या राहिलेल्या महाराष्ट्राप्रमाणं. गेल्या पन्नासएेक वर्षांचा आढावा घेतला तर लक्षात येतं, त्यांचा जाज्वल्य राष्ट्रवाद, कुणी त्याला कट्टर वंश वाद म्हणेल, पण त्याच भांडवलावर जर्मनीनं वैभव कमवलं. कट्टर हा जसा शिवरायांचा बाणा होता, तसाच कट्टर वंशवाद हा जर्मनीचा कणा होता. त्यानंच त्यांना जिद्द दिली, अपार कष्ट करायची ताकद दिली.

---

राजकीय स्थैर्याचं महत्त्व जर्मनांनी फारच आधी ताडलं. त्यामुळं हॅम्लेट कोहल सारख्या चॅन्सलरनं जर्मनीवर कित्येक वर्षं प्रभुत्व ठेवलं. जर्मन घटनेनुसार पर्यायी सरकार स्थापन झाल्याशिवाय सत्तेवर असलेल्यांवर अविश्वासाचा ठराव आणता येत नाही. त्यामुळं केवळ सरकार पाडताना सर्व विरोधी पक्ष एकत्र आणि सरकार कोसळलंकी गुडघ्याला बाशिंग बांधून प्रत्येकाची पंतप्रधान होण्याची घाई. चार पाच खासदार मागं असले तरी अर्थमंत्री, संरक्षण मंत्री या पदांसाठी रस्सीखेच असा प्रकार तिकडं नाही. जबाबदार आणि कर्तबगार राजकारणीच जर्मनी सारखा देश उभा करु शकतात.

त्याप्रकारे पूर्व जर्मनीला आपल्यात सामावून घेऊन त्यांची प्रगती कशी होईल याची चिंता आणि जबाबदारी पूर्वाश्रमीच्या पश्चिम जर्मनीनं वाहिली, ते खरोखरच अतुलनीय आहे. बर्लिनची भिंत कोसळल्यावर आलेली मोठ्या भावाची जबाबदारी त्यांनी बरोबर ताडली आणि निभावली. कम्युनिस्टांनी जबरदस्तीनं अपहरण करुन, ओलीस ठेवलेल्या आपल्या भावानं सोसलेली गुलामगिरी, अत्याचार याची जाणीव तर त्यांनी ठेवलीच पण आता त्याचा संसार थाटून द्यायची संपूर्ण जबाबदारीही उचलली. साधारणतः एकाच वेळेला विभक्त केली गेलेली राष्ट्रं भारत-पाकिस्तान आणि पूर्व-पश्चिम जर्मनी पण ते एकत्र आले आणि आपण आजही एकमेकांच्या नरडीचे घोट घेऊ पहातोय, असं का ? कदाचित मोठ्या भावाच्या भूमिकेत आपण कमी तर पडलो नाही ना ? की आपण कधीच भाऊ नव्हतो ? याचं उत्तर देखील वंशवादातच आहे. कदाचित भाषा आणि धर्म भिन्नत्वामुळे आपण आजही एकत्र येऊ शकलो नाही.

दोन महायुद्धांनंतर काही धडे घेऊन जर्मनीनं सर्व पावलं टाकली. उद्योग धंदे, कारखाने आपल्याप्रमाणे ठराविक भागातच उभे न करता सर्वत्र विखुरले. त्यामुळे युद्धात कमी नुकसान तर होईलच पण जर्मनीचा विकासही सर्वांगीण झाला आहे. उत्तरेकडे टोकाला हॅमबर्ग हे मोठे बंदर, पूर्वेच्या टोकाला बर्लिन ही राजधानी, तर पश्चिमेला बॉन ही पूर्वीच्या पश्चिम जर्मनीची राजधानी, फ्रँकफर्ट हे आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि आर्थिक राजधानी. त्या शेजारी डुझेलडॉर्फ हे औद्योगिक शहर. दक्षिणेला न्यूरेनबर्ग हे कारखानदारीचं शहर. तर दक्षिणेलाच म्युनिक हे व्यावसायिक शहर. वेगवेगळ्या विभागात कारखानदारीचा समन्वय त्यांनी साधलाय. त्यामुळेच तिथं खेड्याकडून शहराकडे लोकांची रीघ लागली नाही. मुंबई, दिल्ली, कलकत्ता यांच्यासारखी बकाल शहरं वाढली नाहीत की न्यूयॉर्क, सेऊल, टोकियो अशी सिमेंटची जंगल उभी राहिली नाहीत. जर्मनीत फक्त फ्रँकफर्टमध्येच थोड्याफार उंच इमारती दिसतात. अन्यथा इतर शहरांना स्काय लाईन नाही. तिथं दोन तीन मजलीच इमारती दिसतात. बर्लिन हे सगळ्यात मोठं शहर. त्याची लोकसंख्या बत्तीस लाख तर हॅमबर्ग दुसरं मोठं शहर आणि त्याची लोकसंख्या १६ लाख म्हणजे साधारणतः आमच्या ठाण्या एवढी. जर्मन माणसाला ऐसपैस दुमजली घरात रहायला आवडतं. बहुतेक जर्मन निदान सात आठ खोल्यांच्या दुमजली घरात रहातात.



नकाशावर नजर टाकल्यास युरोपमधलं जर्मनीचं भौगोलिक महत्त्वाचं स्थान लक्षात येतं. डेनमार्क, नेदरलँड, बेल्जियम, फ्रान्स, ऑस्ट्रिया, स्वित्झर्लंड, पोलंड,

झेकोस्लोव्हाकिया अशा नऊ देशांच्या सीमा जर्मनीला लागून आहेत. दक्षिणेला इटली अगदी जवळ तर उत्तरेला एका बाजूला बाल्टिक समुद्रात स्वीडन, नॉर्वे, फिनलंड असे स्कॅंडिनेव्हियन देश, तर दुसऱ्या बाजूला ग्रेट ब्रिटन. असे बारा तेरा महत्त्वाचे देश जर्मनीपासून हाकेच्या अंतरावर. स्वित्झर्लंड, ऑस्ट्रिया या देशात जर्मन बोलणारेच बहुसंख्य तर इतर देशातही जर्मन बोलता येणारे आणि समजणारे लोक अनेक. या परिस्थितीचा फायदा जर्मनीला शेतमालाची आणि औद्योगिक उत्पादनाची मोठी बाजारपेठ उभी करण्यात झाला. जगात क्वचितच कोणत्या देशाला एवढे 'सख्खे शेजारी' असतील. हीच गोष्ट युरोपियन इकॉनॉमिक कमिटीमधे (EEC) महत्त्वाचे स्थान निर्माण करायला जर्मनीच्या पथ्यावर पडली. पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देशांचा डोलारा कोसळला आणि अनेक छोट्या देशांची निर्मिती विसाव्या शतकातील शेवटच्या दोन दशकात झाली. मदतीसाठी राष्ट्रउभारणीसाठी ही उदयोन्मुख राष्ट्रं जगाकडं पहात असतांना जर्मनीला त्यांच्याशी 'जवळिक' करणं सोप गेलं ते त्यांच्या भौगोलिक आणि आर्थिक स्थानामुळं. या राष्ट्रांच्या बाजारपेठातून येणारा पैसा पूर्व जर्मनीच्या उभारणीत उपयोगी पडतो आहे. नवी जबाबदारी पेलायला तशीच त्याची धग देखील जर्मनांना विविध रुपात जाणवते. पूर्व जर्मनीच्या पुनःउभारणीत करदात्यांचा प्रचंड पैसा जातोय. या देशातून आलेल्यांमुळे एकंदरीतच बेकारीची समस्या भेडसावते आहे. मुघलांबरोबर जशी संभाजीला घाणेरडी व्यसनं लागली, तसाच प्रकार पूर्व जर्मनीच्या लोकांबाबत झाला. कम्युनिस्टांच्या सहवासात राहून ते अशिक्षित, दरिद्री झाले. दिसायला देखण्या असलेल्या तिथल्या मुलींनी दारिद्र्यावर मात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वेश्याव्यवसाय सुरु करुन जर्मनीत धुमाकूळ घातलाय. ज्या प्रमाणे फोर्ट, ग्रँटरोड भागात फिरताना रस्त्यावर जागोजागी संशयास्पद नेपाळी मुली दिसतात, तोच प्रकार हॅम्बर्गमधे. काही ठिकाणी सोनेरी केसांच्या गोऱ्यापान, धडधाकट बांध्याच्या मुली खाणाखुणा करताना आढळतात. फोरास रोड, कुलाबा याप्रमाणेच स्टेनहॅम आणि रिवावा या रात्र जागवणाऱ्या वस्त्या. हॅम्बर्गमधे उभ्या राहिल्या आहेत.

रात्रीवरून आठवलं जर्मनीच्या बहुतेक सर्व शहरांच्या, बहुतेक सर्व दुकानांच्या, सर्व लाईट्स रात्रभर चालू असतात. प्रमुख दरवाजा आणि दर्शनी भाग काचेचा असल्यामुळे भर रात्री देखील, दुकाने बंद झाल्यावर (Window Shopping) चा आनंद लुटता येतो. हॅम्बर्ग विमानतळावरून शहरात जाताना प्रत्येक घरात दिव्यांची रोषणाई दिसली. आपल्या गणपती, दिवाळी सारखी. माझ्या कस्टमर्सनी सांगितल्या प्रमाणं 'अॅडव्हेंट' चा सण साजरा होत होता. ख्रिसमसच्या दोन-एक आठवडे आधी साजरा होणारा हा जर्मनीतला प्रमुख सण. जर्मन बायका घरी स्वतः मिठाया बनवतात. नातेवाईकांना मित्रमंडळींना वाटतात, घरी बोलावतात. (क्रमशः)

**अजित पाटील**
९०४, मैत्री आनंद, लुईस वाडी, ठाणे.
दूरध्वनी : ५८२८७०१
भ्रमणध्वनी : ९८२११९२२८८

•••

*दिशाच्या पुढील अंकासाठी लेखन पाठवा -*

***पत्ता : विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.***

# शुभास्ते पन्थानः।

*डोंबिवलीतील एक रहिवासी, कला वाणिज्य महाविद्यालयाचे जुने विद्यार्थी श्री. अरविंद ओक यांनी त्यांचे कर्तबगार चिरंजीव सचिन यांना लिहिलेले हे भावपूर्ण पत्र. - संपादक*

प्रिय सचिन,

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥

तू दक्षिण ध्रुवावर चालला आहेस. त्यानिमित्ताने तुझे अभिनंदन व प्रवास आणि तेथील वास्तव्य यासाठी सर्वांच्या शुभेच्छा!

तुझी ही मोहीम ऐतिहासिक ठरणार आहेच परंतु आपल्यासाठी ही घटना म्हणजे एक अभूतपूर्व पर्व ठरणार आहे. दक्षिणध्रुवावर जे मोजके लोक जाऊन आले त्याची नोंद जग घेईलच परंतु आपल्या कुटुंबातून द. ध्रुवावर पाऊल ठेवणारा तू मात्र एकमेवाद्वितीय (Second to none) ठरणार आहेस. आम्हा सर्वांना तुझे खूप कौतुक वाटते. अभिमान तर वाटतोच वाटतो.

तेथे तुला खूप वेळ मोकळा मिळेल तेव्हा तुला घरच्या आठवणी येतील. सुखद प्रसंगाबरोबर दुःखद् प्रसंगही आठवतील. तेव्हा एक गोष्ट आवर्जून कर. दुःखद प्रसंग विसरून जा. म्हणजे त्यातील सल नाहीसा होईल.

आपल्या आनंदाला किंवा दुःखाला आपले स्वतःच मन कारणीभूत असते. Mind in its own place makes heaven of hell. असं म्हणतात ते खरं आहे.

तुझा स्वभाव मोकळा असल्यामुळे तुला ते करणे सोपे वाटेल. मी तुला आज हे खरे सांगत असलो तरी माझ्या स्वतःच्या आयुष्यात मात्र अगदी अलिकडे मी नीट वागायचा प्रयत्न करत आहे. माझे पूर्वग्रह, माझी मते आणि माझा अहंकार यापायी मी सुख असूनही त्यातून आनंद निर्माण करु शकलो नाही. स्वभावदोषामुळे मी तथाकथित (So Called) दुःख कुरवाळत राहिलो. I was happy to be sad असे विचित्र वागणे माझे होते.

आज मात्र मी जाणीवपूर्वक आनंदी राहण्याचा व विधायक दृष्टिकोन (Positive Outlook) जपण्याचा प्रयत्न करीत आहे. तुला पत्र लिहिताना मी स्वतःबद्दल लिहिणे बरोबर नाही परंतु मी कधी मन मोकळा वागलो नाही त्यामुळे माझी मनःस्थिति तुला कळावी हा माझा हेतू आहे.

तुझ्या प्रदीर्घ वास्तव्यात नकारात्मक विचार बळावून मनःस्थिती बिघडूनये म्हणून नेहमी सकारात्मक विचार कर. नकारात्मक विचार आले की जाणीवपूर्वक ते दूर ढकलं.

मी करू शकतो. मला काही अशक्य नाही, मी करीनच असा निश्चय करून प्रत्येक गोष्टीला हात घालायचा हे ठरवून टाक. (सकाळी उठल्याबरोबर देवाची आठवण कर 'वक्रतुण्ड महाकाय आणि गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः ' हे दोन श्लोक तुला येतातच.) नंतर देवापाशी प्रार्थना करायची आणि त्याला सांगायचे की माझा आजचा दिवस अतिशय आनंदात व प्रसन्नतेने पार पाडणार आहे.

खाताना किंवा जेवताना पुन्हा देवाचे स्मरण करायचे व झोपताना देवाचे आभार मानून झोपायचे.

ईश्वरशक्तीची साथ आहे ही भावना जागृत ठेवली तर मनाला आणि त्यामुळे तनालाही अफाट बळ प्राप्त होते.

सहकाऱ्यांशी वागताना पारिवारिक भावना ठेवण्याचा प्रयत्न कर. चोवीस तास सहवास असला की दुसऱ्यातील गुणदोष उघडकीला येतात. त्यातील दोष सोडून देऊन

---

जे जमिनीवर झोपतात त्यांना पडण्याची भीती नसते.

त्याच्यातील गुणांचे कौतुक कर. दोष दाखविणे सोपे आहे, परंतु एकादा छोटा गुण सुद्धा कौतुकास्पद वाटणे व तसे व्यक्त करणे यात मनाचा मोठेपणा आहे.

नित्यनेमाने डायरी लिही. रोजचा दिनक्रम, घटना यांचा संक्षिप्त उल्लेख त्यात असावा. परंतु वेळ मिळेल तेव्हा वेगळ्या वहीत तुला आवडलेल्या घटना, पाहिलेले स्वभाव विशेष. एखाद्याचा विशिष्ट पैलू, तुझ्या मनावर खूप प्रभाव पाडणारी व्यक्ती किंवा प्रसंग याचे तू सांगोपांग वर्णन कर. तुझ्या या लिखाणाचे प्रासंगिक, साहित्यक व ऐतिहासिक मूल्य फार आहे हे अवश्य लक्षात ठेव.

आम्ही रोज रात्री झोपण्यापूर्वी व सकाळी उठताक्षणी तुझी आठवण करु. तुला नक्की त्यामुळे उचकी लागेल. तू जम्मू-काश्मिर विभागात होतास तेव्हा तू घरापासून दूर एकटाच, पण देशात होतास. आता मात्र तू देशापासून आणि मानववस्तीपासून खूप दूर जात आहेस.

वनस्पती सृष्टी आणि प्राणिसृष्टी यापासूनही तू खूप दूर असणार आहेस. परंतु या साऱ्या विश्वाची नियामक शक्ती म्हणजे ईश्वर, त्या सर्वव्यापी शक्तीपासून मात्र तू फार जवळ असशील म्हणजे तू ईश्वराच्या कुशीत असशील.

तू म्हटलेले मंत्र तू म्हटलेली स्तोत्रे, तू केलेले चांगले विचार या साऱ्यांचे मंडल अण्टार्टिकावर सदैव राहणार आणि वैश्विक किरणांचे (Cosmic Rays) प्राबल्य या शांत खंडावर मोठ्या प्रमाणात असेल. जगातल्या साऱ्या ऋषींचे मंगल व पवित्र विचार आणि तुझे पवित्र व सकारात्मक विचार हे या वातावरणात एकमेकांत मिसळतील व त्यांचा उपयोग तुम्हाला आणि साऱ्या जगाला होईल.

अशोक काकाचा आत्मा नक्की तुला या वास्तव्यात भेटेल आणि तुझ्या कामगिरीमुळे तुला शाबासकी देईल. अशोक काका तुझ्या प्रगतीमुळे व त्याच्या आकांक्षाना मूर्त स्वरूप तू दिल्यामुळे फार आनंदात असेल. घरच्या गोष्टी मी लिहीत नाही परंतु आम्ही एकमेकांना समजून घेऊन आनंदाने राहू व चि. ईशानला आनंदाने न्हाऊ घालू इतकेच सांगतो.

दक्षिणध्रुवावर तू असताना देव तुझे रक्षण करो व तुला सतत देवाची जाणीव राहो अशी प्रार्थना करून तुला निरोप देतो.

ज्या भारतभूमीत तू जन्मला आलास तिचे पांग फेडण्याची संधी तूला देवाने दिली आहे.......

ही भूमी प्रिय देवांना
ही माती प्रिय संताना
ही माता प्रिय पुत्रांना
हा गौरवशाली जन्म मला भाग्याचा
मी असे भारताचा

या भारत मातेसाठी मी काय करु शकतो?

मी देवमान्य वागेन
मातेला सांभाळेन
ऋण अंश तरी फेडेन
हा निश्चय माझा असे याच जन्माचा
मी असे भारताचा

मातृभूमीचे ऋण फेडण्याची संधी मिळाल्याबद्दल आपण सारे या देवापाशी कृतज्ञतेची भावना व्यक्त करू या!

**अरविंद नी. ओक**

५, दिनकर सोसायटी,
आगरकर हॉल जवळ,
मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१
•••

# ''ममा-डॅडीला निपीचं पत्र''

*घरातल्या घरात आईवडीलांना पत्र लिहून मन मोकळं करण्याचा एक वेगळाच प्रकार निपीच्या अभिव्यक्तीतून वाचावयास मिळेल. - संपादक*

डिअरेस्ट ममा अँन्ड डिअरेस्ट डॅडी,

आज मी तुम्हा दोघांनाही घरातल्या घरातच पत्र पाठवणार आहे. तुम्ही दोघांनीही पत्र वाचावं, वाचून ठेवून न देता विचार करावात असंही वाटतं. मला माहीत आहे, तुम्हा दोघांनाही खूप खूप आश्चर्य वाटेल, की एवढासा, ममाच्या शब्दात '' अगदी अंगठ्याएवढा लिंबू-टिंबू निपी'' आणि पत्र ? पण ममा, डॅडी तुमच्याशी समोरासमोर बोलण्यापेक्षा पत्रातून वाचूनच तुम्हा दोघांनाही जाणवेल की आपला निपी आता मोठा झाला.

ममा-डॅडी, आपलं घर. खरं तर आपलं असं म्हणताही मनात विचार येतो, आपलं म्हणजे कोणा-कोणाचं? कारण आपल्या घरात प्रत्येकाचं वेगळं असं स्थान आहे. प्रत्येकाचं वेगवेगळं विश्व आहे. आणि प्रत्येक जण आपापल्या विश्वातच मश्गूल आहे. कुणालाच कुणाच्याही विश्वात जराही डोकावून बघायला वेळ नाही, आस्था-इंटरेस्ट तर मुळीच नाही.

डॅडी-ममा, अजूनही मला आठवतं, मी अगदी लहान होतो, त्यावेळी मला मध्ये ठेवून, तुम्ही विचारायचात -'' निपी, तू ममाचा का डॅडीचा ?'' ममाच्या ओठांची पप्पी आणि डॅडीच्या हातातली कॅडबरी खरं तर हा प्रश्नच मला विचारु नका रे असं वाटायला लावायची. कारण इतक्या लहान वयातही मला दोन्ही हवेत ह्याची जाणीव असायची. खरं तर तुम्हा दोघांमधील ही एक गंमत असायची. मी सुद्धा खूप खूप डिप्लोमॅटिक वागायचो, मी मग तुम्हा दोघांचे एकमेकांशी संवाद साधणारे डोळेच मी अगदी योग्य वागलो याची मला खात्री पटवून द्यायचे.

पण नंतर कधीतरी अगदी हळू हळू पण निश्चितपणे तुम्हा दोघांचा हा डोळ्यांमधून चालणारा ''संवाद'' संपायला लागला आणि तुम्हा दोघांच्याही तोंडातून निव्वळ ''वाद'' साधला जाऊ लागला. डॅडी, तू बरोबर का ममा चूक, ममा बरोबर की डॅडी चूक? या कशा कशाशी माझा संबंधच नव्हता रे. डॅडी, मलाही कळत होत, कधी तू बरोबर असायचास, तर कधी ममा बरोबर असायची, तर कधी तुम्ही दोघंही एकदमच बरोबर आणि चूकही असायचात. पण या सगळ्यात मी कुठे असायचो ते कधीच मला उमगलं नव्हत. तुमच्या दोघांच्या वादावादीत मी भांबावून जायचो, स्वत:शीच कुढायचो. आणि मी कुठे आहे हे उमगलं तेव्हा मी होतो एका पिंजऱ्यात. खूप खूप उंच बसलेला एका माणूस मला विचारत होता, तोच लहानपणाचा प्रश्न- '' तुला डॅडी हवा की ममा हवी ?'' फरक असलाच तर इतकाच होता की डॅडी, तेव्हा तुझ्या हातात कॅडबरी नव्हती आणि ममाच्या ओठांची भनुकली माझी पप्पी घेण्यासाठी आवळलेली नव्हती.

डॅडी परत एकदा मला तू ही हवा होतास आणि ममाही हवी होती. कल्लोळ माजला होता माझ्या छोट्याशा डोक्यात की कोण हवं मला ? कोणाची पार्टी, मी माझी पार्टी म्हणू ? डॅडी, मी तुझ्याकडे बोट दाखवत होतो तेव्हा ममाला सोडावं लागत होतं. मग मला रोज भरवणार कोण, गोष्ट कोण सांगणार, शाळेत कोण सोडणार, अभ्यास कोण घेणार ? अंघोळ कोण घालणार, मी रात्री कोणच्या कुशीत झोपायचं, आणि माझ्या गालांची '' निपी बॉय नकटा-नाकानी फेपटा '' म्हणत पापी कोण घेणार ? हजार प्रश्न माझ्यापुरते स्वार्थीपणाचे असले तरी चिमुकल्या मेंदूसाठी खूपच गहन.

ममा, मी तुझ्याकडे बोट दाखवलं असतं तर माझा डॅडी माझ्यापासून लांब पळत होता. मग परत तीच स्वार्थी पण आवश्यक प्रश्नांची दाटी. मी कारराईडला, विकएन्डला कोणाबरोबर जायचं ? ॲन्यूअल फंक्शनसाठी डॅडी कुठून आणायचा ? आणि डॅडींच्या हातातली कॅडबरी, ती तर दूर पळत होती. ममा-डॅडी काही वर्ष वेगवेगळे राहूनही तुम्ही दोघं परत एकत्र आलात. त्या वर्षांनी मला काय काय दिलंय माहीत आहे? घृणा, संशय, कोरडी सहानभूती, "बिच्चारा" हे टोपणनाव, फाजील चौकसपणा आणि माझ्यापाठीमागे एकमेकांच्या कानाशी लागून केली जाणारी कुजबूज. एवढं सगळं मला मिळालं.

डॅडी-ममा पण वेळीच हे सगळं तुम्ही दोघांनी आटोपतं घेतलंत. म्हणून आज आपलं घर पुन्हा एकदा उभं आहे. तुम्ही दोघही मला परत एकदा मिळालात. "ममा, भांडतं असावं, बुडतं नसावं". असच ना तू नेहमी म्हणायचीस ? तुम्ही दोघ एकत्र आलात. मला घर मिळालं. दोघांपैकी कोणी नमतं घेतलं, कोण झुकलं, वाकलं याला महत्त्व नाही. महत्त्व आहे ते दोन पावलं डॅडी पुढे आला तर दोन पावलं ममा मागे गेली याला. खरं तर तुम्हा दोघांनाही थँक्स. आपापले " इगो" जे माणसाला रसातळाला नेऊ शकतात, नेस्तनाबूत करु शकतात, असे " इगो" तुम्ही दोघांनीही बाजूला ठेवलेत. डॅडी-ममा - " घर कोणाचं ? घर दोघांचं-एकाने पसरवलं तर दुसऱ्याने सावरायचं. एकाने पसरवलं तर दुसऱ्याने झेलायचं, नाजूक-कोवळ्या पंखांसाठी कुणीतरी वेळीच माघार घेऊन का होईना पण खंबीरपणे पेलायचं"

डॅडी-ममा, मला तुम्ही दोघही हवे आहात. " आय लव्ह बोथ येस, आय मिन इट्-बोथ ऑफ यू"

तुमच्या दोघांचाही लाडका,
नकटा-फेफटा निपी.

**सौ. प्रीती देशमुख-कारखानीस**
अंजली सोसायटी, पाचपाखाडी, ठाणे.

***

## प्रश्न आणि उत्तरांचा खेळ

मागील अंकातील उत्तरे

(१) २ (२) ४ (३) ३ (४) ४ (५) १ (६) २ (७) ४ (८) १ (९) ३ (१०) २

**या महिन्याचे प्रश्न**

१) 'अदिस अबाबा' ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
१) केनिया २) बलुचिस्थान ३) इथोपिया ४) घाना

२) राजकपूर व दिलीपकुमार यांच्या भूमिका असणारा एकमेव चित्रपट कोणता ?
१) इन्सानियत २) आवारा ३) आग ४) अंदाज

३) फाउंटनपेन चा संशोधक कोण ?
१) नील हार्वे २)लुईस ई वॉटरमन
३) हेन्री स्मिथ ४) डब्ल्यू आर् वॉटरमन

४) 'यू कॅन विन ' हा ग्रंथ लिहिणारे लेखक ?
१) पंडित नेहरू २) शरू रांगणेकर
३) आर् के. नारायण ४) शिव खेरा

५) विद्या प्रसारक मंडळाचे स्थापना वर्ष कोणते ?
१) १९२८ २) १९३३ ३) १९३५ ४)१९४६

६) 'जा मुली जा, दिल्या घरी तु सुखी रहा....' हे भावगीत लिहिणारे कवी कोण ?
१)ग. दी. माडगूळकर २) सुधीर मोघे
३) पी. सावळाराम ४) अनंत काणेकर

७) डिस्कव्हरी ऑफ इंडिया हा ग्रंथ प. नेहरूंनी कोठे असताना लिहिला ?
१) मुंबई २) अहमदनगर ३) नाशिक ४) नागपूर

८) रात्र आरंभ या चित्रपटात कोणता मानसिक आजार दाखवण्यात आला आहे ?
१) हायपर ॲक्टीव्हिटी २) मोटर स्कील डिसऑर्डर
३) स्किझोफ्रेनिया ४) ऑटिस्टिक डिसऑर्डर

९) वानखेडे स्टेडियम होण्यापूर्वी मुंबईत क्रिकेट सामने कोठे होत?
१) शिवाजीपार्क २) अंधेरी क्रीडा संकुल
३) ब्रेबॉर्न स्टेडियम ४) या पैकी एकही नाही.

१०) ग्रेस या कवीचे खरे नाव काय ?
१)अनिल गोडबोले २) रजनीकांत जाधव
३) श्रीश्रीनिवास पाटणकर ४) माणिक गोडघाटे

(उत्तरे पुढील अंकी)

# असा एक 'आरसा' प्रत्येकाकडे हवा

*आपण आपल्याला ओळखत असतो का? आपण आरशात पहातो का ? स्वतःला स्वतःची ओळख पटवून देणारा आरसा आपल्याजवळ आहे का ? - संपादक*

'व्यक्ती तितक्या प्रकृती' असा अनुभव आपल्याला वारंवार येत असतो. काही व्यक्ती ह्या दुसऱ्यांची उणीदुणी काढण्यातच धन्यता मानत असतात. त्यांना नेहमी दुसऱ्यांच्या डोळ्यांतल (अगदी नसलेलं देखील) मुसळ दिसत असतं. त्रासिक, तुच्छतादर्शक चेहरा करुन ते तुमच्याशी बोलतात. असे हे 'टीकाकार' लोक तुमच्यावर सदैव टीकाच करतात. कुठल्याही बाबतीत ते तुम्हालाच खोटं किंवा चुकीचं ठरवण्याचा प्रयत्न करतात. याउलट काहीजण अगदी 'गोडबोले' असतात. त्यांच्या चेहऱ्यावर सदैव हासू पसरलेलं असत आणि त्यांची वाणी अगदी मिठ्ठास असते. पण अशा व्यक्तींची काही खात्री देता येत नाही. त्यांच्या मनात खरं काय आहे हे तुम्हाला कळतच नाही. त्यांना तुम्ही काही सल्ला, मत वगैरे विचारलत तर खरं किंवा योग्य तेच सांगण्याऐवजी तुम्हाला आवडेल, रुचेल तेच ते ऐकवतील. याहीपुढे जाऊन कारण नसताना उगाचच तुमची स्तुती करतात. तुम्हाला हरभऱ्याच्या झाडावर चढवू पाहतील. तुमच्या 'हो' ला 'हो' आणि 'नाही' ला 'नाही' म्हणत हे 'गोडबोले' 'राखावी बहुतांचि अंतरे' हे वचन खर करत असतात. याहून वेगळा तिसरा वर्ग म्हणजे तटस्थांचा. हे लोक तुम्हाला चांगलाही म्हणत नाहीत की वाईटही म्हणत नाहीत. तुमच्या गुणदोषांचे त्यांना सोयरसुतक नसतं. 'आपण बरे की आपलं काम बरं' अशी त्यांची वृत्ती असते. त्यांना तुम्ही काही विचारायला गेलात की 'तुम्हीच ठरवा बुवा काय ते! मी काय सांगणार?' किंवा 'मला बाई काही कळत नाही त्यातल' अस म्हणून ते हात झटकून मोकळे होतात. खरं बोलून कशाला उगाच वाईटपणा घ्या असं त्यांना वाटतं. अशावेळी मात्र आपली खरी पंचाईत असते. कारण हे श्री. उणीदुणी काय, श्री. गोडबोले काय किंवा श्री. तटस्थ काय यांच्याकडून आपल्याला काहीच मार्गदर्शन किंवा मॉरल सपोर्ट मिळत नाही.

म्हणूनच प्रत्येकाकडे किमान एक स्वच्छ, नितळ, प्रामाणिक असा मानवी 'आरसा' असण्याची फार आवश्यकता असते असं मला वाटतं. हा मानवी 'आरसा' म्हणजे मग तुमचा एखादा मित्र किंवा मैत्रिण, झालाच तर तुमचे नातलग, शेजारी किंवा घरातल्यापैकी कुणीही असू शकेल. अशा या मानवी 'आरशा' पुढे उभ राहताना कुठल्याही प्रकारची भीती, संकोच किंवा दडपण न वाटता तुम्ही अगदी स्वतः स्वतःला तुमच्या 'स्व' ला पाहू शकाल. ते ही स्वतःच्या डोळ्याला डोळा भिडवून. अगदी प्रांजळपणानं, मोकळेपणानं आपलं अंतरंग त्याच्या वैगुण्य आणि गुणासकट उघड करता येतील असा हा आरसा असायला हवा. काचेचा आरसा ज्याप्रमाणे तुमच्या चाफेकळी नाकाचं कौतुक करत नाही किंवा तुमच्या चेहऱ्यावरच्या डागांना तो हसतही नाही, तुम्ही जसे आहात तसेच तुम्हाला फक्त दाखवण्याचा काम करतो. त्याचप्रमाणे त्या मानवी चालत्याबोलत्या आरशांनदेखील तुमच्या गुणदोषांची अवास्तव स्तुती किंवा निंदा करता तुमच रुप (स्वरुप) तुम्हाला दाखवले पाहिजे. म्हणजे मग आरशात बघून आपण जसे आपले विस्कटलेले केस सारखे करतो, कपडे ठाकठीक करतो तस ह्या मानवी आरशात बघून आपण आपल्या अंतर्मनातील दोष, नकारार्थी भावभावना दूर करुन आपण आतल सौंदर्य वाढवता आलं पाहिजे.

---

ग्रंथ म्हणजे काळाच्या विशाल समुद्रातून माणसाला घेऊन जाणारी जहाजेच आहेत.

स्तुती तर देवांनाही प्रिय असते. मग मर्त्य माणसाची काय कथा ? आपले दोष दाखवलेले आपल्याला मुळीच आवडत नाहीत. काही माणसं तर इतकी असहिष्णु, अहंमन्य आणि असंमजस असतात की त्यांना शुद्ध हेतूने केलेली टीका किंवा त्यांच्या मताच्या विरुद्ध मत व्यक्त केलेले त्यांना जराही खपत नाही. ते लगेच तुम्हाला शत्रू मानू लागतात. तुमच्याबद्दल मनात आकस ठेवून वागू लागतात. भिंतीवरच्या आरशानं आपले वेडेवाकडे दात दाखवले म्हणून काही आपण राग येऊन तो फोडून टाकत नाही. उलट त्या 'वेड्यावाकड्या' दातांना 'सरळ' करण्यासाठी डेंटीस्टकडे जाण्याचा सूज्ञ निर्णय घेतो. आपल्यावर होणारी टीका, अगदी सहेतूक असली तरी, ऐकून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. त्यात तथ्य असेल तेवढे स्वीकाराव बाकीचें सोडून द्यावं. ज्युलियस सीझरशी, त्याचे सेनाधिकारी, सैनिक एवढच काय तर राजवाड्यातले दासदासींसुद्धा स्पष्टपणे, जे वाटतं ते बोलू शकायचे. अगदी त्याच्यावर टीकाही करायचे प्रसंगी. आपल्या आजूबाजूच्या लोकांना मोकळेपणानं बोलू दिलं तर त्यांच्या बोलण्यातून आपल्याला स्वतःविषयी आणि त्यांच्या विषयी देखील बरंच काही समजतं आणि त्यातून बोध घेता येतो असं सीझरचं मत होतं.

वास्तविक आपण स्वतःला नीट ओळखून असतो. पण आपला खोट्या अहंपणामुळे, किंवा स्वतःवरच्या अतिप्रेमामुळे आपल्याला आपले दोष दिसत असूनही दिसत नाहीत. एवढंच काय तर बरेचदा स्वतःकडे नीट निरखून न पाहिल्यामुळे आपल्या गुणांचाही आपल्याला कस्तुरीमृगाप्रमाणे पत्ताच नसतो. शिवाय तुम्हाला तुमचं खरं रुप (स्वरूप ) दाखवण्याऐवजी म्युझियम मधल्या 'मॅजिक मिरर्स' (Magic Mirrors) प्रमाणे तुम्हाला तुमच 'फसवं' रुप दाखवणारे काही मानवी आरसे तुमच्या अवतीभोवती असतात. त्यामुळे तुम्हाला स्वतःच मूळ रुप विसरायला होतं. कुणी तुम्हाला 'हत्ती' बनवतो, कुणी बुटुकबैंगण तर कुणी बनवतो ताडमाड 'जिराफ'. तेव्हा या सगळ्या आरशांमधून साधा स्वच्छ आपलं खरं तेच रुप दाखवणारा आरसाच निवडायला हवा. नाही मिळाला तर मग 'तोरा मन दर्पण कहलाए' हे लक्षात असू द्या. थोड्याशा चिंतनात, आत्मपरीक्षणात या मानवी आरशावरचा 'अहं' चा पडदा दूर होऊन तुमचा 'स्व' चे खरेखुरे दर्शन तुम्हाला घडू शकेल.

**वर्षा गटणे**
अ/३०२, विनायक सोसायटी,
मीठबंदर रोड, ठाणे (पू.) ४०० ६०३.

* * *

हार्दिक शुभेच्छा.

**श्री साताळी देवी सहकारी पतसंस्था मर्यादित (आकुळे) मुंबई.**

रजि. नं. [illegible]

**कार्यालय :**
बी/२१५, शिवाजी पार्क, ना. म. जोशी मार्ग, मुंबई - ११.

**आपले नम्र**

श्री. दत्तात्रय पां. पाये (चेअरमन) श्री. आनंद ना. पवार (सेक्रेटरी) श्री. आनंद द. पाटील (खजिनदार)

श्री. लक्ष्मण प. खोत (व्हा. चेअरमन), श्री. सुदर्शन बा. पाटील (खजिनदार), श्री. बापुराव बा. लोहार (संचालक), श्री. बळवंत ग. पाटील (संचालक), श्री. राजेंद्र ब. पाटील (कार्यकारी संचालक), सौ. उमा भगवान सांळुखे (संचालिका), श्री. नारायण शं. पाटील (संचालक), श्री. सुरेश पाटील, (संचालक), श्री. रामचंद्र हु. साळोत , श्री. रामचंद्र ग. पाटील (लेखनीक)

टीप : नवीन सभासद फॉर्म भरणे चालू आहे. (आजच सभासद व्हा)

# या मुळे शनिदेवाचा कोप होईल का ? .....

*आपल्याकडे कितीतरी पद्धतींनी साधन सामुग्रीचा विनाश केला जातो. श्रद्धा, अंधश्रद्धा यांच्यापायी असा विनाश होणे बरोबर आहे का ? - संपादक*

शनिदेवाच्या प्रकोपाची भीती अनेकांना वाटते. दर शनिवारी शनीची साडेसाती संपावी म्हणून शनिदेवाच्या मंदिरात जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. नगर जिल्ह्यातील शनिदेवाच्या शनी-शिंगणापूरला आता अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. शनिवारी विशेषतः शनिअमावस्येला तर हजारो भाविकांची येथे अलोट गर्दी उसळते.

शनी-शिंगणापूरला चौथऱ्यावर स्त्रियांना प्रवेश नाही. मध्यंतरी अंधश्रद्धा समितीच्या वतीने करण्यात आलेल्या स्त्रियांना शनीमंदिरात प्रवेश द्यावा या घोषणेने या परिसरात मोठा गोंधळ उडाला होता. आता तो वाद काहीसा शमला असून नवीन वाद पुढे येत चालला आहे. येथे असणाऱ्या शनीच्या स्वयंभू मूर्तीची हळूहळू झीज होत चालली आहे. भाविकांच्या भक्तीच्या उत्साही प्रेमापोटी या मूळ मूर्तीलाच धोका पोहचू लागला आहे.

शनी-शिंगणापूर येथे शनिदेवाची स्वयंभू मूर्ती आहे. ही मूर्ती म्हणजे काळ्या दगडाची एक शिळा असून प्रत्यक्ष शनी महाराजांचे वास्तव्य या शिळेत आहे अशी भाविकांची श्रद्धा आहे. या मूर्तीवर छत नसल्याने वर्षाचे ३६५ दिवस ही शिळा ऊन, वारा, पावसात उभी आहे. शनी कथेनुसार खुद्द शनिमहाराजांनी दृष्टांत देवून मला निवारा, छत्र किंवा छाया यांची गरज नसल्याचे सांगितले जाते. शनी देवाचे हे स्थान जागृत आणि स्वयंभू असल्याने या ठिकाणी भक्तांची सतत रीघ असते. शनिदेवाला तेल अर्पण करावे अशी भाविकांची श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळेच या मूर्तीवर रोज शेकडो लिटर तेल भक्तगण ओतत असतात. शनीला तेल अर्पण करणे यामुळे अक्षरशः बाटल्या भरभरून तेल ओतले जाते. परिणामी मूर्ती भोवतालचा चौथरा पूर्णतः तेलाने भरून जातो. संपूर्ण चौथरा रोज धुवूनही तेलामुळे अनेकजण पडतात.

प्लॅस्टीक पिशव्यांचा वापर मुक्तपणे होवू लागल्यापासून तर शनी-शिंगणापूरला एका विचीत्र प्रकाराला सुरुवात झाली. येथे येणारे अनेक भक्तगण प्लॅस्टिकच्या छोट्या पिशव्यांतून शनीवर तेल सोडण्यासाठी आणतात. वास्तविक मूर्तीवर तेल सोडताना पिशवीची गाठ सोडून तेल भक्तीभावाने अर्पण करावे असा प्रघात आहे. मात्र बहुसंख्य लोक तेलाने भरलेल्या या प्लॅस्टिकच्या पिशव्या शनिदेवाच्या मूर्तीवर आपटतात. मूर्ती दगडाची असल्याने प्लॅस्टिकच्या पिशव्या धाडकन् फुटतात त्यामुळे त्यातील तेल आजूबाजूच्या भक्तांच्या अंगावर उडते. रंगपंचमीच्या दिवशी जसे पाण्याने भरलेले फुगे, प्लॅस्टिकच्या पिशव्या एकमेकांच्या अंगावर मारून फोडल्या जातात त्याप्रमाणे शनिदेवाच्या शिळेवर तेलाने भरलेल्या प्लॅस्टिकच्या आपटल्या जातात. वास्तविक ज्या शनिदेवाला अर्पण करण्यासाठी तेल आणले जाते ते तेल देवाला अर्पण करताना खुद्द मूर्तीवरच प्लॅस्टिकच्या पिशव्या आपटणे योग्य नसल्याचे अनेक भक्तांचे मत आहे. या प्रकाराने मूर्तीला हानी पोचू लागली आहे.

प्लॅस्टिकच्या पिशव्यांबरोबर मूर्तीची झीज होण्याचे आणखी एक कारण म्हणजे या मूर्तीवर ओतण्यात येणारे शेकडो लिटर्स तेल ! अनेकजण बाटल्या भरभरून तेल आणून मूर्तीवर अभिषेक घालावा त्याप्रमाणे तेल ओततात. कोकाकोला, पेप्सीच्या बाटल्यातून येथे तेल विक्रीसाठी

काळ आपल्या डोक्यावरून उडून जातो आणि मागे त्या उड्डाणाची छाया असते.-हॅवथ्रोन

मिळते. ३०० मिली तेलाची बाटली २० रुपयांच्या आसपास मिळते. या बाटल्या भरभरून तेल मूर्तीवर ओतले जाते. शनिदेवाला जास्तीतजास्त तेल अर्पण केले की, आपल्याला जास्त फायदा होईल. देवाची मर्जी आपल्यावर होईल अशा प्रकारचा चुकीचा समज काही भक्तांमध्ये आहे. शनिदेवाने असे कुठेच म्हटले नाही की, जो जास्तीत जास्त तेल मला अर्पण करेल त्याच्यावर माझी कृपादृष्टी राहील. सच्चा भक्तीभावाने देवाला अर्पण केलेले चमचाभर तेलही त्याच्यापर्यंत पोचते. बाटल्या भरभरुन तेल मूर्तीवर ओतल्याने मूर्तीची किती हानी होते याचा विचारच कोणी करीत नाही.

दिवसाला ३०० मिली ची एक बाटली याप्रमाणे दिवसभरात एक हजार भक्तांनी जरी तेल घेऊन मूर्तीला अर्पण केले तरी तीन हजार लिटर्स तेल मूर्तीवर अक्षरश: ओतले जाते. शनिपौर्णिमा, शनिअमावस्येच्या दिवशी तर भक्तांची संख्या लाखावर जाते. यामुळे मूर्तीवर रोज किती तेल पडत असले याचा विचार न केलेला बरा. तेलाच्या या अतिरेकी वापराने शनिमूर्तीच्या अमूल्य शिळेची झीज अपरिहार्य आहे. देवाला अर्पण करण्यात आलेले हे तेल नंतर गटारातच फुकट जाते. केवळ श्रद्धेच्या दिखाव्यापोटी एवढे हजारो लिटर्स तेल वाया घालवणे योग्य आहे का ? याचा विचार सर्वांनी करायला हवा. या मूर्तीचे जतन व्हावे तसेच तेलाची बचत व्हावी यासाठी जास्तीतजास्त एक वाटीभरच तेल वाहण्याची शिस्त देवस्थानने लावण्याची गरज निर्माण झाली आहे. शनिदेवाची ही स्वयंभू मूर्ती ५' ९" उंच व १'६" रूंद आहे. नगर जिल्ह्यात नेवासा तालुक्यात असणारे शनि-शिंगणापूर गाव मुंबईपासून ३४६ कि.मी. वर आहे. शनैश्वराची ही स्वयंभू मुर्ती जतन करणे हे आता केवळ भक्तांच्याच हाती उरले आहे.


**के. शशिकांत**
E-mail : shashi421@hotmail.com

***

### कबुतर खाना

कालच सकाळी कबुतरखान्यावर
कबुतरं न्याहाळत होतो.
दाणे टिपणाऱ्या त्या पाखरांच्या
मोहक हालचाली पाहिल्या ....
मन थेट
कौपिनेश्वरमंदिरामागून
उडालं... अगदी थेट
२-२ ॥ वर्षांचा मी हैद्राबादच्या
त्या प्रसिद्ध विवेकवर्धिनी शाळेच्या
पटांगणात,
कबुतरांना दाणे घालू लागलो
आणि क्षणातच,
दादरच्या कबुतरखान्याजवळच्या आठवणी
मनात दाटून आल्या...
दाटून आल्या कबुतरांच्या निःस्सीम
प्रेमाच्या क्षणांच्या जागा...
काल संबंध दिवस मनाच्या कबुतरखान्यात
आठवणींचे थवे.... दाणे टिपत
पाणी पीत.... काल संबंध दिवस .....

\- विहंग



# एकतर्फी प्रेमाची कारणं व उपाय

*एकतर्फी प्रेम या विषयावर सुरुवातीस एक भाषण दिले आहे. हाच ज्वलंत विषय वेगळ्या दृष्टीने - संपादक*

आजची सहस्रकातील स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहे. स्वकर्तृत्वावर तिने सर्व क्षेत्र काबीज केली आहेत. शिखर चढण्यापासून ते पोहण्यापर्यंत, पंतप्रधानाच्या खुर्चीपासून अधिकार पद गाजविली आहेत, सर्वच क्षेत्रांत ती यशस्वी झालेली आहे. शैक्षणिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला-खांदा लावून आपले कर्तृत्व स्त्री दाखवीत आहे. मुलभूत हक्क, स्त्री स्वातंत्र्य आणि समानता, ह्यांचे लढे देतांना स्त्रीला आपल्या शक्तीची व कुवतीची कल्पना आलेली आहे. आपल्या कर्तव्याची जाणीव झालेली आहे. पण पुरुषांच्या बरोबरीने समानतेचे आपले कर्तव्य बजावताना स्त्रियांना पुरुषांचा अनुभव वेगळाच येत आहे. स्त्री-पुरुषांच्या समानतेची स्त्रीची जी कल्पना आहे तिला आज तडा जात आहे. अजूनही पुरुषांकडून स्त्रीचा लैंगिक छळ होत आहे. रोजच्या वृत्तपत्रांत आपण वाचतच असतो विनयभंग, बलात्कार, सामूहिक बलात्कार ही पशुतुल्य वागणूक पुरुषच स्त्रियांना देऊ शकतात आणि त्यातूनच आता एक उपद्रव घडत आहे एकतर्फी प्रेमाचा -

प्रेम म्हणजे काय? खरी प्रीती कधीही एकमार्गी नसते, किमान दोन समानशक्ती परस्परांविषयी सौहार्द भावना व परस्परांत समरसता असणाऱ्या व्यक्तींमध्येच प्रितीसंबंध होऊ शकतात आणि ह्याची जाणीव नसल्यामुळेच आज एकतर्फी प्रेमाचा उपद्रव होऊन विध्वंसक कृती घडून हिंसक घटना समाजात वाढत आहेत. हे बघून पालक व समाज अस्वस्थ होत आहेत. पालक आपल्या पाल्यावर बंधन घालू पाहात आहेत पण हे असे का घडते आहे? ह्याची कारण मीमांसा व उपाय शोधले पाहिजेत.

कसलीही नीतीमत्ता नसलेले, व्यापारीकरण झालेले खाजगी चॅनल्स ही प्रसारमाध्यमे, शिक्षणपद्धत, समाज संस्कार, परिस्थिती, वातावरण समाजातील खुळेपणा आणि मानसिकता आजच्या ह्या कलीयुगांत किशोरवयीन मुलींच काय प्रौढ, म्हाताऱ्या व लहान बालकं ह्यानाही अनैसर्गिक प्रवृत्तीपासून जपावे लागते आणि ही फारच चिंताजनक बाब आहे. मनुष्य प्राण्यांच्या मनातील अदी संस्कृतीच्या नावाखाली गैरसमज संकोच, भय, अभिज्ञता, अज्ञान, बेजबाबदारपणा, पळपुटेपणा अंहभाव सहज प्रेरणांना विनाकरण दाबण्याची वृत्ती लैंगिक ज्ञानबाधक अज्ञान मुलां-मुलींचे वय इ. सर्व कारण एकतर्फी प्रेमाला कारणीभूत आहेत.

शाळा-कॉलेजात नोकरीच्या ठिकाणी स्त्री-पुरुष एकत्र येत असतात. दिवसांतले आठ-तास तरी एकमेकांच्या सहवासांत रहात असतात. स्त्रियांकडून थोडासा आपुलकीचा प्रतिसाद मिळाला तर पुरुष त्याचा अर्थ वेगळाच घेतात आणि स्त्री कडे वेगळ्याच दृष्टीने पाहात असतात. शाळा-कॉलेजात एक चांगला मित्र ह्या नात्याने वागल्यास मुलांच्या मनात वेगळीच भावना निर्माण होत असते. मैत्रीच्या पलीकडे जाऊन अजून त्याना काहीतरी हवं असत. तारुण्यांच्या उंबरठ्यावरील वाढते शारिरीक आकर्षण हेच कारणीभूत असते त्यात चित्रपटात व टी.व्ही. मालीकेत प्रेमाची जी व्याख्या दाखवतात 'तू हां कर या ना कर, तू है मेरी किरन' म्हणजे मुलीच्या भावनेला विचारांना इच्छेला काहीच किंमत नाही, एखादी हिरोईन जो पर्यंत होकार देत नाही तो पर्यंत आपल्या मित्राला घेऊन तिची छेड-छाड करीत पाठ-पुरावा करुन प्रेम जुळवून आणायचे

हे सतत पाहिले जात असल्यामुळे आवडलेल्या मुलीला आपलंस करण्यासाठी वाटेल त्या मार्गांचा अवलंब केला जातो.

एक काळ असा होता की समाजात यौवनाच्या उंबरठ्यावर आल्यावर तरुणीचा झटपट विवाह पार पाडीत असत. पण आज परिस्थिती बदलली आहे. आजचे पालक मुलीला शिक्षण देऊन तिला स्वत:च्या पायावर उभे करतात. त्यामुळे मुली आपल्या करिअर बद्दल जागृत होतात व आपल्या लग्नसंदर्भात लवकर विचार करीत नाहीत, परिपक्वता आलेली असते. आपला जोडीदार कसा असावा? ह्या बदलच्या अपेक्षा वाढलेल्या असतात आणि मग तारुण्याच्या उंबरठ्यावर एखाद्याचे जुळलेली नाते मुली मानायला तयार नसतात आणि मग घडतं एक विध्वंसक वृत्ती समजाला दिसते एकतर्फी प्रेमाची वृत्ती.

प्रसारमाध्यमातील अश्लीलता, मुलींची फॅशन, राहतांमान उठता-बसता मुलांना होणार सहजस्पर्श, असभ्य भाषा, फाजील डायलॉग, गाणी आणि आई-वडील दोघंही नोकरी करीत असल्यामुळे फ्लॅट संस्कृतीत बंद दरवाज्यात मिळणाती प्रायव्हसी, शुद्ध मैत्रीचे रुपांतर होते शारिरीक आकर्षणात, आजचे युवक-युवती अल्पवयातच सेक्स संबध प्रस्थापित करतात व त्यालाच प्रेम समजतात, परिपक्वता आल्यावर त्यांना हे सर्व नकोसं वाटतं प्रसारमाध्यमांद्वारे चित्रपटाद्वारे पसरवलेली ही उच्छृंखलता असते ह्यावर लगाम लावता आला पाहिजे.

अनेक मुली मुलांकडून बक्षीस घेणे व्हॅलेटाईऊन डे च्या दिवशी कार्ड घेणे, गुलाबाचं फुल घेण व मुलांना प्रोत्साहन देत असतात. स्वैराचारी वागून मुलांच्या भावनेशी खेळत असतात. वेळ आल्यावर मी तुझ्याकडे त्या दृष्टीने पाहीले नाही असं कारण सांगत असतात. परंतु कितीही कारणं मुलींनी दिली तरी स्त्रियांना एक नैसर्गिक देणगी लाभलेली असते ती म्हणजे 'स्त्रीमन' पुरुषांना शंकाही येणार नाही असं एक स्त्रीचं मन संशयीमन नेहमीच पुढं धावत असतं त्या मनाला पुरुषांच्या भावनेची व नजरेची ओळख लगेच कळते.

आपण रामायणात पाहिल्यास महापतिव्रता सीतेने लक्ष्मणरेषा ओलांडण्याच भान न ठेवल्यामुळेच अवघ रामायण घडलं, क्रुरवर्मा वासनांध रावण एकच होता, परंतु आताच्या मुलींनी यौवनरेषा ओलांडताना योग्य सावधानी घेण अगत्यांच आहे. हल्लीच्या दोघं नोकरी करणाऱ्या पालकांना एकच पाल्य असतं, पालक आपल्या पाल्याला भरपूर वेळ देऊ शकत नाही त्यामुळे त्याला पाहिजे ती वस्तु देऊन त्याचे सर्व हट्ट पुरवीत असतात. पाल्य हट्टी बनतो, तोच हट्टवाद स्वभाव बाहेर दाखवीत असतो. अमुक एक मुलगी आवडली म्हणजे ती मिळायलाच पाहिजे आणि मला नाही म्हणजे ती कोणालाच मिळू नये हा हट्टवादी विचार. ह्या विचारातूनच हिंसक प्रवृत्ती जन्म घेते.

म्हणूनच मुलींनी आपल्या मर्यादेत राहिले पाहिजे. योग्य वयांत विवाह होणे केव्हाही चांगले आपला पदर किंवा ओढणी बांधूनच काम करायला पाहीजे. आपली झांशीची राणी पदर बांधूनच घोड्यावर स्वार व्हायची आपणच जर पदर किंवा ओढणी वाऱ्यावर सोडून दिले तर फायदा घेणारे बरेच आहेत. उत्तान कपडे, तंग पेहराव करुन पुरुषांच्या नजरा चाळवू नये. आपले स्वत:चे व्यक्तिमत्त्व असे ठेवावे की कोणाचीही हिंमत आपल्याकडे वाकड्या नजरेने किंवा छेड काढण्याची होणार नाही. दुसऱ्याच्या भावना आपल्यामुळे चेतवल्या नाहीत ह्याची खबरदारी घ्यायला हवी.

पालकांनी आपल्या पौगंडावस्थेत आलेल्या पाल्याकडे पुरेसे लक्ष द्यावे. शाळा-कॉलेजमध्ये अशा विषयांवर चर्चा-व्हावी. कोण कुठे चुकते, काय घडते आणि काय घडू शकते ह्याचं कौन्सलिंग व्हायला हवे. पालक व पाल्य, शिक्षक व विद्यार्थी ह्यांच्या नात्यात पारदर्शकता

योग्य वेळ निवडणे म्हणजेच योग्य वेळ वाचवणे आहे. -फ्रान्सीस बेकन

असावी. टी.व्ही., सिनेमा व इतर प्रसारमाध्यमांनी, निर्मात्यांनी व दिग्दर्शकांनी लक्षांत घ्यायला हव की आजच्या व उद्याच्या पिढीचे आपण शिल्पकार आहोत. आपल्या निर्मितीचे अनुकरण केले जाते. आणि शेवटी संस्कार हे आहेतच. एवढे करुनही जर एखादी विकृती जन्माला येत असेल तर कडक शिक्षा ही झालीच पाहीजे जेणेकरुन दुसऱ्यांना जरब बसेल.

सौ. मोनीका दिलीप कुवर

अंबरनाथ

***

## मुखपृष्ठाविषयी थोडेसे


जून महिन्याच्या १२ व १३ तारखा रसिकांच्या कायम स्मरणात राहतील. या दिवशी विनोदाचे बादशाह प्र. के. अत्रे व महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे तथा भाई यांचे स्मृतिदिन.

दोघेही अष्टपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेले. दोघांनीही सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रे गाजवली. दोघांचेही हृदय करुण आणि स्नेहाने सतत पाझरत असे याचा अनुभव कित्येकांनी घेतला असेल. दोघेही खंदे वक्ते. शब्द त्यांच्यापुढे हातजोडून उभे असत.

दोघांनीही गेले शतक गाजवले. त्यांच्याबद्दल लिहावे तेवढे थोडेच. या दोघांच्याही स्मृतीला विनम्र अभिवादन!

सौ. मंजिरी दांडेकर

## शब्दवेध क्र. २




### आडवे शब्द

१) वनस्पतींना ही भावना असतात हे शोधून काढणारा भारतीय शास्त्रज्ञ.
५) डाळीचे कालवण
६) प्लॅस्टिक सर्जरीचे मराठी नाव.
९) स्फुरण
१२) मोठा
१३) एक उभयचर प्राणी
१४) आगीचा xx
१६) प्रसिद्ध चित्रपट अभिनेता याच्या पत्नीचे नाव आहे 'सोमा'
१७) कद्रू

### उभे शब्द

१) गुरुत्वाकर्षणामुळे वस्तूंना 'हे' येते.
२) 'पाप' हा धातू 'या' रुपात असतो.
३) बा. भ. xxxx प्रसिद्ध कवी
४) उत्सव साजरा करण्याचा दिवस
७) व्ही. शांताराम यांचा प्रसिद्ध चित्रपट यात रंजना होती.
८) विनोद गमतीने बोलणे.
९) दामिनी, विद्युलता
१०) दैवाची करणी 'यात' पाणी असते.
११) अत्यंत गाजलेले नाटक. या नाटकाची आता टि.व्ही मालिका गाजत आहे.
१४) लंपक

अजित अ. कुलकर्णी

मुख्य मंत्री

महाराष्ट्र

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : ११-४-२००१

प्रति,
कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा,
ठाणे - ४००६०२

स. न. वि. वि.

गुजरातमधील भीषण भूकंपातील आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी आपण धनादेशाने/धनाकर्षाने पाठविलेली रक्कम रु. २,५०,०००/- (रुपये ~~रु.५०,०००~~ दोन लक्ष पन्नास हजार मात्र) मिळाली. आपल्या उदार देणगीबद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.

देणगी मिळाल्याची पावती सोबत पाठवीत आहे.

धन्यवाद

VIDYA PRASARAK MANDAL
432
23/4/2001
NAUPADA THANA-2

धा. क्र. ११५५५१

आपला,

विलासराव देशमुख

# एक विशेष कार्यक्रम

गेल्या दोन तीन महिन्यातील महत्त्वपूर्ण कार्यक्रम म्हणजे विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे महाविद्यालय परिसरात उच्च शिक्षण व तंत्रज्ञान शिक्षण मंत्री माननीय दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते दिनांक २३ एप्रिल रोजी झालेले कै. बाळासाहेब देसाई यांच्या तैलचित्राचे अनावरण व ग्रंथालय व माहितीशास्त्र या मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाचे उद्घाटन होय ! हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. एक तर अनेक वर्षे मनात असणारी एक इच्छा- कै. बाळासाहेब देसाई यांचे छायाचित्र परिसरात असावे, ही त्या दिवशी पूर्ण झाली. ठाणे महाविद्यालय हा परिसर जेथे आज उभा आहे ती दलदलीची खाडीची असणारी त्यावेळची जागा कै. बाळासाहेब देसाई यांच्या शिक्षणावरील प्रेमामुळेच शासनाकडून विनामूल्य मिळाली. मंडळ याबद्दल नेहमीच कृतज्ञ राहिले आहे. ही कृतज्ञता छायाचित्र लावून व्यक्त करण्याचा योग २३ एप्रिल या कै. बाळासाहेब देसाईंच्या स्मृतिदिनी आला. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या दोन्ही महत्त्वपूर्ण कार्यक्रमांस विद्याप्रसारक मंडळास सदैव मदत करणारे महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती, धडाडीचे नेते माननीय वसंतरावजी डावखरे उपस्थित होते. ग्रंथालय व माहिती शास्त्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय ग्रंथ दिवसाला व्हावे हा ही एक दुग्धशर्करा योग साधला गेला. खरेतर अभ्यासक्रम गेल्या शैक्षणिक वर्षालाच सुरू झाला, पण औपचारिक उद्घाटन व्हावयाचे होते व त्यासाठी माननीय शिक्षण मंत्री यावेत ही इच्छा होती. या दोन्हींचा योग त्या दिवशी आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस त्याच दिवशी सकाळी ज्यांचे दुःखद निधन झाले ते माजी सभापती जयंतराव टिळक यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून झाला. स्वागत सोहोळ्यानंतर माननीय वसंतरावजी डावखरे यांनी संगणकावर कळ दाबून गणेश पूजन केले. कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी संगणकाच्या पडद्यावर गणेश पूजन व उद्घाटन पाहता यावे यासाठी विशेष प्रयत्न केले होते. यानंतर प्राचार्य स. वा. गोखले यांनी प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केले. मुंबई विद्यापीठात हा अभ्यासक्रम चालू करणारे हे पहिले महाविद्यालय असल्याचे त्यांनी नमूद केले.



**मा. श्री. दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व कै. बाळासाहेब देसाई यांच्या तैलचित्राचे अनावरण.**

या नंतर सभागृहाच्या प्रवेश द्वाराच्या उजव्या बाजूस बसविण्यात आलेल्या माननीय (कै.) बाळासाहेब देसाईंच्या तैलचित्राचे महनीय पाहुणे माननीय दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. हे तैलचित्र सुविख्यात चित्रकर्त्या श्रीमती चंद्रकला कदम यांनी बनविले आहे. विशेष म्हणजे त्या स्वतः या कार्यक्रमास उपस्थित होत्या.

विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष माननीय अ. धों टिल्लू यांनी व्यासपीठावरील मान्यवर निमंत्रितांचा परिचय

करून दिला. सदर कार्यक्रमास बाळासाहेब देसाई यांचे सुपुत्र श्री. अरुणराव देसाई व अशोकराव देसाई तसेच नातू श्री. शंभुराजे देसाई मुद्दाम उपस्थित होते. श्री. शंभुराजे देसाई यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्या प्रसारक मंडळाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. माननीय वसंतरावजी डावखरे यांनी अतिशय मौलिक विचार यावेळी व्यक्त केले.



**माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते बी. लिब्. -कोर्सचे उद्घाटन**

संगणकावर कळ दाबून माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे पाटील यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र या अभ्यासक्रमाचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले. आपल्या भाषणात शिक्षणावर होत असणाऱ्या खर्चाचा निर्देश करून ते म्हणाले, 'लवकरच शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याचा शासनाचा विचार आहे. यासाठी शैक्षणिक संस्थांनी आपल्या गुणात्मक दर्जात प्रयत्नपूर्वक वाढ करावयास हवी.'' विद्या प्रसारक मंडळाच्या कार्यावद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणारे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी अध्यक्षीय भाषण केले. विद्याप्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष माननीय श्री. श्री. वि. करंदीकर यांनी समारंभास उपस्थित असणारांचे व साहाय्य करणारांचे आभार मानले. समारंभाचे निवेदन सौ. वासंती वर्तक यांनी केले.

समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह माननीय श्री. उत्तम जोशी, कोषाध्यक्ष माननीय श्री. मा.य. गोखले, श्री. ल. ग. देव, श्री. दिलीप जोशी तसेच विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील, तंत्रनिकेतनाचे प्राचार्य सौ. श्री. मुजुमदार, व्यवस्थापक संस्थेचे संचालक श्री. बा.ना.लाड, विविध विषयांचे प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व वृत्तपत्रांचे पत्रकार, मोठ्या संख्येने उपस्थित होते. कला वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. अरुण जोशी यांनी सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

'दिशा' प्रतिनिधी

***

## सूची बद्दल

'दिशा' ची सूची हे वैशिष्ट्य पूर्ण काम. दिशाच्या वाचकांना सुरवातीपासून उपलब्ध आहे. नियतकालिकांची सूची आपल्याकडे आभावाने आढळते. दिशात मात्र सुरुवातीपासून आम्ही सूची देत आहोत. या मागे उद्देश असा की भविष्य काळात कोणाही वाचकास कोणता संदर्भ लागला तर तो शोधणे सोपे व्हावे. सूची वाङ्मय समृद्ध असणे ही अभ्यासकांची सोय आहे. त्यामुळे हा प्रयत्न आपणास कसा वाटतो, यावद्दल कृपया लिहून कळवावे.

**- मोहन पाठक**
कार्यकारी संपादक

# दिशा जुलै २००० ते एप्रिल २००१ लेख सूची

सूची संकलन -प्रा. मोहन पाठक
सहाय्य : वैशीली जोशी

| क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | महिना | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | अग्रक्रम | करंदीकर, अशोक | सप्टेंबर २००० | २८-३० |
| २ | आठवण (कविता) | वैद्य, क्षमा | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | २९ |
| ३ | आठवणींत राहिलेले सर | पाठक, मोहन | डिसेंबर २००० | २९-३० |
| ४ | .... आणि टिनू मिळाला..... | शेवडे, मैत्रेयी | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | २४-२६ |
| ५ | .... आणि मी हास्यचित्रकार झालो | मेहेत्रे, विवेक | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ६३-६६ |
| ६ | इंद्रधनुष्य आणि सोन्याचा हंडा | जोशी, लीला | डिसेंबर २००० | २४-२६ |
| ७ | एक रोमांचकारी व अद्भुत असा अनुभव | गवंदे, राजाभाऊ | ऑगस्ट २००० | ३३-३५ |
| ८ | एकनाथांची भारूडे | जोगळेकर, शैला | मार्च २००१ | २७-२८ |
| ९ | ओशो आणि प्रेम | दोडे, अरविंद | ऑगस्ट २००० | ३३-३५ |
| १० | काटेसावर (कविता) | वैद्य, क्षमा | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ८ |
| ११ | कै. नी.गो. पंडित स्मृती स्पर्धा वर्ष ३२ वे | दातार, रवींद्र | डिसेंबर २००० | ६-७ |
| १२ | कोसला आणि आजची युवा पिढी | पाटील, शिल्पा | डिसेंबर २००० | ४-५ |
| १३ | गिर्यारोहण | राव, संध्या | ऑगस्ट २००० | २७-२८ |
| १४ | गीता-जीवन मार्गदर्शक ग्रंथ | सहस्त्रबुद्धे, अ.वि. | डिसेंबर २००० | २-३ |
| १५ | गूढयात्री | कर्णिक, प्रदीप | मार्च २००१ | ११-१३ |
| १६ | ग्रंथांची उपेक्षा | पाठक, मोहन | ऑगस्ट २००० | २२-२३ |
| १७ | ग्रंथप्रसाराच्या माझ्या प्रयोगची फलश्रुती | टिळक, श्रीकृष्ण | एप्रिल २००१ | २५-२६ |
| १८ | चंद्र आणि रुपया (कविता) | कांबळी, विनोद | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | २६ |
| १९ | जमाना-ई-कॉमर्सचा | | जुलै २००० | ३३-३५ |
| २० | जरा विचार करा | दांडेकर, मंजिरी | जुलै २००० | ३१-३२ |
| २१ | ठाणे महानगरपालिकेतील वाहतुकजन्य प्रदूषण व्याप्ती आणि उपाययोजना | जोशी, भारती | फेब्रुवारी २००१ | १२ |
| २२ | डाऊश लँड (जर्मनी) लेखांक १ | पाटील, अजित | एप्रिल २००१ | २७-२९ |
| २३ | डॉक्टर जेकिल अॅन्ड मिस्टर हाअिड | जोशी, लीला | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | २७-२९ |
| २४ | डॉ. आंबेडकरांच्यावरील चित्रपटाच्या निमित्ताने | शेजवलकर, र.म. | मार्च २०००१ | ७-१० |

| क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | महिना | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|---|
| २५ | तंत्रनिकेतनाच्या ग्रंथालयातील एक महत्वाचा संदर्भग्रंथ | जोशी, भारती | सप्टेंबर २००० | १४-१५ |
| २६ | तबल्याची लयकारी आणि सुरांची अदाकारी सहज साधणारा कलाकार-चंद्रशेखर वझे | दांडेकर, मंजिरी | सप्टेंबर २००० | १८-२० |
| २७ | तक्षशिला | करमरकर, प्रकाश | ऑगस्ट २००० | ३-८ |
| २८ | त्रिकोणमितीय गुणोत्तरांचे अध्यन | देशपांडे, विशाखा | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ७५-७८ |
| २९ | दिव्यत्वाची जेथे प्रचिती | कुलकर्णी, सुमेधा | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ५९-६० |
| ३० | दरवळणारा सुंगध-टी. चंद्रशेखर | पेंढारकर, अजित | डिसेंबर २००० | ११-१४ |
| ३१ | दिलवाडा मंदिर व शिल्पकला | दांडेकर, मंजिरी | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ३०-३२ |
| ३२ | दिशा वर्ष चौथे : लेखसूची | पाठक, मोहन | सप्टेंबर २००० | ३७ |
| ३३ | नविकेत / प्राजक्ता गौरव सोहळा मा. कुलगुरु श्री. भालचंद्र मुणगेकर यांचे भाषण | शब्दांकन : दीपाली भाटकर | जानेवारी २००१ | १७-२१ |
| ३४ | नवनवल वृक्षउत्सवा !! | ठाकूर, अरुण | एप्रिल २००१ | १४-१६ |
| ३५ | नात्यांचा गोफ - प्रपंच | देशपांडे, विशाखा | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ६९-७३ |
| ३६ | नामशेष झालेल्या नात्यांना संजीवनी देणारे प्रपंच | ओक, संजीव | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ४-८ |
| ३७ | निरोप समारंभ | प्रसाने, वंदना | फेब्रुवारी २००१ | २१-२२ |
| ३८ | नेचर क्लब अहवाल | | एप्रिल २००१ | ३२ |
| ३९ | पंचेचाळीस हजाराचा जीव | कर्णिक, प्रदीप | डिसेंबर २००० | १३-१७ |
| ४० | पर्यावरणासाठी आपण काय करु शकतो? | पाठक, मोहन | सप्टेंबर २००० | ३१ |
| ४१ | परिसर वार्ता | देशपांडे, विशाखा | जुलै २०००, ऑगस्ट २००० | ३६-४० |
| | | | सप्टेंबर २००० | ३२-३६ |
| | | | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ८०-८८ |
| | | | डिसेंबर २००० | ३२-४० |
| | | | जानेवारी २००१ | ३८-४० |
| | | | फेब्रुवारी २००१ | २८-४० |
| | | | मार्च २००१ | ३४-४० |
| | | | एप्रिल २००१ | ३५-३९ |


एकदा वेळ वाया गेला किंवा हरवला की तो पुन्हा सापडत नाही. - बेंजामीन फ्रँकलीन

| क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | महिना | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ४२ | पहिलीपासून इंग्रजी शिक्षण | कुलकर्णी, निशिता शिरीष | जानेवारी २००१ | २२-२४ |
| ४३ | फिजीतील भारतीय वंशिकांवरील संकट | | सप्टेंबर २००० | २५-२७ |
| ४४ | बहर ओसरला | दांडेकर, मंजिरी | मार्च २००१ | २५-२६ |
| ४५ | भगवद्गीता | कुलकर्णी,गीता | मार्च २००१ | ६ |
| ४६ | भ्रष्टाचार | प्रसादे, वंदना | डिसेंबर २००० | २७-२८ |
| ४७ | भावे राष्ट्रीय व्याख्यानमाला १९९८ | वाड, विजया शब्दांकन : दीपाली भाटकर | एप्रिल २००१ | ४-१२ |
| ४८ | भाषांतर प्रक्रिया | कर्णिक, प्रदीप | ऑगस्ट २००० | ९-१५ |
| ४९ | मराठी संतांचा गणेश | जोगळेकर, शैला | सप्टेंबर २००० | १०-११ |
| ५० | मानसी तुझ्यासाठी ..... (एकांकिका) | बोरकर, संजय | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ४७-५६ |
| ५१ | माहिती तंत्रज्ञान प्रदर्शन- मा. प्रमोद महाजनांचे भाषण | शब्दांकन : दीपाली भाटकर | जानेवारी २००१ | ४-११ |
| ५२ | माहिती तंत्रज्ञान-स्वयंरोजगाराच्या नव्या दिशा | प्रधान, प्रवीण | जुलै २००० | ३-६ |
| ५३ | मी पाहिलेले इटाली !(उत्तरार्ध) | दाभाडे, ग. त्रि. | जुलै २००० | ११-१९ |
| ५४ | मुंबई हार्ट ब्रिगेड | गुमास्ते, संजय | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ६२ |
| ५५ | मुलाखतकारांची मुलाखत- एक रंगलेला 'शब्द' सोहळा | मयेकर, सुचेता | सप्टेंबर २००० | २१-२४ |
| ५६ | मेहतर समाजाची व्यथा | खैरलिया, जगदिश | सप्टेंबर २००० | १२ |
| ५७ | मैत्री (कविता) | बोरकर, संजय | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ५७ |
| ५८ | यत्नांचा वन्ही प्रज्वलित करा | कळमकर, उषा | सप्टेंबर २००० | ८ |
| ५९ | यशाचा कानमंत्र | कळमकर, उषा | फेब्रुवारी २००१ | ११ |
| ६० | योग प्रशिक्षण वर्ग | कारभारी, कुंदा | एप्रिल २००१ | ३० |
| ६१ | राष्ट्रीय पुस्तकमेळा | गुंडावार, नीता झनकर, रविंद्र पुजारी, अर्चना | मार्च २००१ | २२-२४ |
| ६२ | लग्न नावाचा धडा | दामले, प्रवीण | जुलै २००० | २३ |


काळ हा महान शिक्षक आहे पण दुर्दैवाने तो आपल्या सर्व शिष्यांना मारून टाकतो. -हेक्टर बर्लिआंझ

| क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | महिना | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ६३ | लीजंडस्-पुस्तक परिचय | भिडे, चिंतामणी | डिसेंबर २००० | १८-१९ |
| ६४ | लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेला आदर्श सार्वजनिक गणेश उत्सव | देवधर, राजेश<br>देवधर, मधुकर | ऑगस्ट २००० | १६-१७ |
| ६५ | वजाबाकीतून समृद्धी | जोगळेकर, शैला | डिसेंबर २००० | ८-१० |
| ६६ | वाचनालयातील वाचक आणि वाचन | जाधव, निशा | एप्रिल २००१ | ३३-३४ |
| ६७ | वार्धक्य | प्रसादे, वंदना | सप्टेंबर २००० | १६-१७ |
| ६८ | विमान सेवेतील व्यवसाय | प्रधान, प्रवीण | ऑगस्ट २००० | २९-३१ |
| ६९ | २० M च्या निमित्ताने | देशपांडे, वासुदेव | सप्टेंबर २००० | ३-५ |
| ७० | २०व्या शतकातील शैक्षणिक प्रगती | टिळू ,अचलकुमार | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | २१-२३ |
| ७१ | वेध-२००० | देशपांडे, विशाखा | फेब्रुवारी २००१ | ३-१० |
| ७२ | वैभवशाली विजयनगरी साम्राज्याची राजधानी -हंपी | दांडेकर, मंजिरी | मार्च २००१ | १६-१८ |
| ७३ | व्यंगचित्र काय असतं (कविता) | रुळे,संजय | डिसेंबर २००० | ३१ |
| ७४ | वृध्दाश्रम | नेने, अमृता | जानेवारी २००१ | २५-२६ |
| ७५ | शब्दावाचून अडले सारे .... | कुलकर्णी, अजित | मार्च २००१ | २५-२६ |
| ७६ | शब्दकोडे | कुलकर्णी, अजित | एप्रिल २००१ | ४० |
| ७७ | शिवाजीराव भोसले यांच्या अविस्मरणीय भाषणांचा वृत्तांत | शब्दांकन :<br>अ.धो. टिळू | जानेवारी २००१ | १२-१६ |
| ७८ | शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती कशी निर्माण करावी व जोपासावी | खरे, मेघा हेमंत | जानेवारी २००१ | २७-३७ |
| ७९ | शिक्षणक्षेत्रांच खरं दुखणं | बाळ, प्रकाश | सप्टेंबर २००० | ६ |
| ८० | शिक्षण क्षेत्रात माफिया ! | अभ्यंकर, निकित | एप्रिल २००१ | २२-२४ |
| ८१ | शिक्षणात ज्ञानापेक्षा माध्यमाचेच वर्चस्व अधिक | कर्णिक, प्रदीप | जुलै २००१ | ७-१० |
| ८२ | श्रमसाफल्य (कविता) | कांदीकर, अशोक | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ३२ |
| ८३ | श्री समर्थ रामदास स्वामींचे प्रपंचविज्ञान- एक नितांत सुंदर प्रबंध | टिळू ,अचलकुमार | फेब्रुवारी २००१ | २३-२७ |
| ८४ | समर्थ रामदास (पूर्वार्ध) | लिमये, मीरा | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | १५-१९ |


काळ हा घोडेस्वार यौवनाला नमवून टाकतो.- जॉर्ज हार्बर्ट

| क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | महिना | पृ. क्रमांक |
|---|---|---|---|---|
| ८५ | संजीवनी बोकील यांच्याशी बातचीत | शेट, सुधीर<br>कर्णिक, कौस्तुभ | एप्रिल २००१ | १७-१९ |
| ८६ | समर्थ रामदास (उत्तरार्ध) | लिमये, मीरा | डिसेंबर २००० | २०-२३ |
| ८७ | सरत्या शतकातील महान व्यक्ती | पाटील, शिल्पा | जुलै २००० | २१-२३ |
| ८८ | 'सहजसाध्य पैशाची हाव' धनतृष्णा | हब्बु, वेदवती | मार्च २००१ | ४९ |
| ८९ | स्त्री | प्रसादे, वंदना | ऑगस्ट २००० | २४-२६ |
| ९० | स्त्रीला काय हवं असतंफ घर की करीअर? | गटणे, वर्षा | मार्च २००१ | ३१-३३ |
| ९१ | स्वा. सावरकर साहित्य दर्शन | जोगळेकर, शैला | फेब्रुवारी २००१ | १५-२० |
| ९२ | हिंदुस्थानी अभिजात संगीत व आजचा तरुण वर्ग | वझे, चंद्रशेखर | ऑक्टोबर-नोव्हेंबर २००० | ९-१३? |
| ९३ | हिरो अन् बाहुल्या | कांबळी, विनोद | एप्रिल २००१ | १३ |
| ९४ | हिरोशिमाच्या कविता | संकेची, तोगे | ऑगस्ट २००० | ३२ |
| ९५ | ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये चळवळी व विचारधारा | शाळीग्राम, अनिल<br>देशपांडे, प्रशांत | ऑक्टोबर- नोव्हेंबर २००० | ३५-४६ |



*With Best Compliments From*

**MONI**

**COLLECTION**

**EXCLUSIVE CHILDREN WEAR**

Gokhale Road, Naupada, Thane
Tel. 540 72 47

Prop. Shantilal K. Shah

हार्दिक शुभेच्छा !

**मे. कालिका कंगन स्टोअर्स**

सर्व प्रकारच्या फॅन्सी काचेच्या व मेटलसच्या बांगड्या तसेच वेटेक्स, रोलेक्स, करिश्मा गॅरंटेड ज्वेलरी व गॅरंटेड बांगड्या आणि कॉस्मेटिक्स व कटलरी मिळण्याचे एकमेव विश्वासपात्र दुकान

**पत्ता :**
प्रभात टॉकीज समोर, स्टेशन रोड, ठाणे (प.)


प्रत्येक जीव हा परिस्थितीला जखडलेला गुलाम असतो.